
पाक्षिक

समाज आणि राष्ट्राच्या नवरचनेसाठी

www.peoplespost.in

# द पीपल्स पोस्ट

स्थापना : २९ ऑगस्ट २०१८ । वर्ष : ४ । अंक १५ वा । मूल्य : रु. ३० । दिनांक : १६ ते ३१ मार्च २०२२



पाक्षिक

# द पीपल्स पोस्ट

समाज आणि राष्ट्राच्या नवरचनेसाठी

स्थापना : २९ ऑगस्ट २०१८ । वर्ष : ४ ।
अंक १५ । मूल्य : रु. ३० । दिनांक : १६ ते ३१ मार्च

**संपादक**
चेतन शिंदे

**मांडणी व सजावट**
गायत्री ग्राफिक्स्, नाशिक

**संपादकीय पत्रव्यवहार**
द पीपल्स पोस्ट कार्यालय
सीटीएस नं. १४४, मिल कॉर्नर छावणी रोड, बारापुल्ला गेटजवळ, मिल कॉर्नर, औरंगाबाद - ४३१००१

**संपर्क**
८८८८५४१८२२ । ९५८८४५११५१

E mail : thepeoplespost2014@gmal.com



(या अंकातील सर्व लेखांचे हक्क सुरक्षित)

* अंकात व्यक्त झालेल्या लेखकांच्या मतांशी संपादक सहमत असलेच असे नाही.
* अंकातील कोणताही मजकूर पूर्वपरवानगी शिवाय वापरता येणार नाही.



**ऑनलाईन समन्वयक**
प्रतीक माधुरी

द पीपल्स पोस्ट | 8888541822

- **जाहिरात विभाग संपर्क**
  ९८२१४४५४०९ / ८८०५१५१४५२

**अंकाची वार्षिक वर्गणी ६००/- रुपये फक्त**

- **द पीपल्स पोस्ट बँक अकाऊंट डिटेल्स्**

द पीपल्स पोस्ट : SBI Bank
शाखा : समर्थनगर, औरंगाबाद
AC No. 37856373419
IFSC CODE : SBIN0007919
MICR No. : 431002010

**ऑनलाईन पेमेंटसाठी येथे स्कॅन करावे**

वर्गणीचा धनादेश, धनाकर्ष द पीपल्स पोस्ट या नावाने काढावा



**संपादकीय :** हिंदुत्वाच्या वाटेवर निघालाय भगव्यात रंगलेला विजय ०३/ **कव्हर स्टोरी :** आश्वासने विकासाची आणि चाल हिंदुत्वाची... – **विजय नाईक** ०५/ राजकारणाचे ध्रुवीकरण... – **भास्कर नाशिककर** ०९ /यूपीचा निकाल : वास्तवाकडून भ्रमाकडे – **नागार्जुन वाडेकर** १४/ गोव्यात भाजपच्या विजयामागील रहस्य ! – **सुरेश स. नाईक** १८/ 'झुंड' पाहणे गरजेचे आहे – **बाबूराव भोर** २१/ विषमतेची चौकट मोडणारा 'झुंड' – **प्रतीक माधुरी** २३ / **इतना सन्नाटा क्यूं... :** तुम्ही चुप राहा, बातम्या बोलतील – **जयदेव डोळे** २५/ सर्वच विचारसरणींनी मूलगामी होणे गरजेचे – **दत्ता देसाई** २९ / **व्यक्तीविशेष :** इहवादी सौंदर्य मीमांसक डॉ. यशवंत मनोहर – **डॉ. अशोक नामदेव पळवेकर** ३६ / **आज-कालचे प्रश्न :** ३९/ **ग्रंथपरिचय :** माणूस असण्याच्या विषण्ण करणाऱ्या नोंदी – **सुदीप गुजराथी** ४२



हे पाक्षिक, मालक, मुद्रक, प्रकाशक धम्मपाल भीमराव शिंदे यांनी मेत्ता प्रिंटर्स सीटीएस नं. १४४ मिल कॉर्नर, छावणी रोड, बारापुल्ला गेटजवळ, औरंगाबाद ४३१००१ येथे छापून फ्लॅट नंबर ए-४०३, जीएन नं. १०/२, ग्लोरियासिटी, एमएसईबी पावर हाऊसजवळ पडेगाव, औरंगाबाद ४३१००१ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले आहे. * संपादक चेतन भीमराव शिंदे (पीआरबी कायद्यानुसार जबाबदारी यांची राहील) सर्व वादविवाद औरंगाबाद जिल्हा न्यायालयीन कक्षेत. क्र. MAHMAR/2018/76460



# हिंदुत्वाच्या वाटेवर निघालाय भगव्यात रंगलेला विजय

बहुतेक वेळा भगवे कपडे परिधान करणारे, गळ्यात रुद्राक्षाच्या माळा घालणारे, गुहा नी डोंगरावर जाऊन काही काळ ध्यान करणारे, दाढी वाढवणारे असे अनेक नेते सत्तेच्या उबदार खुर्चीत निवांतपणे आणि एक-दोन तपासाठी विराजमान झाले तेव्हाच सर्वांच्या लक्षात आले होते, की धर्मनिरपेक्षतेने, राज्यघटनेने, फुले-शाहू-आंबेडकरांच्या विचाराने गोठलेल्या हिंदुत्वाचा रस्ता आता वितळणार म्हणजे बर्फ वितळणार आणि हे साधू-संन्याशाचं रूप घेतलेले या रस्त्यावरून प्रवासाला प्रारंभ करणार, याचा अंदाज आला होता. चार राज्यांत जवळपास पाशवी बहुमत मिळवून भाजपने आता ते सिद्ध केले आहे. रस्त्यावरचे सिग्नल हलवायला सुरुवात केली आहे. हिंदूराष्ट्र, हिंदूत्व, हिंदू संस्कृती इत्यादी आयुधे या प्रवासात आहेत आणि अंगावर झळाळणारा भगवा रंग आहे. राज्यघटनेने तयार केलेल्या संसदेत आणि बाहेर भगवा एवढा खळाळून वाहिल याचा अंदाजही सर्वांना होताच. हे काही एका रात्रीत झालेले नाही. अनेक डावपेच करून आणि सुमारे पाऊणशे वर्षे खर्च करून भगवा इथपर्यंत पोहोचला. जगभर सुरू असलेल्या सांस्कृतिक संघर्षात, धर्मराष्ट्रांच्या हालचालीत तोही एक भाग बनणार आहे, याविषयी तूर्त तरी कुणी शंका बाळगण्याचे कारण नाही. चार राज्यांतील विजयाने या प्रवासाला गती मिळणार आहे. २०२४ च्या निवडणुकांसाठी हे एक चिन्ह मानले जात आहे. दक्षिणेकडचा थोडा फार पट्टा आणि विरोधकांच्या हातात असलेली दोन-चार राज्ये सर केली की निदान एका पक्षाची भगवी सत्ता म्हणजेच हिंदूंचे राष्ट्र जन्माला येईल, असे अडाखे बांधले जात आहेत. भाजप पन्नास वर्षे राज्य करणार आणि या काळात हिंदुत्वाविरोधी घटक शिल्लकच राहणार नाहीत. विरोधकांशिवाय हिंदू राष्ट्र असेल आणि ते लोकशाहीतूनच जन्माला येईल, अशा काही रचना आहेत आणि त्या जगाला दिसू लागल्या आहेत.

उत्तर प्रदेशात सलग मोठ्या विजयाने निवडून येण्याचा विक्रम भाजपनं केलाय. याविषयी कोणी शंका बाळगण्याचं काही कारणच नाही. गेली पाच वर्षे उत्तर प्रदेशाला हिंदू राष्ट्राची कार्यशाळा, प्रयोगशाळा बनवण्यात आलं होतं. रामाच्या मंदिराची उभारणी, कॉरिडास, तलाकविरोधी कायदे, गो रक्षणासाठीचे कायदे वगैरे खूप काही यशस्वीपणे राबवलं गेलं. लोकांची मानसिकता पद्धतशीरपणे धार्मिक बनवण्याचे प्रयोग करण्यात आले. देशाचे रुपांतर हिंदूराष्ट्रात झाल्याशिवाय ना देशाची प्रगती होईल ना नागरिकांची, हे बिंबवण्यात आलं. जातीय समीकरणाची फोडणी अशी काही देण्यात आली, की तिचा वास सर्वत्र घुमू लागला. गुजराथी बनावटीची म्हणजे तिथलच्या प्रयोगशाळेतील ही फोडणी होती. ती इतकी झोंबली, की क्षणभर लोकांनी आपल्याला भेडसावणारे प्रश्न विसरायला सुरुवात केली. महागाई, बेकारी, भ्रष्टाचार, जातियता या जणू


काही नित्याच्याच गोष्टी आहेत. कुणी देव आला तरी त्या संपणार नाहीत अशी लोकांची मानसिकता बनली किंवा बनवली गेली. या साऱ्यांचा परिणाम विकासावरचे, प्रश्नावरचे राजकारण घसरले आणि ते धर्मवादाकडे वळवण्यात आले. हिंदूराष्ट्रातील विकासाच्या कल्पनाही मोठ्या मजेशीर आहेत. इथं नागरिकांनी घामातून, मनगटातून काही मिळवायचं नाही किंवा निर्माणही करायचं नाही. जे काही त्यांना मिळणार ते सरकार मोफत पुरवणार आहे. गरिबांना अन्न मोफत, औषध मोफत, कपडे मोफत, वीज-पाणी मोफत, शिवाय दर महिन्याला मनिऑर्डर, सायकल-स्कुटी मोफत, नोकऱ्या नाही मिळाल्या तरी भाकरीनं भरलेल्या थाळ्या मोफत दिल्या जाणार आहेत. स्वाभाविकच स्वाभिमानी नागरिकांऐवजी दिल्लीतून निघालेल्या अन्न-पाण्याकडे आशाळभूतपणे बघत बसणारा नागरिक तयार होणार आहे. आळशी, लाचार आणि निष्क्रिय नागरिक तयार होणार आहे. खरे तर, कोणत्याच नागरिकानं या साऱ्या गोष्टी कधीही फुकटात द्या असं सांगितलं नव्हतं. मोर्चाही काढला नव्हता पण मायबाप सरकारनं हे सारं स्वतःहून केलं आणि आमचा विकास नेमका असा आहे, हेही सांगितलं. सर्वच पक्षांचे निवडणूक जाहीरनामे अशा फुकटात द्यावयाच्या गोष्टींनी आणि धार्मिक प्रेरणा देणाऱ्या गोष्टींनी भरून गेले होते. पंजाब काबीज करणारा 'आप' हा मूठभर पक्षही त्यात आघाडीवर होता. त्यानंतर श्रद्धा आणि भक्तीला नवा अर्थ लावला. सर्व धर्मातील नसलेली क्षमता त्यानं शोधून काढली. सर्व मंदिरांतील आपला वावर वाढवला. काँग्रेसही त्याच मार्गावर पोहोचली. उत्तरेत क्षत्रियांनी परशूरामाच्या जयंत्या सुरू केल्या. ब्राह्मणांचे संघटन आणि परशूरामाच्या जयंतीत मायावतीही आघाडीवर राहिल्या. आंबेडकरांचा वापर नेमका कसा करायचा असतो, हे 'आप'नं दाखवून दिलं. भाजपसारखं यश मिळवायचं असेल तर स्वतःचं रुपांतर भाजपमध्येच करून घ्यायला हवं, असं अनेक पक्षांना वाटलं. देव-देव, धर्म-धर्म केल्याशिवाय सत्ता मिळत नाही, हेही जणू काही त्यांना वाटू लागलं. एकूण काय तर लोकशाहीचा केंद्रबिंदू असणारी धर्मनिरपेक्षता मागं मागं पडू लागली. तिची टिंगलटवाळी होऊ लागली. उपेक्षा होऊ लागली. तिची जागा धर्मवादानं बऱ्यापैकी घेतली. तर हे आपल्या देशातील राजकारण आता माणसांऐवजी धर्मवादी म्हणजे माणूसवादीऐवजी धर्मवादी होऊन बसलंय.

सत्ता संपादनासाठी भाजप जी आयुधं वापरत आहे तीच वापरण्याची विरोधकांमध्येही चढाओढ सुरू झाली. परिणाम, आपल्याला असणारी पुरोगामी विचारांची परंपरा अनेकजण विसरून बसले. कोणत्या पक्षाकडे कोणता विचार होता. कोणता वाद होता किंवा आहे असा प्रश्न कुणालाच पडला नाही. खरंच काँग्रेसकडे महात्मा गांधी होते किंवा आहेत काय? खरंच आंबेडकरांच्या नावानं मतं मागणाऱ्यांच्या विचारात, वर्तनात आंबेडकर आहेत काय आणि डाव्यांकडे मार्क्स शिल्लक राहिला आहे काय? असे अनेक प्रश्न आहेत. राजकारणातील पराभवाला राजनीती जबाबदार असते की परिवर्तन घडवून आणणारा विचार, याचं उत्तर देण्यातही गल्लत होऊ लागली. फुले-शाहू-आंबेडकर, मार्क्स पराभूत झाले नाहीत. गांधी पराभूत झालेले नाहीत तर त्यांचा राजकारणासाठी जयजयकार करणारे पराभूत झाले आहेत. हा विचार समग्र, सम्यक कसा वापरायचा याचे भान यांना आलेले नाही किंवा येऊ द्यायचे नाही. परिणाम, जगभर गाजलेल्या शेतकरी आंदोलनालाही यांना मतांत रुपांतर करता आले नाही. जीवघेणी महागाई, बेकारीही मतांत रुपांतर करता आलेलं नाही. एकूण काय तर खचलेले विरोधक आणि स्वतःचं रुपांतर भाजपमध्ये करायला निघालेले विरोधक आपण पाहत आहोत. उद्यासाठी ते गुंतवणूक करायला तयार नाहीत आणि आजसाठी काही शिकायला तयार नाहीत. टेस्ट मॅचऐवजी वन डे मॅचप्रमाणं ते राजकारणाकडे आणि जय-पराजयाकडे बघताना आपण सारेच पाहतो आहोत.

चार राज्यांत विरोधकांचा जो पराभव झाला त्यामागे त्या ठिकाणची कारणे जशी आहेत, तशी भाजपची लाट होती हेही एक कारण आहेच आहे. ती लाट थोपवण्याचे प्रयत्न काही ठिकाणी झाले, काही ठिकाणी झाले नाहीत. अंतर्गत दृष्टीनं तडा गेलेली काँग्रेस पंजाबमध्ये स्वतःच्याच चुकीनं हरली. भाजपची लाट नाममात्र ठरली. मुख्यमंत्र्याला दुकानात काम करणाऱ्या मजुरानं हरवलं. मुख्यमंत्रीपदाच्या शर्यतीत असलेल्या काँग्रेसी नेत्याला विद्यार्थीनीनं हरवलं. अजून काय पाहिजे. आपल्याच पापाची फळे काँग्रेसला पंजाबमध्ये चाखावी लागली. लोकांना भाजपही नको होता आणि काँग्रेसही. लोक 'आप'च्या मागं उभे राहिले. 'आप' विजयी झाला. उत्तराखंड, मणिपूर या ठिकाणीही भाजपमधील दुफळीचा, मनभेदाचा काँग्रेसला लाभ उठवता आाला नाही. गोव्यातही तेच होतं. मायावती जवळपास नेस्तनाबूत झाल्या. ब्राह्मणांचं संघटन करत जणू काही आपला पक्ष त्यांच्याच ओंजळीत टाकायला त्या निघाल्या होत्या. हिंदू आणि त्यातही आर्य संस्कृतीचा बालेकिल्ला असणाऱ्या उत्तर प्रदेशात काही वेळा ब्राह्मण उभेही राहिले. पण त्यामागं भविष्यात मायावतींच्या हत्तीला कायम कुपोषित करणे हाच उद्देश होता, तो आता सफल झाला आहे. बसपनं त्याला सोशल इंजिनिअरिंग असं नाव देऊन टिऱ्या बडवून घेतल्या. आता त्यांना कळेल, की सोशल इंजिनिअरिंगला ब्राह्मण का पाठिंबा देत होते. समाजवादी पक्षाने पराभूत होऊनही जे यश मिळवले ते कौतुकास्पद आहे. जर बसप, सपा अशी युती झाली असती तर बुलडोजर आणि तो चालवणाऱ्या संन्याशाचे काही खरे नव्हते. पण असे घडले आहे. भाजपकडे विरोधकांना फोडण्याचे मार्ग आहेत. इडीपासून ते सत्तेचा तुकडा फेकण्यापर्यंत अनेक मार्ग आहेत. पण दुर्दैव हे, की विरोधकांकडे समझोता करून भाजपसमोर आव्हान ठेवण्याचे मार्ग नाहीत किंवा आहेत पण ते त्याचा विचार करत नाहीत. विरोधकांच्या आघाडीच्या कल्पनाही विचित्र आहेत. जे महाराष्ट्रात एकत्र राहतात ते गोव्यात आणि पालिकांमध्ये परस्परविरोधी लढतात. याला ऐक्य आणि आघाडी कसे म्हणता येईल. काही असो, धर्मवादाच्या नावानं आणखी काळ असंच चालणार आहे. त्यात पुढाऱ्यांऐवजी लोकांना लवकर शहाणपण येणार आहे. ते २०२४ ला नक्कीच येईल. कारण सगळा समाजच धुंदीत कधी जगत नसतो. राजकीय डावपेचांचा तो सतत कधी गुलाम किंवा बळी होत नसतो. शेवटी आपल्याला हवं तसं राजकारण तोच तयार करत असतो. ●●●




# आश्वासने विकासाची आणि चाल हिंदुत्वाची...



**विजय नाईक**

*१० मार्च रोजी उत्तर प्रदेश, उत्तराखंड, पंजाब, गोवा व मणिपूर या पाच राज्यांच्या विधानसभांच्या निवडणुकांचे निकाल लागले. त्यातून दोन गोष्टी स्पष्ट झाल्या. पंजाब वगळता, उरलेल्या चारही राज्यात भाजपने भरारी कायम ठेवली, तर पंजाबमध्ये आम आदमी पक्षाची त्सुनामी आली.* ***त्सुनामी लाटेचा सहसा कुणाला पत्ता लागत नाही. ती एकाएकी किनाऱ्यावर आदळून विध्वंस करते. आम आदमी पक्ष आघाडीवर असल्याचे प्रारंभापासून सांगितले जात होते. तिला त्सुनामी म्हणायचे कारण, इतर सारे पक्ष जवळजवळ साफ झाले.***

पंतप्रधान नरेंद्र मोदी हे भारतीय राजकारणाचे 'गोलियाथ' आहेत व दिल्लीचे मुख्यमंत्री व आम आदमी पक्षाचे अध्यक्ष अरविंद केजरीवाल 'डेव्हिड' आहेत. पाचही राज्यात भाजपची सरशी होईल, असे सांगणारे मोदी व गृहमंत्री अमित शहा यांना पंजाबमध्ये मतदारांनी पूर्णपणे नाकारले. त्याचबरोबर मतदारांनी घराणेशाहीचे प्रतिनिधित्व करणारे माजी मुख्यमंत्री प्रकाश सिंग बादल, सुखविंदर सिंग बादल व काँग्रेसला रस्ता दाखविला. दोघेही पराभूत झाले. काँग्रेसच्या हातून पंजाबचे सरकार गेले, एवढेच नव्हे, तर मुख्यमंत्री चरणजित छान्नी, काँग्रेसला रामराम ठोकून भाजपच्या गोटात जाऊ पाहाणारे माजी मुख्यमंत्री कॅ. अमरिंदर सिंग, प्रांताध्यक्ष नवज्योत सिद्धू या तिघांनाही मतादारांनी धूळ चारली. यातून काँग्रेसच्या नेतृत्वाची नादारी स्पष्ट झाली. मजेची पण गंभीर बाब म्हणजे मुख्यमंत्री छान्नी यांना भादौर मतदार संघात पराभूत केले, ते आम आदमी पक्षाच्या एका अत्यंत सामान्य लाभ सिंग उगोक या उमेदवाराने. ते ही तब्बल ३७,५५८ मताधिक्याने. तो मोबाईल्स दुरूस्त करणाऱ्या दुकानात काम करतो. या निकालांकडे पाहता, सोनिया गांधी, राहूल गांधी व प्रियांका गांधी वद्रा यांच्यासाठी काँग्रेस पक्ष बुडण्याचेच काय ते उरले आहे, असे वाटते.

काँग्रेसचे सरकार बनविण्यास गोव्यास गेलेले पी. चिदंबरम यांना हात हलवत परत यावे लागले. सरकार बनविण्याची वेळच

आली नाही. कारण, भाजपने स्वबळावर ४० पैकी २० जागा जिंकल्या. ''मुख्यमंत्री पद मिळाले तरच भाजपला पाठिंबा देऊ,'' अशी वल्गना करणाऱ्या महाराष्ट्रवादी गोमंतक पक्षाला मूकपणे भाजपला पाठिंबा जाहीर करण्याची वेळ आली. चिदंबरम यांनी गोव्याला रामराम ठोकण्यापूर्वी केलेले वक्तव्य विनोदीच होते. ते म्हणाले, ''मी उद्यापासून पुढच्या निवडणुकीच्या तयारीला लागणार आहे.'' गेल्या वेळी काँग्रेसकडे बहुमत असूनही केवळ वेळकाढूपणा केल्याने काँग्रेस सरकार बनवू शकली नाही. त्याचे श्रेय तेथे गेलेल्या दिग्विजय सिंह या ज्येष्ठ नेत्याला द्यावे लागेल. पाचही राज्यात झालेल्या पराभवाची कारणमीमांसा करण्यासाठी काँग्रेस भले कार्यकारिणीच्या कितीही बैठका घेवो, त्यातून काही निष्पन्न होण्याची शक्यता नाही.

निकालातून स्पष्ट होणारी आणखी एक बाब म्हणजे, देशाची वाटचाल झपाट्याने हिंदुत्वाच्या दिशेने होत असून, लोकशाहीच्या दृष्टीने ती अतिशय चिंताजनक गोष्ट होय. या लाटेत जातीपातीच्या राजकारणाला दुय्यम स्थान मिळत असून, केंद्र व उत्तर प्रदेश सरकारने निरनिराळ्या स्तरावर केलेल्या दडपशाहीला लोक स्वीकारू लागले आहेत, असे दिसते. उदा. केंद्राच्या तीन कृषिविषयक कायद्यांच्या माघारीसाठी पंजाब, हरियाना व उत्तर प्रदेशातील शेतकऱ्यांनी दिल्लीच्या सीमेवर दीड वर्ष केलेले आंदोलन पाहाता, मोठ्या प्रमाणावर शेतकरी भाजपच्या विरोधात जातील, हा अंदाज उत्तर प्रदेशात चुकला. पण, पंजाबमध्ये बरोबर ठरला. निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर भाजपला कंटाळून मागासवर्गीय स्वामी प्रसाद मौर्य व दारासिंग चौहान यांनी समाजवादी पक्षात प्रवेश केला, तेव्हा या महत्वाच्या गळतीचा भाजपच्या मतांवर विपरीत परिणाम होणार, हे मांडण्यात आलेले गणित चुकले. याचे प्रमुख कारण म्हणजे, उत्तर प्रदेशात पूर्णत्वाला गेलेले हिंदू विरूद्ध मुस्लिम हे धृवीकरण. उत्तर भारतात राजकारणाचा केंद्रबिन्दू आता हिंदुधर्म हा ठरला आहे. त्यामानाने विकासाचे मुद्दे मागे पडले आहेत.

मुख्यमंत्री आदित्यनाथ योगी यांनी जाहीर पणे ८० टक्के (हिंदू) विरूदध २० टक्के (मुस्लिम) असे गणित मांडले आणि मतदानही त्याच वाटेने गेले. भारतीय जनता पक्षाला उच्च वर्गीय, उच्च वर्णीय, गैर यादव, गैर ठाकूर मतदारांनी जोरदार मतदान केले. परिणामतः उत्तर प्रदेशात दुसऱ्यांदा त्याच पक्षाचे सरकार येत नाही, हा तीन दशकांचा उच्चांक मोदी व योगी मोडू शकले. याला मोदी म्हणतात त्या प्रमाणे मोदी-योगी हे 'डबल इंजिन' जबाबदार आहे.

२०१७ मध्ये सत्तेवर आल्यावर दलितांना खूष ठेवण्यासाठी आपल्या सत्तेतील वाटा योगी यांना केशव प्रसाद मौर्य यांना देऊन उपमुख्यमंत्री पदी नेमावे लागले होते. या निवडणुकात सिरथू मतदार संघात त्यांचा पराभव झाल्याने योगी यांची डोकेदुखी कमी झाली. तथापि, त्यांच्या ऐवजी कोणत्या नेत्याला उपमुख्यमंत्री पद द्यायचे, की स्वतः अनभिषिक्तपणे सरकार चालवायचे, हा प्रश्न त्यांच्या व भाजप पुढे आहे. केंद्रात मोदी व उत्तर प्रदेशात योगी हे सर्वेसर्वा असल्याने त्यांना तो सोडविणे कठीण जाणार नाही.

आणखी एक बाब म्हणजे, आदित्यनाथ योगी यांनी कोविड-१९ साथीच्या काळात केलेली दडपशाही, प्राणवायूविना उत्तर प्रदेशात झालेले असंख्य मृत्यू, गंगेमध्ये वाहणारी प्रेते, पत्रकाराविरूदध केलेला कायद्याचा वापर, पोलिसांच्या मदतीने झालेली धाकदपटशा पाहाता मतदारानेही 'आलिया भोगासी' असा विचार करून मतदान केले. द्वेषमूलक प्रचाराच्या वक्तव्याच्या सुमारे शंभर घटना घडल्या. 'स्मशान' व 'कब्रिस्तान' या शब्दांचा वारंवार वापर करण्यात आला. ''मुसलमानांच्या दाढ्या उपटा, त्यांचे शिरकाण करा,'' अशा चिथावण्या देण्यात आल्या. शेवटी भाजपच्या नेत्यांनी अशीही चिथावणी दिली, की जे भाजपला मतदान करणार नाही, त्यांच्या घरावरून बुलडोझर फिरविण्यात येतील. 'हेटस्पीच' बाबत अन्य पक्षाच्या नेत्यांना उठसूठ फटकारणारा निवडणूक आयोग भाजपच्या नेत्यांच्या 'हेटस्पीच'बाबत मात्र मूग गिळून बसला. या सगळयाचा मतदानावर परिणाम झाला. योगी यांच्या कार्यकालात त्यांनी गरिबासाठी जाहीर केलेल्या व अंमलात आणलेल्या कल्याणकारी योजना, मोदींच्या स्वच्छ भारत योजनेखातर राबविण्यात आलेले कार्यक्रम, कायदा व सुरक्षा व्यवस्था राखण्यात सरकारला आलेले यश याचा भाजपला झालेल्या मतदानावर सकारात्मक परिणाम झाला.

मोदी यांनी शेवटच्या प्रचार दौऱ्यातून आणखी एक अस्त्र सोडले होते. जनतेला उद्देशून ते पृच्छा करीत होते, ''दहशतवाद्यांनी सायकलीत स्फोटके भरून हल्ले केले होते, तीच सायकल हे समाजवादी पक्षाचे निवडणूक चिन्ह आहे. त्याला तुम्ही मतदान करणार काय.''? असाच युक्तीवाद भाजपने मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांची बदनामी करण्यासाठी सातत्याने केला. नागरी नोंदणी कायद्याविरूद्ध दिल्लीच्या शहीन बागेत मुस्लिम महिलांनी केलेल्या प्रदीर्घ आंदोलनाला व केंद्राच्या तीन कृषि कायद्यांविरूद्ध सिंघू सीमेवर तब्बल दिड वर्ष आंदोलन करणाऱ्या शेतकऱ्यांना केजरीवाल मदत व दिलासा देण्यासाठी गेले असता ते 'दहशतवादी,' 'पाकिस्तान धार्जिणे,' 'खालिस्तानी' असल्याचे जाहीर आरोप करण्यात आले होते. त्याचा पंजाबमधील मतदारांवर काही परिणाम झाला नाही. त्यांनी न केवळ भाजपला अद्दल घडविली, तर काँग्रेस व अकाली दल या पक्षांनाही धडा शिकविला.

आम आदमी पक्षाचे पंजाबचे नवे मुख्यमंत्री भगवंत सिंग मान यांच्या कारकीर्दीकडे व निर्णयांकडे आता देशाचे लक्ष असेल. ते माजी अभिनेते व विनोदवीर आहेत. शासन करताना या गुणांचा त्यांना निश्चितच उपयोग होईल. पंजाबच्या युवकांमध्ये बोकाळलेली मादक पदार्थांची नशाबाजी संपुष्टात आणून त्यांची उर्जा सकारात्मक कारणांसाठी ते कसे वापरतात, यावर त्यांची व आम आदमी पक्षाची प्रतिमा अवलंबून राहील. केजरीवाल यांच्यापुढे दर हिवाळ्यात दिल्लीच्या प्रदूषणाचे गंभीर संकट उभे राहाते. त्याला सर्वाधिक जबाबदार पंजाब व हरियानातील शेतातून तृणाला लावण्यात येणाऱ्या आगी व परिणामतः दिल्लीवर

## उत्तर प्रदेश ४०३




बहुमतासाठी आवश्यक जागा २०२

| | |
|---|---|
| ● २७४ | भाजप |
| ● ०२ | काँग्रेस |
| ● १११ | सपा |
| ● ०० | आप |
| ● ३५ | इतर |

## उत्तराखंड ७०




बहुमतासाठी आवश्यक जागा ३६

| | |
|---|---|
| ● ४८ | भाजप |
| ● १८ | काँग्रेस |
| ● ०० | सपा |
| ● ०० | आप |
| ● ०४ | इतर |

## मणिपूर ६०




बहुमतासाठी आवश्यक जागा ३१

| | |
|---|---|
| ● ३२ | भाजप |
| ● ०५ | काँग्रेस |
| ● ०० | सपा |
| ● ०० | आप |
| ● २३ | इतर |

## गोवा ४०





बहुमतासाठी आवश्यक जागा २१

| | |
|---|---|
| ● २० | भाजप |
| ● ११ | काँग्रेस |
| ● ०० | सपा |
| ● ०२ | आप |
| ● ०७ | इतर |





## पंजाब ११७




बहुमतासाठी आवश्यक जागा ५९

| | |
|---|---|
| ● ०२ | भाजप |
| ● १८ | काँग्रेस |
| ● ०० | सपा |
| ● ९२ | आप |
| ● ०५ | इतर |

पसरणारे तृणकणांची काळे सावट, हे आहे. त्यावर, मान यांनी रामबाण उपाय शोधून काढला, तर दिल्ली काय , अन्य राज्येही प्रदूषणातून वाचतील व आम आदमी पक्षाची प्रतिमा आणखी उंचावेल.

२०१४ मध्ये झालेल्या सार्वत्रिक निवडणुकीत बहुमत मिळून भाजप सत्तेवर आला, तेव्हापासून काँग्रेसची राजकीय जागा भाजपने व्यापली आहे. या निवडणुकात काँग्रेसची उरली सुरली जागाही आम आदमी पक्षाने व्यापली. २०१८ मध्ये झालेल्या विधानसभांच्या निवडणुकात काँग्रेसने मध्यप्रदेश, राजस्तान व छत्तीसगढमधील निवडणुका जिंकून तीन सरकारे स्थापन केली होती. शिवाय पंजाबमध्ये काँग्रेसची सत्ता होती. त्यापैकी मध्यप्रदेश व पंजाबमध्ये काँग्रेसने सत्ता गमविली असून, राष्ट्रीय पातळीवर काँग्रेस व आम आदमी पक्ष समान पातळीवर आले आहेत. केजरीवाल यांचे वैशिष्ट्य म्हणजे त्यांनी भाजप व काँग्रेस या दोन्ही राष्ट्रीय पक्षांना पराभूत करून पंजाबमध्ये सत्ता स्थापन केली. त्यांचा ‘एकला चलो रे’ हा प्रयोग मतदारांना भावला. याबाबत ते पश्चिम बंगालच्या ममता बॅनर्जी यांच्यापेक्षा सरस ठरले आहेत.

विधानसभांच्या ६९० मतदार संघांच्या निडणुकांचे निकाल जाहीर झाले. त्यापैकी उत्तर प्रदेशात ४०३, पंजाबमध्ये ११७, उत्तराखंडमध्ये ७०, मणिपूरमध्ये ६० व गोव्यातील ४० मतदार संघात प्रामुख्याने भारतीय जनता पक्ष विरूद्ध समाजवादी पक्ष (उप्र), आम आदमी पक्ष विरूद्ध अकाली, काँग्रेस, भाजप (पंजाब), भाजप विरूद्ध काँग्रेस (उत्तराखंड) व गोव्यात तर भाजप, काँग्रेस, आम आदमी पक्ष, तृणमूल काँग्रेस, राष्ट्रवादी काँग्रेस व स्थानीय महाराष्ट्रवादी गोमंतक पक्ष अशा सहा पक्षांनी आपलं नशीब आजमावण्याचा प्रयत्न केला. मणिपूरमधील चुरस भाजप, जनता दल (संयुक्त) नागा पीपल्स फ्रन्ट आदींमध्ये चुरस होती.

निकालांकडे पाहता, ६९० मतदार संघांपैकी भाजपला ३७६, समाजवादी पक्षाला १२४, आम आदमी पक्षाला ९५, काँग्रेस ५५, नागा पीपल्स आघाडी ७, जनता दल (संयुक्त) ६, अकाली दल ४, बहुजन समाज पक्ष ३, तृणमूल काँग्रेस २ व अन्य व अपक्ष यांना १८ जागा मिळाल्या. २०२४ मध्ये होणाऱ्या लोकसभेच्या सार्वत्रिक निवडणुकातील संभाव्य मतदान कोणत्या दिशेने जाणार, याचा अंदाज आजच वर्तविणे घाईचे होईल. पण, पंतप्रधान मोदी यांनी या निकालानंतर भाजपच्या कार्यकर्त्यांना उद्देशून केलेल्या भाषणात सांगितले, की २०१४, २०१७,२०१९ व २०२२ मध्ये लोकांनी विकासाला प्राधान्य दिलं. २०१७ च्या निकालांनी २०१९ मधील निकाल ठरविले, तसंच, २०२२ मधील निकाल २०२४ मधील निकाल ठरवितील. असे सांगताना मोदी यांनी अर्धसत्य सांगितले. कारण मतदाराने विकासापेक्षाही हिंदुत्वाला प्राधान्य दिले, हे स्पष्ट आहे. मतदान होण्यापूर्वी झालेल्या अनेक ‘एक्झिट पोल्स’ मधून व्यक्त केलेली आकडेवारी अचूक नसली, तरी मिळालेल्या जागांच्या आसपास ती पोहोचलेली दिसते.

यातून एक निष्कर्ष निघतो, तो म्हणजे, येत्या काळात भाजप, समाजवादी पक्ष व आम आदमी पक्ष या तीन पक्षांना चांगले राजकीय भवितव्य असून काँग्रेस, बहुजन समाजपक्ष, अकाली दल यांची राजकीय उतरंड ठरलेली आहे. तसेच, अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत पंतप्रधान मोदी व गृहमंत्री अमित शहा यांचा विरोध असताना अरविंद केजरीवाल यांनी न केवळ दिल्लीचे राज्य चालविले व टिकविले, परंतु पंजाबमध्ये मुसंडी मारून ११७ पैकी तब्बल ९२ जागा मिळवून भाजपसह अकाली दल, कांग्रेस यांना चितपट केले. खुद्द आप नेही त्याबाबत आश्चर्य व्यक्त केले. काँग्रेसमधील बेदिलीचा, तसेच शीख शेतकऱ्यांचा सर्वाधिक लाभ आप ला मिळाला. अकाली दलाने कृषिविधेयकांना विरोध करून काही महिन्यापूर्वी भाजपला सोडचिठ्ठी दिली होती. माजी मुख्यमंत्री कॅ.अमरिंदर सिंग यांनी पक्षाला रामराम ठोकून थेट भाजपच्या गोटात जाण्याचे ठरवून केंद्रीय नेत्यांची भेट घेतली होती. तथापि, निवडणुकात होणाऱ्या वेगवान घटनांनी त्यानंतर त्यांचे घोडे कायमचे मागे पडले.

राजकीय पक्षांना या वर्षीच नोव्हेंबर व डिसेंबरमध्ये हिमाचल व गुजरातमध्ये विधानसभेच्या निवडणुका व २०२३ मध्ये कर्नाटक, छत्तीसगढ व मध्यप्रदेशात होणाऱ्या विधानसभेच्या निवडणुकांना सामोरे जावे लागणार आहे. त्यापैकी हिमाचलल प्रदेश, गुजरात, मध्यप्रदेश व कर्नाटक राज्यांत भाजप, नागालँडमध्ये डेमोक्रॅटिक अलायन्स व भाजपचे सरकार आहे. छत्तीसगढमध्ये काँग्रेस सरकार आहे.

येत्या जुलैमध्ये राष्ट्पती पदासाठी निवडणुका नियोजित असून, त्या पदासाठी मोदी कोणत्या ज्येष्ठ नेत्याची निवड करतात हे पाहावयाचे. विरोधी पक्षांनी एकत्र येऊन संयुक्तपणे पर्यायी उमेदवार दिला, तरी ती चुरस लाक्षणिक ठरण्याची शक्यता अधिक.

भाजपच्या रणनीतिकडे पाहाता ज्या राज्यात पक्षाचा प्रभाव नाही, तेथे भाजप स्थानीय पक्षांबरोबर मैत्री करून त्यांना आपलेसे करीत आहे. उदा. ओरिसा. दरम्यान, महाराष्ट्राला भाजपने टार्गेट केले असून तेथे चाललेल्या राजकीय चिखलफेकीचा फायदा उठविण्याचा भाजपचा प्रयत्न सूरू आहे, त्यांच्या प्रयत्नांना जोर येईल. भाजपच्या गोटातून अलीकडे ‘‘अभी महाराष्ट्र बाकी’’ है अशी टिप्पणी करण्यात आली. त्याला प्रत्यूत्तर देताना राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष व ज्येष्ठ राजकीय नेते शरद पवार यानी प्रत्युत्तर देताना म्हटले आहे, ‘महाराष्ट्र भी तैयार है’ (आव्हानाला सामोरे जाण्यास तयार आहे.) हे पाहता, आगामी भविष्यकाळात विरोधी पक्षांपुढील राजकीय, शासकीय आव्हानात भर पडणार असे दिसते. या परिस्थितीत देशाच्या संघराज्यात्मक व घटनात्मक मूल्यांचे हनन होऊ नये, यासाठी विरोधी पक्षांना जागरूक राहावे लागेल. ●●●

**समाप्त..**

***(लेखक दिल्लीस्थित ज्येष्ठ पत्रकार आहेत)***

# राजकारणाचे ध्रुवीकरण...

काँग्रेसची मते आपल्याकडे खेचत ज्या प्रमाणे पश्चिम बंगालमध्ये तृणमूल काँग्रेस नावाचा पक्ष बळकट झाला, तीच जागा आता आम आदमी पक्ष घेईल, अशी अटकळ बांधली जात आहे. **मोदी-शहा यांची जोडी अधिक बळकट झाल्याने, घटनात्मक चौकट, हिंदुत्ववादाकडे मतदारांचे ध्रुवीकरण अशी वेगवेगळी नॅरेटिव्ह मांडली जात आहेत.**

**भास्कर नाशिककर**

उत्तर प्रदेश, देवभूमी उत्तराखंड, मणिपूर आणि गोवा या चारही राज्यांच्या विधानसभांची निवडणूक जिंकून केंद्रातील सत्ताधारी भारतीय जनता पक्षाने आपले एकहाती वर्चस्व सिद्ध केले आहे. पंजाबमध्ये काँग्रेसच्या हातातून सत्ता हिसकावून घेत दिल्लीचे मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांच्या आम आदमी पक्षाने अल्पावधीत दिल्लीबाहेर सत्ता हस्तगत करून देशाच्या राजकारणात कितीही हेटाळणी झाली तरी आपणही प्रभावी आहोत, हे दाखवून दिले आहे. कोरोनाने दोन वर्षे ठाण मांडले आहे. तिसऱ्या लाटेच्या वातावरणात या पाचही राज्यातील निवडणूक प्रक्रियेला प्रारंभ झाला होता. तरीही त्यावर मात करत निवडणूक आयोगाने प्रक्रिया यशस्वीपणे पार पाडली. सत्ताधारी भाजप आणि विशेषतः पक्षाचे नेते आणि पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि त्याचे उजवे हात मानल्या गेलेल्या गृहमंत्री अमित शहा यांच्या दृष्टीने तसेच उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री आदित्यनाथ यांच्यासाठी ही निवडणूक खूप महत्त्वाची होती. तथापि, अनेकांचे अंदाज फोल ठरवत आदित्यनाथांनी पुन्हा सलग दुसऱ्यांदा उत्तर प्रदेशची सत्ता खेचून आणून इतिहास घडवला आहे. अशी संधी कुठल्याही मुख्यमंत्र्याला देश स्वतंत्र झाल्यापासून मिळाली नव्हती. त्याचबरोबर एकच पक्ष पुन्हा सत्तेत सलग येत नाही, ही तीन दशकांची परंपराही यानिमित्ताने खंडीत झाली आहे. या निकालाचे विश्लेषण हे अनेक अंगांनी, दृष्टीकोनातून केले जात आहे. भारतीय जनता पक्षाच्या यशाने देशाच्या राजकारणाचा ध्रुवावर नवा बिंदू भाजपच्या रुपाने निर्माण झाला आहे. काँग्रेसची जागा भाजपने घेतली असून, त्याभोवती देशाचे राजकारण फिरेल, असे होरा लावला जात आहे. काँग्रेसची मते आपल्याकडे खेचत ज्या प्रमाणे पश्चिम बंगालमध्ये तृणमूल काँग्रेस नावाचा पक्ष बळकट झाला, तीच जागा आता आम आदमी पक्ष घेईल, अशी अटकळ बांधली जात आहे. मोदी-शहा यांची जोडी अधिक बळकट झाल्याने, घटनात्मक चौकट, हिंदुत्ववादाकडे मतदारांचे ध्रुवीकरण अशी वेगवेगळी



नॅरेटिव्ह मांडली जात आहेत. कोणतीही घटना घडली की, तिची चिकित्सा करून, त्यामागील इंगीत समजून घ्यावे लागते. या निवडणुकीनंतर तर अशा स्वरुपाची विविध प्रकारची नॅरेटिव्ह मांडून देशाच्या राजकारणाची आगामी दिशा, भाजप, आपचे त्या काळातील संभाव्य वाटचाल आणि काँग्रेसच्या अस्तित्वावर आणि त्यातही त्याच्या नेतृत्वाविषयी असलेल्या प्रश्नांभोवतीही अनेकानेक बाबी पुढे येत आहेत. तूर्त तरी, काँग्रेसच्या नेतृत्वाची धुरा सोनिया गांधींकडे म्हणजेच गांधी घराण्याकडे काम राहील, असे दिसते. हे सगळे समजून घेण्याआधी राज्याराज्यातील या निकालावर नजर टाकल्यास वेगवेगळी नॅरेटिव्ह समजून घेणे अधिक सुकर होणार आहे.

## राशन, भाषण, कडा प्रशासन

उत्तर प्रदेश हे देशातील सगळ्यात मोठे राज्य. लोकसभेत राज्यातून ८० खासदार पाठवले जातात. विधानसभेतील आमदारांची संख्या ४०३ आहे. राज्यात योगी आदित्यनाथ यांच्या नेतृत्वाखाली भाजपचे सरकार होते. राशन, भाषण आणि कडा प्रशासन या सूत्रांभोवती भाजपच्या प्रचाराचा माहोल होता. कोरोना काळात मोठ्या प्रमाणात स्थलांतर झाले. देशाच्या विविध भागात पोटासाठी गेलेली मंडळी गावी परतल्याने, बेरोजगारीचा प्रश्न गंभीर होता. तथापि, दर महिन्याला ३०० कोटी रुपयांचे मोफत रेशन दिले जात होते. त्यात गहू, तांदूळ, डाळींशिवाय



तेलही होते. काहींच्या पाकिटावर मोदींचे छायाचित्रही होते. गरिब कल्याण योजनेतील मोफत राशनबरोबर योगी आदित्यनाथ यांच्या सरकारने राबवलेल्या कल्याणकारी योजना, जसे की, महिलांसाठी उज्ज्वला, पंतप्रधान सम्मान योजना, नल से जल आणि सगळ्यांत महत्त्वाचे म्हणजे विविध योजनांच्या लाभार्थ्यांच्या खात्यात थेट त्याची रक्कम जमा होणे अशा उपाययोजना आणि त्याचा फायदा यामुळे भाजपचे नेते आणि कार्यकर्ते कल्याणकारी योजनेतून लाभार्थी नावाचा नवा मतदारगट तयार केला गेला. तो जातीपातीपलीकडे होता. सवर्णांपासून ते इतर मागास, मागास अशा सगळ्यांत तो विभागला गेला होता. त्यापुढे समाजवादी पक्षाचे नेते अखिलेश यादव यांच्या यादव, मुस्लिम आणि इतर मागास आणि मागास जातींची, त्यातही त्यांच्या नेत्यांची बांधली गेलेली मोट निष्प्रभ ठरली आणि पुन्हा आदित्यनाथांमागे मतदार गेले, हे निकालातून दिसलेले वास्तव आहे.

## महिलांवर प्रभाव

महिला मतदारांना आपलेसे करण्याचा प्रयत्न काँग्रेसने केला होता. लडकी हूं, लढ सकती हूं असे घोषवाक्य देत काँग्रेसच्या नेत्या प्रियंका गांधीनी प्रचारयंत्रणा राबवली होती. महिलांना उमेदवारीही दिली होती. तथापि, काँग्रेसची ही खेळी त्यांना दोन जागा जिंकण्यापलीकडे यश देवू शकली नाही. अर्थात, पश्चिम बंगालमध्ये ममता बॅनर्जींनी विधानसभेच्या निवडणुकीत त्यांच्या तृणमूल काँग्रेसने महिलांना पूरक योजना राबवून यश खेचून आणले होते. शेजारील ओडिशात बिजू जनता दलाच्या नवीन पटनाईक यांनी महिलांना ४० टक्के जागांचे सूत्र राबवून यशाला गवसणी घातली होती. मोदी, आदित्यनाथ यांनी वेगळ्या पद्धतीने हेच तंत्र राबवून यश संपादले हे खरे.

## बुलडोझरची प्रतिमा आणि प्रतिभा

कायदा आणि सुव्यवस्थेबाबत आदित्यनाथांची बुलडोझर अशी प्रतिमा निर्माण केली गेली. त्यांनी एन्काऊंटर राज निर्माण केले. चारशेवर एन्काऊंटर त्यांच्या काळात झाले. हाथरस, उनावसारखे काळीमा फासणारे बलात्काराचे प्रकार घडले. विकास दुबे या ब्राह्मण समाजातील गुंडाचा एन्काऊंटर केला गेला. त्याचे पाच साथीदारही मारले गेले. सीएए, एनआरसी असो नाहीतर शेतकरी आंदोलन, लखीमपूर खेरीसारखी घटना या सगळ्यांबाबत आदित्यनाथांना विरोधकांनी लक्ष्य केले, तर समर्थकांनी आदित्यनाथांनी बाहुबलींना रोखले, त्यांना चाप लावून कायद्याचे राज्य आणले असे सांगितले गेले. वादातील या प्रतिमेतही त्यांची बुलडोझर प्रतिमा उजवी ठरल्याचे निकालाने दाखवून दिले.

अर्थात, भाजपने खूप आधीपासून राबवलेली निवडणूक यंत्रणा, प्रचाराची सुप्त पद्धती, विकासकामांची उद्घाटने आणि भूमीपूजनाद्वारे मतदारांवर प्रभाव टाकणे, केवळ महाप्रकल्पच



समाजवादीत डेरेदाखल झाले. पण त्यांना निवडूनही येता आले नाही. थोडक्यात, सत्तेचा सोपान गाठण्यासाठी हिंदू मतांकडे डोळेझाक करणे महागात पडू शकते, हा धडा समाजवादीला मिळाला आहे. अखिलेश यांच्या सभा गर्दी खेचायच्या, पण त्याचे मतांत रुपांतर दिसले नाही.

२०१७ मधील निवडणुकीत, भाजपला ३१२, अपना दलला ९, सुहेलदेव भारतीय समाज काँग्रेसला ४ तर विरोधी समाजवादीला ४७, बहुजन समाज पक्षाला १९, काँग्रेसला ७ आणि इतरांना आठ जागा मिळाल्या होत्या. यावेळी भाजपला २७३ (४१.६ टक्के मते) जागा, समाजवादीला १२५ (३२ टक्के), काँग्रेसला दोन (२.३८ टक्के), बहुजन समाज पक्षाला १ (१२.८ टक्के), राष्ट्रीय लोकदल (३.०२ टक्के मते) जागा मिळाल्या आहेत.कुर्मी आणि अतिमागास जाती भाजपमागे राहिल्या, त्यांनी अनुक्रमे ५८ आणि ६५ टक्के मते भाजपच्या पारड्यात टाकली, त्याऐवजी समाजवादीला अनुक्रमे २५ आणि २२ टक्के मते मिळाली आहेत. भाजपने उच्च जातींना १७३, ठाकूर, राजपूत ७१, ब्राह्मण ६८, इतर मागासांना १४३ जागांवर उमेदवारी दिली होती. तर समाजवादीने इतर मागासांना १७१, यादव ५२, कुर्मी ३७, मुस्लिम ६३ आणि ब्राह्मण ३९ उमेदवार दिले होते. जाटव, चामरमध्ये ४२ उमेदवार होते. उमेदवारीचे हे चित्र पाहिले तरी निकालाचे उमटलेले पडसाद लक्षात येतात.

## मायावतींचे पानीपत

बहुजन समाज पक्षाच्या माध्यमातून मायावती यांनी उत्तर प्रदेशवर राज्य केले होते. त्या काळात त्यांनी अनेक जिल्ह्यांची, संस्थांची नावे बदलणे, कोट्यवधी रुपये खर्चून महाप्रचंड अशी स्मारके उभारणे, त्यात त्यांची स्वतःचीही स्मारके होते, याचा तडाखा लावला होता. मायावतींचा एकेकाळी उत्तर प्रदेशासह देशाच्या राजकारणावर दरारा होता. तो पुरता धुळीला मिळाल्याचे या निवडणुकीत दिसून आले. २००२ मध्ये २०६ जागा जिंकणाऱ्या मायावतींच्या बहुजन समाज पक्षाला केवळ एका जागेवर (१२.८५ टक्के मते) समाधान मानावे लागले आहे. या निवडणुकीत केवळ १८ जाहीर प्रचारसभा घेणाऱ्या मायावतींचा जनतेशी असलेला संपर्क तुटल्याचा हा परिणाम आहे. चांगले सरकार, विकासाची त्यांची भाषा कुठे जाणवलीच नाही. हाथी नहीं गणेश हैं किंवा जातीविषयक त्यांची घोषणा प्रभावहीन ठरल्याचे या निवडणुकीने दाखवून दिले आहे.

प्रियंका गांधींच्या नेतृत्वाखाली काँग्रेस लढली, पण ती अपेक्षित परिणाम दाखवू शकली नाही. महिलांचे कार्ड त्यांनी वापरले, घराघरांत चांगला कार्यक्रम देत शिरण्याचा त्यांचा प्रयत्न फलद्रूप होऊ शकला नाही. काँग्रेसला पुरत्या नामुष्कीला सामोरे जावे लागले.

## पंजाबात 'आप'च बाप

अंतर्गत गृहकलहाने निवडणुकीच्या आधी सहा महिन्यांपासून पंजाबातील सत्ताधारी काँग्रेस पक्ष पुरता बेजार होता.

नव्हे तर अगदी जिल्हा, शहर आणि गावपातळीपर्यंत ही कामांची रेलचेल करून मतदारांवर निवडणुका जाहीर होण्याआधीच प्रभाव टाकला होता. आयोध्येत राममंदिराची उभारणी असो नाही तर मोदींचा मतदारसंघ वाराणशीतील काशी विश्वेश्वर कॉरिडॉर याद्वारे हिंदू मतांचे आपसूक ध्रुवीकरण केले गेले. आदित्यनाथ आणि भाजपचे फायरब्रँड युवक नेत्यांनी आपल्या भाषणातून अनेकदा आक्रमक, हिंदुत्ववादी आणि काही वेळ द्वेषमूलक जहाल वक्तव्य करत मतदारांवर प्रभाव टाकला होता. त्या सगळ्यांचा परिणाम म्हणून उत्तर प्रदेशातील सत्तेच्या चाव्या पुन्हा भाजपच्या हातात गेल्या आहेत, हे वास्तव आहे. तथापि, त्यांच्या जागा घटल्या आहेत, याचा आत्मशोध भाजपने आणि त्यामुळे झालेल्या राजकीय लाभाचा अर्थ विशेषतः भाजपविरोधात दंड थोपटलेल्या समाजवादी पक्षाने अर्थ समजून घेतला पाहिजे.

## समाजवादीची चांगली कामगिरी

'सोच इमानदार काम दमदार' सांगत आदित्यनाथांनी केलेल्या प्रचाराला समाजवादी पक्षाचे नेते अखिलेश यादव यांनी मोठी टक्कर दिली. समाजवादी पक्षाची आतापर्यंतची सर्वात चांगली कामगिरी या निवडणुकीत दिसून आली आहे. यादव, मुस्लिम, ओबीसी मतांची मोट बांधून ती अभेद्य ठेवण्यात त्यांना यश मिळाले हे निर्विवाद. स्वामीप्रसाद मौर्य, दारासिंह चौहान, धरमसिंह सैनी यांसारखे नेते निवडणुकीच्या तोंडावर भाजप सोडून

मुख्यमंत्रीपदावरून कॅप्टन अमरिंदरसिंग यांना हटवूनही त्यांचे विरोधक नवज्योत सिद्धू यांचा आत्मा थंड झाला नव्हता. त्यांना पक्षाचे प्रदेशाध्यक्ष केले, चरणजितसिंग चन्नी या दलित समाजातील व्यक्तीला मुख्यमंत्रीपदी आणले तरी काँग्रेसमधील कुरघोडीचे आणि मानापमानाचे नाट्य निवडणुका सुरू होत्या तरी कायम होते. या पक्षांतर्गत बेबनावाचा फटका काँग्रेसला मोठा बसला. त्यांची सत्ता तर गेलीच, पण गेली २५ वर्षे असलेले वर्चस्वही गमवावे लागले. ११७ सदस्यांचा सभागृहात आम आदमी पक्षाने ९२ जागा पटकावून आपले एकहाती वर्चस्व दाखवून दिले. गेल्या निवडणुकीत ७७ जागा पटकावणाऱ्या काँग्रेसला केवळ १८ जागांवर समाधान मानावे लागले. शिरोमणी अकाली दलाला ३, भाजपला २ आणि इतरांना २ जागा मिळाल्या. पंजाबच्या ज्या माळवा भागातून काँग्रेसला ६९ पैकी ४० जागा जिंकणाऱ्या काँग्रेसला केवळ २ जागांवर समाधान मानावे लागले. अमृतसर आणि परिसराच्या माझा भागातील २५ पैकी केवळ ६ जागा काँग्रेस मिळवू शकली, गेल्यावेळी येथून २२ जागा मिळाल्या होत्या. जालंदर आणि परिसर असलेल्या दोआबने काँग्रेसची काहीशी लाज राखली, तेथील २३ पैकी १० जागा काँग्रेसच्या पदरात पडल्या. मुख्यमंत्री चन्नी, नवज्योत सिद्धू, ८ कॅबिनेट मंत्री यांना पराभवाची पुरती धूळ चाखावी लागली. शिरोमणी अकाली दल हा पंजाबातील प्रभावी प्रादेशिक पक्ष. त्याचे नेते आणि माजी मुख्यमंत्री प्रकाशसिंग बादल, त्यांचे पुत्र आणि माजी मुख्यमंत्री सुखबीरसिंग बादल यांच्यासह शिरोमणीच्या अनेक नेत्यांना पराभूत व्हावे लागले. शिवसेनेइतकाच भाजपचा जुना मित्र असलेला हा पक्ष शेतकरी आंदोलनावेळी राष्ट्रीय लोकशाही आघाडीतून बाहेर पडला होता. त्याची या निवडणुकीत पुरती धूळधाण झाली.

एका अर्थाने आम आदमी पक्षाने काँग्रेसला येथे चारी मुंड्या चीत केले. काँग्रेसची मते आपल्याकडे वळवून आपण काँग्रेसच्या पाठिराख्यांना भाजप व्यतिरिक्त समर्थ पर्याय देऊ शकतो, हे दाखवून दिले. दिल्लीत अरविंद केजरीवाल यांच्या नेतृत्वाखाली आपने आपले वर्चस्व आणि कल्याणकारी राज्य आपण प्रभावीपणे राबवून जनतेच्या आशा आकांक्षाचे चीज करू शकतो, हे दाखवून दिले होते. तोच अजेंडा घेऊन दिल्लीशेजारील पंजाबात आपने मुसंडी मारली आहे. मोफत वीज, आरोग्य सुविधा, दर्जेदार शाळा, शेतीपंपांना मुबलक वीज, पारदर्शी कारभार अशा अनेक घोषणा केल्या होत्या. स्वतः केजरीवाल यांनी दलित उपमुख्यमंत्री देण्याचे सुतोवाच केले होते, त्या दरम्यान काँग्रेसने चन्नींना सत्तेवर आणले. गेल्या निवडणुकीत येथे आप विरोधी पक्ष झाला होता, पण त्यांनी मुख्यमंत्रीपदाचा चेहरा जाहीर केला नव्हता. ती चूक सुधारत भगवतसिंह मान यांना मुख्यमंत्रीपदाचा चेहेरा जाहीर केला होता. त्यांची लोकप्रियता आणि विरोधकांनी त्यांच्यावर केलेली टीका या सगळ्याचा फायदा आम आदमी पक्षाला सत्तेवर आणणारा ठरला. सिद्धू आणि त्यांचे विरोध अकाली नेते मजिठिया यांना आपच्या पॅडमॅन महिला उमेदवार जीवन जोत कौर यांच्याकडून पराभूत व्हावे लागले.

या निवडणुकीत चन्नी यांच्यासह उत्तराखंडचे मुख्यमंत्री प्रकाशसिंग धामी या दोन विद्यमान मुख्यमंत्र्यांसह प्रकाशसिंग बादल, सुखबीरसिंग बादल, हरीश रावत (काँग्रेस, उत्तराखंड), अमरिंदरसिंग (पतियाळा) अशा पाच माजी मुख्यमंत्र्यांना परभाव सोसावा लागला आहे.

## गड आला पण सिंह गेला

देवभूमी उत्तराखंडमध्ये उत्तर प्रदेशची पुनरावृत्ती झाली. पण येथे भाजपची अवस्था 'गड आला पण सिंह गेला' अशी झाली आहे. भाजपचे मुख्यमंत्री प्रकाशसिंह धामी यांना खातिमा मतदारसंघातून पराभवाला सामोरे जावे लागले. पण गेली वर्षेभर तीनदा मुख्यमंत्री बदलणे, कुंभमेळा आयोजनात झालेल्या गैरव्यवहाराने डागळलेली प्रतिमा सुधारण्याचे आव्हान धामी यांच्यासमोर होते. त्यात ते यशस्वी झाले. केदारनाथ आणि बद्रिनाथ या देवस्थानांचा विकास, कामकाजात सुधारणा यावर भर दिला होता. तसेच राज्यात महामार्गाचे जाळे निर्माण करणे, रेल्वेचे नवे मार्ग करणे या सगळ्याचा फायदा भाजपच्या पदरात पडला आहे. डबल इंजिन ही संकल्पना भाजपने उत्तर प्रदेश, उत्तराखंड, गोवा आणि मणिपूर या तीनही राज्यात राबवली. डबल इंजिन म्हणजे केंद्रात भाजपचे सरकार आहे, राज्यात भाजपचेच सरकार आले तर कामकाज चांगल्या प्रकारे करता येईल, ही भूमिका होती. त्याचा प्रभाव या सगळ्या ठिकाणी जाणवला. उत्तराखंडमध्ये भाजप त्या बळावर पुन्हा सत्तेत येऊ शकला आहे. येथे ७० पैकी ४७ जागा भाजपने, काँग्रेसने १९, बसपने २ आणि इतरांनी २ जागा पटकावल्या. तर पर्याय देण्याची भाषा करणाऱ्या आम आदमी पक्षाला येथे एकही जागा जिंकता आली नाही. त्यांचे मुख्यमंत्रीपदाचे उमेदवार कर्नल अजय कोठियाल यांना गंगोत्रीतून पराभूत व्हावे लागले. काँग्रेसमध्ये सुरवातीला नेतृत्वावरून आणि मुख्यमंत्री कोण होणार यावरून धुसफूस होते. हरिश रावत हे ज्येष्ठ नेते रूसले होते. अखेर त्यांच्याकडे नेतृत्वाची धुरा दिल्यावर ते रिंगणात उतरले. पण रावत यांनाही यावेळी पराभवाला सामोरे जावे लागले.

## पुन्हा बीरेनसिंगच

मणिपूर आणि गोवा या दोन राज्यात काँग्रेसला भाजपपेक्षा अधिक जागा २०१७ च्या निवडणुकीत मिळाल्या होत्या. तथापि, भाजपने तिथे जागांचे गणित जमवत सत्तेची सूत्रे पटकावली होती. यावेळी मणिपूरमधील ६० पैकी ३२ (२०१७ मध्ये २१) जागा पटकावत भाजपने बहुमताने सत्ता मिळवली आहे. येथे काँग्रेसला केवळ ५ (२८) जागा मिळाल्या. नॅशनल पीपल्स पार्टीला (एनपीपी) ७ (४), संयुक्त जनता दलाला ६ (०) आणि इतरांना १० जागा मिळाल्या आहेत. कोणेएकेकाळी एन. बीरेनसिंग हे काँग्रेसमध्ये होते. ते काँग्रेसचे मुख्यमंत्री इबोबी सिंग यांचे उजवे हात मानले जात होते. त्यांच्या मंत्रीमंडळात मंत्री होते. तथापि, २०१६ मध्ये त्यांनी काँग्रेसला रामराम ठोकत इबोबीसिंग यांची साथ सोडली होती. ते भारतीय जनता पक्षात

दाखल झाले होते. त्यावेळेपासून ते भाजपचे मणिपूरमधील चेहरा बनले आहेत. फूटबॉलपटू, पत्रकार आणि संपादक अशा भूमिका निभावलेले बीरेनसिंग यांनी २०१७ च्या निवडणुकीनंतर काँग्रेसमधील विजेत्या आमदारांना आपल्या पक्षाकडे वळवत सर्वाधिक जागा मिळालेल्या काँग्रेसला सत्तेवर येण्यापासून रोखले होते. त्यावेळेपासून सत्तेची सूत्रे बीरेनसिंग यांच्याकडे आहेत. त्यांच्या नेतृत्वाखाली भाजपने पुन्हा एकदा रिंगणात उतरून स्पष्ट बहुमत मिळवले आहे. येथेही काँग्रेसची पुरती धुळधाण झाली आहे. लोकाभिमुख प्रशासन, दऱ्याखोऱ्या आणि डोंगरावरील माणूस ते वांशिक भेद या भेदाच्या भिंती संपवण्यात बीरेनसिंग यांनी मोठी कामगिरी केली. दळणवळण, नागरी सुविधा देण्यातही आघाडी घेतली. या सगळ्याचा परिणाम म्हणून मणिपूरमध्ये पुन्हा भाजपचा झेंडा फडकला आहे.

## लाभार्थी नावाची मतपेढी

एकूण या निवडणुकीकडे आणि तिच्या निकालाकडे पाहता, भारतीय राजकारणातील जातीपातीच्या भेदापलीकडे मतदारांचा प्रभाव जाताना दिसत आहे, असे म्हटल्यास वावगे ठरणार नाही. जातीपातीची बेरीज-वजाबाकीची गणिते मांडून विजयाची आकडेवारी मांडता येणार नाही, हे निकालाने दाखवून दिले आहे. जनतेला त्याहीपलीकडे जावून थेट आपल्याला कोण काय देतो आहे, हे महत्त्वाचे वाटताना दिसत आहे. एकेकाळी सरकारी योजनांसाठी खेटे घालावे लागायचे, सत्ताधाऱ्यांची मनधरणी करावी लागायची. आता तसे करण्याची गरज नाही, लाभाचे माप खात्यात जमा होत आहे, याची खात्री पटली आहे. त्यामुळे कल्याणकारी योजना आणि त्याची उपयुक्तता पटलेला घटक, लाभार्थी या नावाने समोर आलेला आहे. त्याचा भाजपने आपल्याकडे मते वळवण्यासाठी पुरेपूर वापर केला आणि सत्ता हस्तगत केल्याचे दिसत आहे.

आणखी एक महत्त्वाचा बदल दिसला तो बहुसंख्याकवादाचा. त्याला काहीजण हिंदुत्ववादही म्हणतील. भाजपने बहुसंख्यांक असणे, त्यांचे हितरक्षण करणे, त्यांना हवे तसे निर्णय घेऊन कार्यवाहीत आणणे काही गैर नाही, असेही दाखवून दिले. उच्चरवाने त्यावर चर्चाही होत आहेत. धर्मनिरपेक्ष देशात हे बरोबर की चुकीचे हा वादाचा मुद्दा काहीजण उपस्थित करतील. तथापि, त्या स्वरुपाचे नॅरेटिव्ह मांडले गेल्यास मतदारांचा एक मोठा गट त्याच्या बाजूने उभा राहू शकतो, त्याचा पाठिराखा होऊ शकतो, हे निदर्शनाला आले आहे. यामुळे देशाच्या एकात्मेतचा, अखंडतेचा मुद्दाही काही जण उपस्थित करतील. पण लोकशाही व्यवस्थेत हे वास्तव आकाराला आलेले आहे. एका अर्थाने हे मतांचे ध्रुवीकरण आहे. त्यातूनच कोणेएकेकाळी काँग्रेस आणि त्याचे विरोधक असे दोन ध्रुव भारतीय राजकारणात दिसत होते. आता काँग्रेसची जागा भाजपने घेतलेली आहे. भारतीय जनता पक्ष आणि त्याचे विरोधक असा राजकीय पट यानिमित्ताने आकाराला येताना दिसत आहे. आगामी काळात ही मांडणी अधिक उठावदार होताना दिसू शकते. प्रादेशिक पक्षाना यामुळे नवा धडा मिळालेला आहे. अर्थात, दक्षिणेतील राज्यातील प्रादेशिक पक्ष आणि त्यांचे कामकाज यात वेगळेपण आहे.

## उगवते तारे योगी, केजरीवाल

यानिमित्ताने मोदी-शहा यांचे नेतृत्व अधिक उठावदार झाले आहे. मोदी यांची लोकप्रियता वादातीत आहे. त्यांचा मोठा करिश्मा जनतेवर आहे. त्यांना पाहून लोक भाजपला मते देतात, अशा वेळी वाढती बेरोजगारी, महागाई, आरोग्य, शिक्षण हे मुद्देही मागे पडतात. त्यांच्या जोडीला योगी आदित्यनाथ आणि अरविंद केजरीवाल हे दोन चेहरे देशाच्या राजकीय नकाशावरील उगवते तारे ठरू शकतात, हेही निवडणुकीने अधोरेखित होते. केजरीवाल यांनी उत्तर प्रदेश, उत्तराखंड, गोव्यात मिळवलेली मते, पंजाबातील मिळवलेली सत्ता महत्त्वाची आहे. पंजाबातील जनता काँग्रेस, अकाली दल यासारख्या परंपरागत पक्षांना कंटाळली होती. तिने नवा प्रयोग, नव्यांना संधी म्हणून आम आदमी पक्षाच्या पदरात आपली मते टाकली आहेत. या सगळ्या रचनेतून लोकशाही व्यवस्था आणि तिचे बळकटीकरण होणार की ती अधिक तकलादू किंवा निवडणुकीपुरती राहणार असा प्रश्न काही अभ्यासक करत आहेत. तथापि, व्यवस्थेच्या जडणघडणीतील हे अपरिहार्य पर्व म्हणून या कडे पाहावे लागेल.

## जनाधार तुटलेली काँग्रेस

आणखी महत्त्वाचा भाग आहे तो काँग्रेस या दिडशे वर्षे जुन्या पक्षाच्या आणि त्याच्या नेतृत्वाच्या अस्तित्वाचा. राजस्थान आणि छत्तीसगड वगळता या राष्ट्रीय पक्षाची कोठेही एकहाती सत्ता नाही. महाराष्ट्र, झारखंडमध्ये ते आघाडीत आहेत. पक्षातील बुजुर्ग नेतृत्वाबाबत कुरबूर करत असले तरी त्याची दखल काही घेतली जात नाही. राहूल आणि प्रियंका हे भाऊ-बहीण काँग्रेसला खंबीर, भक्कम आणि निवडणुकीत विजयी करणारे नेतृत्व देऊ शकत नाहीत, हेही पुन्हा एकदा यानिमित्ताने सिद्ध झाले आहे. त्याच्याच जोडीला काँग्रेसचा जनाधार तुटत आहेत. नेते पक्षाला सोडत आहेत. नवीन युवक पिढी पक्षाकडे आकर्षित होत नाही. त्यांच्यासाठी नेतृत्वही काही कार्यक्रम देऊन त्यांच्यात आशावाद भरू शकत नाही, असे दिसून आले आहे. त्यावर तोडगा निघणेची प्रतीक्षा सुरू आहे.

आगामी काळात राष्ट्रपतीपदाची आणि डिसेंबर मध्ये गुजरात आणि हिमाचल प्रदेश यांच्या विधानसभांच्या निवडणुका आहेत. त्यानंतर २०२४ मध्ये सार्वत्रिक निवडणूक होईल. त्या पार्श्वभूमीवर हा निकाल भाजपला बळ देणारा आणि विरोधकांना आत्मपरीक्षण करायला लावणारा आहे, असे म्हणावे लागेल. तथापि, विजयाचे सूत्र आणि त्याचे गणित भाजपला चांगलेच गवसले आहे. त्याची तयारी खूपच पद्धतशीरपणे, आधुनिक साधनांचा, सामग्रीचा वापर करण्यात पक्ष माहीर आहे. मोदी यांनी निकाल लागत असतानाच गुजरातेत दौरे सुरू केले आहेत. हे दुर्लक्षित करून चालणार नाही.

**(लेखक समकालिन विषयाचे अभ्यासक आहेत)** ●●●

# यूपीचा निकाल : वास्तवाकडून भ्रमाकडे



**प्रा. नागार्जुन वाडेकर**

नुकत्याच पाच राज्यांत पार पडलेल्या निवडणुकांत उत्तर प्रदेशची निवडणूक सर्वाधिक लक्षवेधी ठरली. विकासाच्या मुद्यावर मते मागणाऱ्या भाजपने सुरुवातीलाच धार्मिक ध्रुवीकरणाचा आधार घेण्याचा प्रयत्न केला. निवडणुकीच्या रिंगणात विरोधी पक्ष उशिराने आला असला तरी सताधारी भाजपला सत्तेतून खाली खेचण्यासाठी जनतेनेच विरोधी पक्षाची भूमिका निभावली, असे या निवडणुकीत नव्यानेच दिसले. असंख्य गंभीर प्रश्न असताना, लोकांच्या रोजच्या जगण्याच्या आणि मरणाच्याही प्रश्नांची सोडवणूक न करता भाजप सहजपणे बहुमताने निवडून आली आहे. कोणत्याही सरकारकडून लोकांच्या असलेल्या अपेक्षा दिवसेंदिवस बदलत आहेत. लोकांच्या मुलभूत हक्कांचे आणि सामाजिक न्यायाचे रक्षण होण्यासाठी लोकशाही आपल्या सामाजिक, सांस्कृतिक जीवनाचा भाग बनणे आवश्यक झाले आहे. निवडणुकांच्या राजकारणातून संवेदनशील आणि दूरदृष्टी असणारे नेतृत्व आले तरच विकासाची सर्वांना समान संधी असलेला देश घडेल ... उत्तर प्रदेशातील निवडणूक बदलाचे हत्यार न ठरता जनतेला त्यांच्याच खऱ्या प्रश्नांपासून दूर नेणारी ही आणखीन एक निवडणूक ठरली, त्याबद्दल ..

भारतातील उत्तर प्रदेश, उत्तराखंड, पंजाब, गोवा आणि मणिपूर या पाच घटक राज्यांतील विधानसभा निवडणुका शांततेत पार पडल्या. १० फेब्रुवारी रोजी सुरु झालेल्या प्रदीर्घ निवडणुकीचा निकाल १० मार्चला आला. उत्तर प्रदेशातील निवडणुकीचा निकाल जनतेला त्यांच्याच रोजच्या जगण्यातील प्रश्नांपासून आणखीनच दूर नेणारा ठरला, तो कसा ते पाहू.

तब्बल ४०३ आमदार असणारे उत्तर प्रदेश देशातील सर्वात मोठे राज्य. म्हणून ते देशाच्या एकूण राजकारणावर तसेच राज्यसभा आणि राष्ट्रपती निवडणुकीवर मोठा परिणाम करणारे आहे. पण मानव विकास निर्देशांकात सातत्याने खूप खाली राहिलेले राज्य आहे उत्तर प्रदेश. २०१८ च्या आकडेवारीनुसार उत्तर प्रदेशचा त्यात शेवटून दुसरा क्रमांक लागतो! (पहिल्या क्रमांकावर केरळ आहे). लोकशाही आणि शांतता हातात हात घालून चालणाऱ्या गोष्टी आहेत. शांतता असेल तर विकास होतो, गुंतवणूक होते, लोकांच्या जीवनाचा दर्जा सुधारतो. पण

शांततेने लोकांच्या जीवनात सकारात्मक बदल घडवून आणणारा विकास करण्याची राजकीय इच्छाशक्ती आणि दूरदृष्टी असलेला पक्ष सत्तेत असेल तर ते सहज शक्य होते. हे यापूर्वी भारताने अनुभवले आहे.

२०१४ साली प्रचंड जाहिरातींच्या लाटेच्या जोरावर केंद्रात भाजपची सत्ता आली. त्याच लाटेत २०१७ साली उत्तर प्रदेश विधानसभेतसुद्धा भाजप सत्तेत आली. २०१९ च्या लोकसभा निवडणुकीतील राष्ट्रवादाच्या लाटेवर भाजप दुसऱ्यांदा केंद्रात आली. भाजपने सत्तेत आल्याबरोबर २०१४ पासूनच देशभर आणि २०१७ नंतर उत्तर प्रदेशात प्रखरपणे आपला हिंदुत्वाचा अजेंडा राबवायला सुरुवात केली. त्यातील बहुतेक मुद्दे धार्मिक ध्रुवीकरण करणारे म्हणजेच लोकशाही विरोधातील होते. शेतकरी, कामगार, महिला, युवक, दलित, आदिवासी, ओबीसी, मागासवर्गीय आणि अल्पसंख्यांकांच्या मानवी हक्कांना पायदळी तुडवणारे होते. त्यातून मागील सात वर्षात काय सामाजिक-राजकीय आर्थिक परिस्थिती निर्माण करण्यात आली होती, त्यावर एकदा नजर टाकूयात.

नोटबंदी, जीएसटी कर प्रणाली, सर्जिकल स्ट्राईक, पुलवामा, काश्मीरमधील ३७० कलम रद्द, चीनची डोकलाममध्ये घुसखोरी, राफेल विमान खरेदी, ट्रिपल तलाक रद्द, सीएएएनआर कायदा, सीबीआय-ईडीचा गैरवापर, शेकडो मानवी हक्क कार्यकर्ते, राजकीय नेते, पत्रकार यांच्यावर एनएसएसारख्या कायद्याखाली अटक, राम मंदिर निर्माण, हरिद्वार धर्मसंसद, धर्मांतर बंदी कायदा, घरवापसी, शबरीमला मंदिर महिला प्रवेश बंदी प्रकरण, लव्ह जिहाद, गौहत्या बंदी कायदा, मॉब लिंचिंग, रोमिओ स्क्वाड, कोविड महामारीची हाताळणी, लॉकडाऊन मध्ये देशभरातून हजारो कि.मी. उत्तर प्रदेशातील मुळगावी पायी परतणारे लोक, गंगा नदीपात्रातील मृतदेह, उन्नाव रेप आणि हत्याकांड, हाथरस रेप आणि जळीतकांड, तीन कृषी कायदे, लखीमपुर खिरी येथे मंत्रीपुत्राने शेतकऱ्यांना गाडीखाली चिरडणे, ऊसाच्या पेमेंटची थकबाकी, मोकाट जनावरांद्वारे शेतीचे नुकसान, पेट्रोल-डीझेल दरवाढ, महागाई आणि बेरोजगारी, भाजप आयटी सेलचा सोशल मिडियावरील कब्जा आणि धुमाकूळ, सुल्ली डील, बुली बाई, हिजाब प्रकरण इत्यादी रोजच्या जगण्यातील मुद्यांची पार्श्वभूमी या निवडणुकीला होती. त्यामुळे भारतीय लोकशाहीच्या दृष्टीने ही निवडणूक महत्वाची होती. यातून भारत देश हिंदुत्वाच्या दिशेने किती पुढे गेला आहे, हे स्पष्ट होणार होते आणि लोकांच्या दृष्टीने आपापल्या रोजच्या जगण्यात अपेक्षित बदल घडवून आणण्यासाठी निवडणूक एक महत्त्वाचे साधन आहे म्हणून बघते की नाही, हे सुद्धा पाहायला मिळणार होते.

२०१९ साली महाकाय बहुमताने निवडून आलेल्या लोकप्रिय सरकारने आणलेल्या शेतकऱ्यांवर परिणाम करणाऱ्या तीन कृषी कायद्यांच्या विरोधात संयुक्त किसान मोर्चाचे दिल्लीच्या सीमेवर दीड वर्ष आंदोलन चालले. यात पंजाब हरयाणाचे शेतकरी आघाडीवर होते. त्यात भारतीय किसान युनियनच्या राकेश टिकैत यांच्या नेतृत्वाखाली पश्चिम उत्तर प्रदेशातील शेतकऱ्यांनीसुद्धा मोठ्या प्रमाणात सहभाग घेतला होता. या आंदोलनावर एका रात्री केल्या गेलेल्या पोलीस कारवाईनंतर पश्चिम उत्तर प्रदेशातील हिंदू आणि मुस्लिम शेतकऱ्यांनी लाखोंच्या संख्येने भाग घेतला होता. त्यानंतर भाजप विरोधात अनेक ठिकाणी खाप पंचायती झाल्या. त्या पंचायतीत २०१३ च्या मुझफ्फरनगर दंगलीनंतर पहिल्यांदाच हिंदू-मुस्लिम मोठ्या संखेने एकत्र आले होते. त्यावेळी मुझफ्फरनगर दंगल आणि चौधरी अजितसिंग यांचा लोकसभेतील पराभव या दोन मोठ्या चुका बहुसंख्य समाजाकडून झाल्या, हे उपस्थित किसान नेत्यांनी मान्य केले.

भाजपाच्या दोन लोकसभा आणि एक विधानसभा अशा तीन विजयानंतर ही निवडणूक होत होती. तीन कृषी कायदे अजिबात मागे घेतले जाणार नाहीत, असे म्हणणाऱ्या भाजप सरकारने पाच राज्यांतील विधानसभा निवडणुकीच्या तोंडावर अचानक तीनही कृषी कायदे रद्द केले. मात्र आंदोलकांना जवळपास दीड वर्षे झुंजवणाऱ्या भाजपला उत्तर प्रदेशची विधानसभा गमावून त्याची किमंत मोजावी लागेल, असे जाणकारांना वाटत होते.

त्यात भरीस भर म्हणजे वरील विविध प्रश्नांच्या कारणाने सत्ताधारी भाजप पक्षाचा जनाधार कमी झाला आहे, असे समजून अनेक मोठे नेते, दहा आमदार आणि तीन मंत्री, ओबीसी समाजाचे नेते स्वामी प्रसाद मोर्य, दारासिंग चौहान, धरमसिंग सैनी आणि ओमप्रकाश राजभर भाजप आणि एनडीएतून बाहेर पडले.

उत्तर प्रदेशातील मुख्य विरोधी पक्ष समाजवादी पक्षाने केलेल्या निवडणूक पूर्व आघाडीत पश्चिम उत्तर प्रदेशातील जयंत अजितसिंग चौधरी यांचा राष्ट्रीय लोक दल (आरएलडी), मध्य प्रांतातील ओमप्रकाश राजभर (सुहेलदेव भारतीय समाज पार्टी), शिवपाल यादव (प्रगतीशील समाजवादी पार्टी), अपना दल (कामेरावादी), महान दल इत्यादी पक्षांचा समावेश झाला. या युतीने काही महत्त्वाच्या मुलभूत प्रश्नांना निवडणुकीचे मुद्दे करून लोकांसमोर आणले. ओबीसी जातवार जनगणना, प्रमोशनमधील आरक्षण, जुनी पेन्शन योजना पुन्हा लागू करणे, ६९,००० शिक्षकांची नोकरभरती, दलित-बहुजनांवरील अत्याचार थांबवणे, फेक एनकाउंटरर्स थांबवणे, मोकाट जनावरांच्या हल्ल्यात मृत्यू किंवा जखमी झालेल्यांना मदत, उसाचे पेमेंट १४ दिवसांत करण्याच्या कायद्याची अंमलबजावणी करणे, शेतकऱ्यांना ३०० युनिट वीजबिल माफ करणे. समाजवादी धोरणात्मक मुद्दे, फ्री-बीझ आणि कल्याणकारी योजनेचे योग्य मिश्रण त्यांनी पेश केले आहे, असे दिसत होते.

उत्तर प्रदेशात काँग्रेस पक्ष मागील तीन दशकांपासून सत्तेतून बाहेर आहे. यावेळी प्रियांका गांधी यांच्या नेतृत्त्वात लढल्या गेलेल्या निवडणुकीत ४०% महिला उमेदवार, उन्नाव पिडीतेच्या आईला उमेदवारी देणे आणि स्वतःच्या सुरक्षेसाठी महिलांनीच राजकारणात येऊन परिस्थिती बदलावी म्हणून आणलेला ‘लडकी हूँ. लढ सकती हूँ’ हा नारा इत्यादी सकारात्मक भूमिका त्यांच्या प्रचारात नवा उत्साह पेरणाऱ्या वाटल्या.

नेहमीप्रमाणे निवडणुकीच्या काळात रंगत आणणाऱ्या काही



गोष्टी घडल्या. त्यात चंद्रशेखर रावण यांच्या आझाद समाज पार्टी आणि समाजवादी पक्षाच्या युतीची बोलणी फिस्कटल्यानंतरचा मिडियामधील तमाशा आणि असुदुद्दीन ओवेसी यांच्या एमआयएम पक्षाने एन्ट्रीलाच २०० पेक्षा अधिक ठिकाणी उमेदवार उभे करणे. चार वेळा मुख्यमंत्री राहिलेल्या मायावतींच्या बहुजन समाज पक्षाची ४०३ जागा लढवून अज्ञात स्थळी प्रचार करणे. यातून एमआयएम आणि बसपवर भाजपची 'बी' टीम असल्याचा आरोप होणे आपण पाहिले. आता रावण, ओवैसी आणि मायावती यांच्या पक्षाने समाजवादी पक्षाच्या किती उमेदवारांचा किती कमी अंतराने पराभव होण्यात भूमिका अदा केली, त्याची आकडेवारी लवकर समोर येईलच.

उत्तर प्रदेशात प्रत्येक पक्षातर्फे अनेक बाहुबली उमेदवार मैदानात असतात आणि सातत्याने जिंकतसुद्धा असतात. काही ठिकाणी निवडणूक जिंकण्यासाठी अजूनही मनी आणि मसल अत्यावश्यक गोष्टी आहेत, हे दिसून आले. भाजप सर्वात जास्त बाहुबलींना घेऊन लढणारा पक्ष दिसला. मात्र लोकशाहीला हरवणाऱ्या मतदारांना तेथे नेमके काय अपेक्षित असते त्यांनाच ठाऊक. आदित्यनाथांच्या ठाकूर वादाला ब्राह्मण समाज वैतागलेला आहे, असे चित्र बघायला मिळाले.

उत्तर प्रदेशातील निवडणूक सात फेऱ्यांत कराव्या लागाव्यात इतका सुरक्षा बलाचा वापर तर दिसला नाही. पण यातून निवडणूक आयोगाची सत्ताधारी पक्ष भाजपप्रति अति मवाळ भूमिका पुन्हा एकदा प्रकर्षाने जाणवली. या निवडणुकीतसुद्धा एकूण निवडणूक व्यवस्थापन आणि इव्हिएम हाताळणीवर शंका उपस्थित केल्या गेल्या. निवडणूक आयोगाला निष्पक्षपाती भूमिका दर्शवण्यासाठी अजून भरपूर वाव आहे, असे वाटते. काही टीव्ही न्यूज चॅनेल्सनीसुद्धा सत्ता पक्षाची भूमिका इतकी ठळकपणे मांडली, की ती सत्तापक्षाची प्रवक्ता म्हणूनच काम करते आहे, असाही आरोप झाला. अनेक ठिकाणी अशा काही चॅनेल्सच्या पत्रकारांना लोकांनीच अक्षरशः हाकलल्याचे दिसले. दरम्यान शेकडो इंडिपेंडंट पत्रकारांनी आपापली यूट्युब चॅनेल्स उघडून जे वार्तांकन केले, ते अधिक विश्वसनीय वाटले. मायावतींच्या काळात कायदा व सुव्यवस्था तसेच शासन-प्रशासन सर्वात सुयोग्य होते आणि जमिनीवर सर्वात जास्त लोकोपयोगी विकास (विद्यापीठे इत्यादी) त्यांच्याच काळात झाल्याचे लोक या समाज माध्यमातील पत्रकारांना सांगत होते. त्यातूनही लोकांनाच सत्ताधारी पक्षाला खाली खेचायची इच्छा आहे, म्हणून तेच प्रमुख विरोधी पक्षाच्या भूमिकेत शिरले आहेत, असे चित्र प्रकर्षाने पुढे येताना दिसत होते. मात्र ती बहुसख्यांची इच्छा असूनही सत्ताबदल करू शकली नाही, कारण...

सत्ताधारी भाजपने या निवडणुकीत तर विकासाच्या मुद्यावर मते मागितल्याचे दिसले नाही. सुरुवातीला विकासाच्या नावाखाली आधीच्या सरकारच्या कामाचे फोटो, चीनच्या विमानतळाचे फोटो माध्यमांतून दाखवण्यात आले, असे आरोप झाले. मग भाजपने आपला नेहमीचा हिंदू-मुस्लिमचा राग आळवण्याचा प्रयत्न केला. मुख्यमंत्री अजयसिंग बिस्त (आदित्यनाथ) यांनी ही निवडणूक ८० आणि २० मधील निवडणूक असल्याचे तसेच निवडणूक झाल्यावर ते पश्चिमी उत्तर प्रदेशातील विरोधकांची गर्मी काढणार असल्याचे जाहीर केले. तर प्रधानमंत्री मोदी यांनी अतिरेक्यांनी गुजरातेत बॉम्बस्फोट करताना नेहमीच समाजवादी पक्षाचे निवडणूक चिन्ह असलेली सायकलच का वापरली, याबाबत आश्चर्य वाटत असल्याचे अस्थायी विधान केले.

मात्र प्रमुख विरोधी पक्ष समाजवादी पक्ष आणि काँग्रेसने जाणीवपूर्वक या नकारात्मक प्रचाराला त्याच भाषेत प्रत्युत्तर देण्याचे टाळत संपूर्ण निवडणूक हिंदू-मुस्लिम या मुद्यावर न ठेवता सातत्याने लोकांच्या खऱ्या प्रश्नांवर केंद्रित ठेवण्याचा प्रयत्न केला, असे दिसले. असे असले तरी काँग्रेस काय किंवा समाजवादी पक्ष आणि गठबंधन काय, निवडणुकीच्या तयारीत खूप उशिरा उतरल्याचे दिसले. तरीसुद्धा लोकांनी त्यांच्या सभांना इतकी प्रचंड गर्दी केली, यावरून लोकांना बदल हवा आहे म्हणून लोकच विरोधी पक्षाची भूमिका घेऊन मतदानाची दिशा ठरवत आहेत, असे चित्र उभे राहिले. त्यामुळेच की काय, प्रधानमंत्री मोदींना स्वतःच्या वाराणसी मतदारसंघात चार दिवस तळ ठोकून बसावे लागले.

कोणतेही सरकार लोकांना काहीच देऊ शकत नाही. सर्वांना आपापली घरं भरायची असतात. अशी अनेकांची मानसिकता झालेली असताना उत्तर प्रदेशात भाजप सरकारने अनेक गुंडांचे एन्काऊंटर करुन कायदा व सुव्यवस्था स्थापित केली आणि महिलांना मोकळा श्वास घेता येऊ लागला, असा प्रचार भाजपने जोमाने केला. मात्र त्यांनी केवळ विशिष्ट विरोधी समाजातील गुंडांचे फेक एन्काऊंटर केले. मात्र ठाकूर समाजाशी संबंधित बाहुबलींना मोकळीक दिली, असाही आरोप झाला. तसेच कोरोनाकाळात निवडणूक होईपर्यंत तरी लोकांना पाच किलो धान्य वाटप केले,

## उत्तर प्रदेश ४०३




बहुमतासाठी आवश्यक जागा २०२

| | २०२२ | | २०१७ |
|---|---|---|---|
| भाजप | २७४ | भाजप | ३१२ |
| काँग्रेस | ०२ | काँग्रेस | ०७ |
| सपा | १११ | सपा | ४७ |
| बीएसपी | ०१ | बीएसपी | १९ |
| इतर | ०२ | इतर | ०९ |

त्यावरून 'हमने सरकार का नमक खाया है' या 'शोले' च्या डायलॉगची आठवण करून देण्यात आली. मतदारांना आवाहन करताना खुद्द प्रधानमंत्र्यांनी त्याचा उल्लेख आपल्या भाषणात केला. 'नमक सरकारचे नसते, लोकांच्या टॅक्समधील पैशातून धान्य वितरीत होत आहे' असे लोक बोलायला लागले, तेव्हा प्रधानमंत्र्यांनी उलट आम्हीच लोकांचे नमक खाल्ले आहे, अशी कबुली दिली.

असेही असले तरी एक मात्र खरेच, की भाजप आयटी सेल, टीव्ही आणि समाज माध्यमातून हिंदूबहुल समाजाच्या नेणीवेतील पुरुषी वर्चस्व, पितृसत्ता, स्त्रीदास्य, जातवाद, धर्मवाद आणि सामंतशाहीला बारा महिने ३६५ दिवस खतपाणी घालत असते, असे त्यांच्या आयटी सेलमध्ये काम करणाऱ्यांनीच सांगितल्याचे वेळोवेळी प्रसिद्ध झाले आहे. त्यामुळेच वर उल्लेखित प्रश्नांचा ढीग असताना लोकांच्या कोणत्याही खऱ्या समस्यांची पूर्णपणे सोडवणूक न करता भाजप निवांत असते आणि या त्यांनीच वाढवलेल्या पिकावर, निवडणुकांवर निवडणुका जिंकत असते. (पंजाबमध्ये कदाचित हिंदू-मुस्लिम-शीख-ख्रिश्चन धार्मिक प्रश्न निर्माण करण्यात राष्ट्रीय शीख संगतला मर्यादा येतात, म्हणून तिथे आम आदमी पक्ष बाजी मारू शकतो.) तरीसुद्धा या मुद्यावर काँग्रेस काय किंवा समाजवादी पक्ष काय त्यांच्या अंगभूत मर्यादांमुळे कधीच लढू शकणार नाही, हे पुन्हा एकदा अधोरेखित झाले आहे. पण विरोधी पक्ष याचे असे दुबळे समर्थन करतात, की भाजपकडे प्रचंड पैसा, संसाधने आणि मनुष्यबळ आहे, म्हणून त्यांना हे सर्व करणे व वर्षभर निवडणुकीच्या माहोलात राहणे शक्य होते. पण असे म्हणणाऱ्यांचा यातील फोलपणा त्यांच्या मतदारांनी लवकर लक्षात घ्यायला पाहिजे.

सर्वात जास्त युवक असणाऱ्या देशात मागील ४० वर्षातील सर्वात जास्त बेरोजगारी आलेली असताना उत्तर प्रदेशसारख्या बिमारु मागास राज्यात नियोजित स्पर्धा परीक्षा न होणे, पेपरफुटी होऊन परीक्षा रद्द होणे, झालेल्या परीक्षेचा निकाल वेळेत न लागणे, पास झालेल्या मुलांची अनेक वर्षे नियुक्ती न होणे, आरक्षण डावलून भरती केली जाणे अशा प्रश्नांनी त्रस्त मुले आत्महत्या करत आहेत, पण त्यास महत्त्व दिले जात नाही. पोलीस आणि माध्यमेसुद्धा याकडे बेरोजगारीचा प्रश्न म्हणून न पाहता वैयक्तिक कारण म्हणून दुर्लक्षित करत आहेत, असे 'द वायर'च्या पत्रकार आरफा खानम शेरवानी यांना एका प्रत्यक्ष मुलाखती दरम्यान विद्यार्थी सांगत होते.

आता (१० मार्च) सर्व राज्यांचा निकाल आला आहे. पाच राज्यांपैकी चार राज्यांत भाजपचे सरकार येईल. राज्यसभेत भाजप बहुमतात येईल. राष्ट्रपती निवडणुकीत नरेंद्र मोदी कदाचित राष्ट्रपती होतील आणि अजितसिंग बिस्त (आदित्यनाथ) प्रधानमंत्री आणि यातून भारत एक हिंदू राष्ट्र होण्याचा मार्ग प्रशस्त होईल. लोकांची प्रातिनिधिक लोकशाही कदाचित संपुष्टात येईल. त्यातून देशातील लोकांच्या जीवनावर काय परिणाम होईल? शेतकरी, कामगार, महिला, दलित, आदिवासी, बहुजन, युवकांचे जीवन आणखी किती खडतर होईल, याचा अंदाज बांधणे आज कठीण आहे.

रशिया-युक्रेन युद्धामुळे निवडणुकीनंतर पेट्रोल-डिझेलचे भाव ३० रुपयांनी वाढू शकतात, असा अंदाज व्यक्त केला जात आहे. स्वयंपाकाच्या गॅसचे दर वाढतील, एकूण महागाई वाढेल. गरीब जनतेचे जगणे अजून कठीण होत जाईल. उत्तर प्रदेशात लॅपटॉप, टॅब, फोन, राशन नको, आम्हाला काम द्या, नोकरी द्या म्हणजे आमचे आम्ही लॅपटॉप, टॅब, फोन घेऊ असे म्हणत 'अखिलेश यादव जिंदाबाद' असे नारे देत रेल्वे स्टेशन दणाणून सोडत आणि ट्रेन्स खचाखच भरून मतदान करायला जाणाऱ्या युवकांच्या आशेवर या निवडणुकीने अखेर पाणी फेरले आहे, असेच म्हणावे लागेल.

या निवडणुकांनंतर कोणी काय बोध घ्यावा असा विचार केला, तर लोकशाही, धर्मनिरपेक्षता, लोकांचे मुलभूत आणि मानवी हक्कांचे रक्षण करण्यासाठी विरोधी पक्ष आपल्या एकूण दूरदृष्टी, धोरण आणि मार्गक्रमणात काय बदल करतील, सामाजिक न्यायाचे काय होईल, लोकशाही आणि पारदर्शी कारभारासाठी आग्रही असणारे नागरिक कोणत्या प्रकारचा देश आपल्या पुढच्या पिढीला देऊ इच्छितात, तसेच या देशातील तरुण युवक-युवती एकूण देशाच्या प्रगतीबाबत काय भूमिका घेतील, यावरच देशाचे भवितव्य ठरेल, असे म्हणता येईल.

विकासाची कितीही जाहिरातबाजी केली तरी जिवंत लोकशाही आणि शाश्वत शांतता नसेल तर त्याला अधोगतीच म्हटले जाईल. याउलट सर्वांना समान संधी आणि योग्य अवकाश देणारे सरकार असेल तर लोकंच आपापला विकास साधायला नेहमी तत्पर असतात, सक्षम असतात! निवडणुकीचा एक दिवसाचा इव्हेंट साजरा न करता जबाबदार शासनव्यवस्था निर्माण करण्यासाठी आधी लोकशाहीप्रिय समाजव्यवस्था निर्माण करणे अधिक गरजेचे आहे, हे जनमानसाच्या लवकरात लवकर लक्षात यावे हीच अपेक्षा !

●●●

**(लेखक यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठात सहयोगी प्राध्यापक आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर अध्यासनाचे प्रमुख आहेत)**

# गोव्यात भाजपच्या विजयामागील रहस्य !

या निकालात पर्रीकरप्रणीत राजकारणानेही कूस बदलल्याचीही खूण त्यात आहे. या यशाचा पेहराव भगवा आहे, त्याखालील देह निम्माअधिक काँग्रेस किंवा भाजपेतरांचा आहे. **पर्रीकरांच्या निधनानंतर भाजपच्या देहात भाजपेतर घटकांचे केलेले कलम या विजयाने कायम केले आहे.**



**सुरेश स. नाईक**


गोव्यात भारतीय जनता पक्षाने वीस जागा जिंकून सत्ता राखताना सलग तिसऱ्यांदा सरकार स्थापन करण्याची संधी नुकत्याच पार पडलेल्या राज्य विधानसभेच्या निवडणुकीत प्राप्त केली. २०१२ मध्ये तत्कालीन मुख्यमंत्री मनोहर पर्रीकर यांनी भाजपसाठी पूर्ण बहुमताचा कौल(२१ जागा) पहिल्यांदा मिळविला होता, जवळपास तोच (२०) कौल मुख्यमंत्री प्रमोद सावंत यांच्या नेतृत्वाखाली पुनरावृत्त करण्यात भाजप यशस्वी ठरला. दोन्ही वेळच्या यशामध्ये गुणात्मक फरक जरूर आहे. तसा पर्रीकरप्रणीत राजकारणानेही कूस बदलल्याचीही खूण त्यात आहे. या यशाचा पेहराव भगवा आहे, त्याखालील देह निम्माअधिक काँग्रेस किंवा भाजपेतरांचा आहे. पर्रीकरांच्या निधनानंतर भाजपच्या देहात भाजपेतर घटकांचे केलेले कलम या विजयाने कायम केले आहे.




भाजपची सबळ पक्ष संघटना, निवडणूक जिंकण्यासाठी सदैव राखलेली सज्जता, सक्रियता, प्रचाराची सघनता, डबल इंजिन सरकारचे आवाहन ही पक्षाची बलस्थाने असली तरी विनेबिलिटीच्या तत्त्वाधारे आखलेली रणनीती हीच भाजपच्या यशाला मुख्यत्वे कारणीभूत ठरली.

मुख्यमंत्री सावंत यांच्या नेतृत्वाखाली सरकारमध्ये काँग्रेस (१३) व महाराष्ट्रवादी गोमंतक पक्षाचे (२) एकूण १५ आमदार होते. यातील जिंकून येऊ शकणार नाहीत असे वाटलेल्यांना उमेदवारी नाकारण्यात भाजपने कोणतीही दयामाया, उपकृततेची भावना दाखवली नाही. मगोपच्या दोन्ही आमदारांना उमेदवारी नाकारली, त्यातील बाबू आजगावकर यांना माजी मुख्यमंत्री दिगंबर कामत या मातब्बरासमोर मडगावात उमेदवारी देऊन त्यांचा हट्ट तेवढा पुरवला. ते पराभूत झालेच. काँग्रेसमधून आलेल्या तेरा जणांमध्ये आठ ख्रिश्चन आमदार होते. त्यातील तिघांना उमेदवारी दिली नाही, अन्य तिघांना उमेदवारी दिली ते पराभूत झाले. उमेदवारी नाकारलेल्यापैकी एका ठिकाणी व कळंगूट, कुडतरी या दोन मतदारसंघात नवे ख्रिश्चन चेहरे रिंगणात उतरवले, ते अपयशी ठरले. पणजी व ताळगावमध्ये आठातले दोघे, बाबूश मोन्सेरात व त्यांच्या पत्नी जेनिफर या जिंकल्या. तो त्यांचा वैयक्तिक करिश्मा आहे. ख्रिश्चन समाजात आजही भाजपला स्वीकारार्हता लाभलेली नाही, असा तर्क त्यातून काढता येतो.

काँग्रेसमधून आलेल्या अन्य पाचातील दोघांना (मांद्रे, केपे ) यांना हार पत्करावी लागली. मांद्र्यात पूर्व मुख्यमंत्री लक्ष्मीकांत पार्सेकर भाजपविरोधात लढले. पराभूत झाले. पराभव झाल्यास राजकारण संन्यास घेईन अशी घोषणा त्यांनी केली होती, त्याचे आवाहन मतदारांच्या हृदयापर्यंत पोचले नसावे. केप्यात उपमुख्यमंत्री बाबू कवळेकर यांचा पराभव अनपेक्षित असा होता. पर्वरी, प्रियोळमध्ये पक्षात दाखल झालेल्या अपक्षांनी विजय मिळविला. पेडणे, मये, वास्को येथे ऐनवेळी पक्षात दाखल करून उमेदवारी दिलेले तिन्ही उमेदवार जिंकले. काँग्रेसचे ज्येष्ठ नेते प्रतापसिंह राणे यांना रिंगणात उतरू न देण्याचे डावपेच यशस्वी ठरले. तिथे त्यांच्या स्नुषा दिव्या राणे यांनी भाजपच्या पारड्यात विजय टाकला. सावर्ड्यात जुना नेता गणेश गावकर यांच्या विनेबिलिटीवरचा विश्वास सार्थ ठरला. साळगावमध्ये मात्र विनेबिलिटीच्या निकषावर पक्षात घेतलेल्या गोवा फॉरवर्डच्या जयेश साळगावकर यांना विजेत्यांच्या संख्येत भर घालता आली नाही. भाजपच्या बंडखोर केदार नाईक यांनी काँग्रेस तिकिटावर विजय मिळविला. खुद्द मुख्यमंत्री




| | |
|---|---|
| २० | **भाजप** |
| ११ | काँग्रेस |
| ०० | सपा |
| ०२ | आप |
| ०७ | इतर |



सावंत यांनाही विजय मिळवितांना धापा टाकाव्या लागल्या.मागील निवडणुकीत पराभव झालेले भाजपचे सुभाष फळदेसाई, रमेश तवडकर यांनी सांगे, काणकोणमध्ये पुनरागमन करीत त्याच्या विनेबिलिटीवरील विश्वास जपला. भाजपच्या निवडून आलेल्या वीस आमदारांमध्ये खरे तर भाजपचे नेते असे आठजणच आहेत. बाकीच्या बारा जणांत काँग्रेस, अपक्ष, ऐनवेळी पक्षात आलेले, अशांचा समावेश होतो. विनेबिलिटीच्या आधारे त्यांना उमेदवारी देण्यात आली होती. त्यांनी भाजपला यश मिळवून दिले. दहा बारा ठिकाणी भाजपने दिलेले उमेदवार हे रिंगणात दिसण्यासाठी, कुणाचा हट्ट पुरविण्यासाठी उभे केलेले होते. चार ते पाच ठिकाणी विनेबिलिटीचा फंडा कामी आला नाही. अन्यथा निवडणुकीपूर्वी मुख्यमंत्री वीसचा आकडा पार करण्याबद्दल विश्वास व्यक्त करीत होते, तो साधार होता.

रिव्हॉल्युशनरी गोवन्स या कुठल्याही पारंपरिक राजकारणी चेहरा नसलेल्या, सळसळत्या उत्साहाच्या तरुणांचा भरणा असलेल्या पक्षाने केलेली चमकदार कामगिरी भाजपच्या पथ्यावर पडली. विनेबिलिटीच्या तत्त्वाला आरजीच्या लढतीची कुमक मिळाली नसती तरी निकालांचे चित्र वेगळे झाले असते. पहिल्यांदा निवडणूक लढविणाऱ्या आरजीने आम आदमी पार्टीपेक्षाही उजवी कामगिरी पहिल्या प्रयत्नातच नोंदवली. आरजीने साडेनऊ टक्के मते मिळविली. दुसऱ्यांदा निवडणूक लढविणाऱ्या आपला ६.७७ टक्के म्हणजे मागील निवडणुकीतील मतांच्या तुलनेत केवळ ०.४७ टक्के वाढीव मते मिळविता आली.प्रस्थापित पक्ष व राजकीय नेत्यांविरुध्दच्या मतांच्या स्पर्धेत आरजीने १२ ठिकाणी तिसऱ्या व दोन ठिकाणी दुसऱ्या स्थानापर्यंत मजल मारली आहे. बारा ठिकाणी तीन हजारांच्यावर,नऊ ठिकाणी दोन हजारांच्यावर मते घेतली आहेत. आपने आठ ठिकाणी तिसरे स्थान मिळविले आहे. आरजीच्या मुसंडीने सतरा ठिकाणी विजयाची समीकरणे बदलली आहेत.

आरजीने काढलेल्या मतांमुळे भाजपला किमान नऊ ठिकाणी विजय सुकर झाला. आरजीची उपस्थिती नसती आणि ही मते विरोधातील कुठल्याही पक्षाला जाती तर त्याचा फटका भाजपला बसला असता. काँग्रेसला तीन, आप व अपक्षांना प्रत्येकी दोन ठिकाणी मगोपला एका ठिकाणी आरजी नसता तर फटका मिळाला असता. एकच उमेदवार जिंकला असला तरी आरजीने मोठ्या अपेक्षा निर्माण केल्या आहेत. या निवडणुकीत अनेक प्रस्थापितांना, पक्षबदलू, संधिसाधू नेत्यांना जनतेने घरची वाट दाखवली आहे. तशी अनेकांना झेलण्याची अटळता संपलेली नाही. पुरेसे पर्याय समोर नसल्यानेही ही अटळता लादली गेली असेल, तर त्यातून बाहेर पडण्याचा मार्ग आरजीच्या रुपाने लोकांना उपलब्ध झाला आहे. या निवडणुकीची ही एक चांगली फलश्रुती ठरावी.

काँग्रेसच्या वाट्याला निवडणुकीत वैफल्यच आले. मागील निवडणुकीत मिळालेले यश काँग्रेसला राखता आले नाही. काँग्रेसला मतदान म्हणजे भाजपला पुरवायला आमदार देण्यासारखे असल्याची जी भावना मतदारांत निर्माण झाली, तिचे निराकरण करण्यात काँग्रेस नेते उणे पडले. भाजपमधून आलेले मायकल लोबो यांच्यामुळे बार्देश तालुक्यातील सातपैकी चार जागा काँग्रेसला मिळाल्या. जिंकणाऱ्यात ते स्वतः व त्याची पत्नी यांचा समावेश आहे. पाच जागा जिंकण्याचा त्यांचा वायदा होता. लोबोमुळे काँग्रेसला चेहरा लपविण्याच्या स्थितीपासून दिलासा मिळाला.

भाजपचा पूर्वीपासूनचा सहकारी राहिलेल्या मगोपला आपली कामगिरी या निवडणुकीत उंचावता आली नाही. पाच ते सहा जागा जिंकण्याची अपेक्षा मगोपने बाळगली होती. त्या बळावर आपण राजा बनू किंवा राजा घडविणाऱ्याची भूमिका तरी पार पाडू, असा विश्वास मगोप नेते व्यक्त करीत होते. भाजपने दोनदा हाकलून लावून केलेल्या अपमानाचे शल्य दाखवीत यावेळी भाजपसोबत

जाणार नाही, असा निर्धार त्यांनी केला होता. त्यांचा होरा चुकला. दोनच उमेदवार जिंकू शकले. गेल्या दोन दशकांत पाच-सहा जागा जिंकण्याची नेहमीच क्षमता व शक्यता असलेला मगोप दोन वा तीन आमदार बस्स हाच डावपेच लढवीत निवडणुकीत मिळणाऱ्या खंडित जनादेशाचा पूरेपूर लाभ उठवायचे धूर्त राजकारण खेळत आला आहे. सरकार स्थापनेसाठी कमी पडणारे बळ आपल्या दोन वा तीन आमदारांच्या आधारे भागवून सत्तेत राहण्याची मेख त्यांना जमली होती. यावेळी त्याचा विचार थोडा वेगळा झाला होता. त्याला जनतेकडून कौल मिळाला नाही. भाजपला जवळपास बहुमत मिळाल्याने, बहुमतातील उणीव भरून काढण्यासाठी अपक्षांची कुमक पहिल्यापासून तयारच असल्याने भाजपला मगोपच्या पाठिंब्याची गरज उरली नाही. कुंपणावर राहून सोयीच्या तंबूत उडी ठोकण्याचे त्याचे संधिसाधू धोरण यावेळी हुकले. तरी भाजपने सद्भाव ठेवून, अनेकांचा विरोध असूनही मगोपला सोबत घेण्याची भूमिका ठेवली आहे.

गोव्यात पहिल्यांदा निवडणूक रिंगणात उतरलेल्या तृणमूल काँग्रेसला आपला प्रभाव पाडता आला नाही. (की पाडला नाही, असाही प्रश्न आहे.) तृणमूलकडे पूर्व मुख्यमंत्री लुईझिन फालेरो यांच्यासारखे मातब्बर नेते व विजय मिळवू शकतील असे किमान चार उमेदवार असताना एकही विजय हस्तगत करता आला नाही. किंबहुना निवडणूक प्रचाराच्या ऐन धामधुमीत जिंकण्यासाठी तृणमूल निवडणूक लढवीत नसावी असे वाटण्याजोगे केंद्रीय नेत्यांचे वर्तन दिसले. फालेरो यांच्यासारख्या स्थानिक नेतृत्वाकडे निवडणुकीचे नेतृत्व देण्याऐवजी वरिष्ठ नेत्या मोईत्रा यांच्याकडे सूत्रे दिल्याचे जाणवले. निवडणूक रणनीतीकार प्रशांत किशोर व आयपॅक यांच्याकडे निवडणूक धोरणाची जबाबदारी दिल्याचे सुरवातीस प्रसारित झाले होते. अकस्मात त्यांनी आपण गोव्याच्या निवडणूक प्रक्रियेत सहभागी नसल्याचे जाहीर सांगितले. तृणमूलचे अनेक नेते, प्रशांत किशोर यांच्याशी चर्चा झाल्यानंतरच उमेदवारी मिळाल्याचे सांगत होते. त्या पार्श्वभूमीवर प्रशांत किशोर यांचे सहभाग नाकारणे गोंधळ वाढवून गेले. निवडणूक लढविण्याच्या दृष्टीने पुढे अन्य काही मदत मिळाली नसल्याचे उमेदवार नेते सांगत होते काहींनी तर मतदानाच्या अगदी अलीकडे पक्षत्यागाचा विचार चालविल्याचे दिसले. तृणमूलने ही निवडणूक गांभीर्याने लढविली नाही हेच त्यातील सत्य होते. तृणमूल काँग्रेसला प्रादेशिक पक्षावरून राष्ट्रीय पक्ष अशी मान्यता मिळण्यासाठी सहा टक्के मते मिळविण्याची गरज होती. त्या गरजपूर्तीसाठी स्थानिक नेत्यांचा तृणमूलने वापर केला, मर्यादेत ती लढली, एवढीच तृणमूलची या निवडणुकीतील भूमिका निघाली. स्थानिक नेते त्यात तोंडघशी पडले.

शिवसेना व राष्ट्रवादी काँग्रेसला गोव्याच्या राजकारणात काही स्थानच नसल्याचे दिसून आले. शिवसेनेसारख्या संघटनेला एरव्हीही गोव्यात स्वीकारार्हता आहे का, हा प्रश्नच आहे. राष्ट्रवादीसुद्धा स्वतःचा स्वतंत्र कार्यकर्ता, नेता निर्माण करू शकलेला नाही. अन्य पक्षातील फुटीर, आयात नेत्यांच्या भरवशावर निवडणुकीपुरते चेहरे चमकावण्याचे काम तेवढे चाललेले असते. या पक्षांना इथल्या राजकारणात स्वतंत्रपणे स्थान मिळणे कठीणच आहे. मतदारांना कायम गृहीत धरणाऱ्या, सोयीनुसार राजकीय घर बदलणाऱ्या नेत्यांची सद्दी फार काळ चालणार नसल्याचा इशारा या निवडणुकीने दिला आहे. राजकीय पर्यायांच्या उपलब्धतेचे संकेतही दिले आहेत. ●●●

**(लेखक गोव्यातील ज्येष्ठ पत्रकार आहेत)**

## पाचपैकी तीन दाम्पत्ये विजयी

निवडणुकीत पाच दाम्पत्ये उतरली होती, त्यातील तीन यशस्वी झाली, दोघांना मतदारांनी नाकारले. भाजपचे बाबूश मोन्सेरात पणजीत उत्पल पर्रीकर यांना मात देऊन विजयी झाले. त्यांच्या पत्नी जेनिफर यांनी लगतचा ताळगावा गड राखला. आरोग्यमंत्री विश्वजीत राणे स्वतः जिंकले. वडील माजी मुख्यमंत्री प्रतापसिंह राणे यांना निवडणूक न लढविण्यासाठी धमकावून पत्नी दिव्या राणे यांना त्यांच्या मतदारसंघात उतरवले. त्याही जिंकल्या. पत्नीला उमेदवारी मिळत नसल्याने भाजपचा त्याग करून काँग्रेसमध्ये गेलेले मायकल लोबो यांनी स्वतःच्या विजयाबरोबर पत्नी डिलायला यांनाही जिंकून दिले. भाजपचे उपमुख्यमंत्री बाबू कवळेकर अनपेक्षितपणे निवडणूक हरले. पत्नी सावित्री यांना आमदार म्हणून पाहण्याचे त्याचे स्वप्नही भंगले. पत्नीसाठी उमेदवारी मिळविण्याच्या हट्टापायी पक्षांतरे करीत तृणमूल काँग्रेसमध्ये दाखल झालेले किरण कांदोळकर यांना व त्यांच्या पत्नी कविता यांनाही पराभव पत्करावा लागला. तृणमूलतर्फे निवडणूक लढविणारे चर्चिल आलेमाव व त्याच्या कन्या वालंका यांनाही मतदारांनी झिडकारले. कन्येला आमदार बनविण्याचे चर्चिल यांचे स्वप्न यावेळी तरी भंगले.

## आपचे दोघे विधानसभेत

आपने मागील निवडणुकीतील कामगिरीत टक्केवारीच्या दृष्टीने फारशी वाढ नोंदवलेली नाही. मात्र दोन उमेदवार निवडून आणण्यात आपला यश मिळाले, ही जमेची बाजू. पहिल्यांदा आप चे दोन आमदार विधानसभेत असतील. आप ची सारी मदार अरविंद केजरीवाल यांची प्रतिमा, दिल्ली मॉडेल चा दाखला यावरच राहिली आहे. या साधन सामग्रीत पंजाबमध्ये आपने मिळविलेले यश व दोन आमदार या स्वरूपात भर पडली आहे. त्याचा वापर करून पक्षाचा पाया वाढविण्याची संधी आप ला उपलब्ध झाली आहे. दोन्ही आमदार ख्रिस्तीबहुल मतदारसंघातून आलेले आहेत. त्याचवेळी मुख्यमंत्रिपदाचे उमेदवार अमित पालेकर यांचा पराभव झाल्याने भंडारी कार्ड अपयशी ठरले आहे. या यशापयशाचे व आरजीने पहिल्याच प्रयत्नात घेतलेल्या भरारीचे मूल्यांकन करून आप ला आपल्या धोरणाची फेररचना करण्याची गरज आहे.

# ‘झुंड’ पाहणे गरजेचे आहे



बाबूराव भोर

नागराज मंजुळे एक खणखणीत नाणे आहेच. चित्रपटाचे सर्व व्याकरण, नियम, फ्रेम्स, चित्रपटाची भाषा म्हणून जी मक्तेदारी आहे, ती त्याने पुन्हा मोडून काढली आहे. ज्यांनी ‘फँड्री’ आणि ‘सैराट’ म्हणजे चित्रपट असतो का’ असे हिणवले, त्या प्रेक्षक आणि मराठी चित्रपटसृष्टीमधील तथाकथित मेकर्सनीही ‘झुंड’ हा चित्रपट अभ्यासाचा भाग म्हणून बघावा. त्यांच्या ज्ञानात तो नक्कीच भर टाकेल.

शेजारच्या स्क्रीनवर संजय लीला भन्साळी यांचा अजय देवगण आणि आलिया भट अशी बॉलिवूडची टिपिकल शंभर-दोनशे कोटींची स्टारकास्ट असलेला चित्रपट सुरू आहे. त्या शेजारच्या स्क्रीनवर ‘बॅटमन’सारखा भारतातदेखील प्रचंड फॅन फॉलोइंग असलेला हॉलिवूडचा चित्रपटदेखील सुरू आहे. अशा रिस्की आठवड्यात नागराजने आपला ‘झुंड’ उतरवला, हे एक धाडसच आहे आणि तरीदेखील प्रेक्षक त्याला उत्तम प्रतिसाद देत आहेत, हे विशेष.

पहिल्या दिवशी रात्री ११.३० च्या शोलादेखील जवळजवळ हाऊसफुल्ल गर्दी होती. या चित्रपटाची कथा खरेच खूप धाडसी प्रयोग आहे. नागराजने पटकथा, संवाद इतके पॉवरफुल्ल लिहिले आहेत, की फिल्म अक्षरशः अंगावर येते.

या समाजाने ज्यांना पूर्णपणे नाकारलेले आहे, अशा दुर्लक्षित मुलांच्या सामाजिक, आर्थिक, कौटुंबिक परिस्थितीचे चित्रण अत्यंत वास्तव आहे; तितकेच अंगावर येणारेदेखील आहे. आपण ज्यांची कधी दखलच घेत नाही, त्यांच्यातही फुंकर घातली, तर टॅलेंटचा अंगारच अंगार आहे; पण फुंकर कोण मारणार? अशातच या कथेत प्रवेश करतो विजय बारसे नावाचा एक साधासरळ पण अत्यंत जिद्दी असा प्रशिक्षक, शिक्षक. अमिताभ म्हणजे खरेच जादूगार आहे, पडदा व्यापून टाकतो. विजय बारसे हे पात्र अगदी काही मिनिटांतच त्यांच्या कामाचा ध्यास किती महत्त्वाचा आहे, हे प्रेक्षकांच्या लक्षात आणून देते.

संपूर्ण चित्रपटात कुठेही फिल्मी डायलॉग नाहीत. सगळे डायलॉग वरवर खूप नैसर्गिक वाटत असले, तरी लिखाणासाठी खूपच अवघड आणि किचकट आहेत; पण नागराज यांची पात्रे अशा काही वेशभूषेत, भाषेत आणि पार्श्वभूमीतून येतात, की या डायलॉगची भाषा याशिवाय वेगळी असूच शकत नाही, इतके ते चपखल आणि मजेशीर आहेत. काही मिनिटांतच खात्री पटते की, हा चित्रपट सरधोपट पठडीतील नाही. कमर्शियल चित्रपटाचे आराखडे बांधून लिहिलेला नाही.

चित्रपट माध्यमाचा असा वापर जर निर्माते, लेखक, दिग्दर्शक वारंवार करू लागले, तर भारतीय चित्रपट जागतिक पातळीवर एका वेगळ्याच उंचीवर पोहोचेल, हे नक्की. चित्रपट अत्यंत परखडपणे राजकीय, जातीय भाष्य करतो; पण त्यात कोठेच ड्रामा, डायलॉगबाजी नाही. त्यामुळे ते सीन अत्यंत विचारपूर्वक लिहिले गेले आहेत, हे जाणवते. तीन तलाक, हिजाब याबद्दल मीडियावरच्या बातम्या आणि या चित्रपटातील तलाकवर केलेले भाष्य यातील फरक बघून हसावे की रडावे, तेच समजत नाही. पण वास्तव आहे. ‘फँड्री’तील जब्या, ‘सैराट’मधील आर्ची, परशा, लंगड्या, सलीम हे मराठी प्रेक्षकांच्या आपुलकीचा विषय आहेत. हे सर्व कलाकार चित्रपटात चपखल पेरले आहेत आणि ते हटकून भाव खाऊन जातात. गोंदिया जिल्ह्यातील कुठल्या तरी ग्रामीण भागातील एका पाड्यावरची आदिवासी मुलगी रिंकूने अफलातून केली आहे. पासपोर्टसाठीची तिची फरपट सुन्न करून टाकते. भावना, डॉन, बाबू, संभ्या, परफेक्ट आहेत. ते झोपडपट्टीतील रहिवासी आहेत की नाही, तो भाग वेगळा; पण बॉलिवूडमधील स्टार किड्सना कॉम्प्लेक्स देतील इतका नैसर्गिक अभिनय त्यांनी केला आहे.

आलिया भट, सारा अली खान, श्रद्धा कपूर, अनन्या पांडे, जान्हवी कपूर वगैरे मंडळींसाठी हा चित्रपट या जन्मी तरी शक्य नाही. हा चित्रपट बघताना जाणवते की, नागराजसारखे लेखक, दिग्दर्शक बॉलिवूडमध्ये सशक्त बनले पाहिजेत. ही जबाबदारी प्रेक्षकांचीच आहे. शंभर कोटी, दोनशे कोटी... हा चित्रपट किती कोटींचा गल्ला जमा करेल, सांगता येत नाही. कारण चार-दोन वेळा हिरोइन कॅमेऱ्यासमोर वाकली किंवा एखाद्या हीरोने शर्ट उतरवला, तरी चार-पाचशे कोटींचा गल्ला जमा होतो. बॉलिवूडची ही परंपरा आहे.

पण त्यात हा चित्रपट म्हणजे अमावास्येच्या रात्री पूर्ण चंद्रदर्शन आहे. हा चित्रपट आर्ट फिल्म बिलकुल नाही. अगदी कमर्शियल चित्रपट आहे. बऱ्याच वेळा अशा सशक्त विषयांना आर्ट फिल्म म्हणून जाणीवपूर्वक दुर्लक्षित केले जाते; पण ‘झुंड’ हा चित्रपट आर्ट म्हणून जितका उजवा आहे, तितकाच कमर्शियलीसुद्धा देखणा

आहे.

अजय-अतुल यांचे संगीत, पार्श्वसंगीत, कॅमेरा, कॉश्च्युम, लोकेशन याबाबतीत या चित्रपटाला पाचपैकी पाच स्टार दिले पाहिजेत. भीम जयंतीचे साँग एकदम कडक आहे. हिंदी चित्रपटात भीम जयंतीचे गाणे हा योगायोग नक्कीच नाही. ज्या लोकांचा हा चित्रपट आहे, त्यांच्या आयुष्याचा अविभाज्य भाग आहे भीम जयंती...

इतकी वर्षे का लागली असावीत भीम बॉलिवूडच्या पडद्यावर यायला? काही झाले की गणपती येतो, कव्वाली येते; पण भीम बरोबर राहून जातो. पण नागराजचे सर्व चित्रपट, त्याची लेखणी, त्याचे विचार पाहता तो जाणीवपूर्वक हे मांडतोय. त्याचा चित्रपट बहुजनांचाच असतो आणि असायलाच पाहिजे. म्हणूनच प्रवाहातील मेकर्स खासगीत त्याला नावे ठेवतात. कारण त्याला नावे ठेवण्यात त्यांच्या धंद्याचे गणित आहे. हा माणूस ते गणित तोडू बघतोय. मग प्रेक्षकांचीही काही जबाबदारी आहेच की... बहुजनांची समाजात मोठी 'झुंड' आहे. त्याची 'टीम' बनने आवश्यक आहे आणि हे सांगण्यासाठीच कदाचित इतक्या अडचणी येऊनही नागराजने हा चित्रपट अर्ध्यात सोडून दिला नाही. अन्यथा आपल्याकडे सहज चित्रपट अर्ध्यात थांबतो, डब्यात जातो. मी काही चित्रपटांचा विश्लेषक नाही. मी आजपर्यंत हजारो चित्रपट बघितले आहेत. चार मराठी चित्रपट निर्माता म्हणूनही अनुभवले आहेत. सध्या चित्रपट लिखाणही शिकतो आहे. त्या अनुभवातून सांगतो, 'फँड्री', 'सैराट'च्या पुढचा टप्पा म्हणजे 'झुंड'. आता चित्रपट चालवणे, त्याची पब्लिसिटी करणे, मित्रमंडळींना आवर्जून आग्रह करणे ही आपली जबाबदारी आहे. पैसे आणि वेळ वाया जाणार नाही, याची खात्री म्हणजे 'झुंड'. ●●●

**– एक प्रेक्षक, पुणे**

*नागराजजी यांनी झोपडपट्टीतल्या मुलांना सोबत घेऊन सुंदर चित्रपट निर्मिती केलेली आहे. छोट्या कलाकारांना प्रोत्साहन दिलेले आहे. ते कलाकार नक्कीच चांगलं नाव कमावतील, अशी आशा वाटते. आत्तापर्यंत सैराट, फॅन्ड्रीसारखे चित्रपट त्यांनी केले. त्यांच्या गुणवत्तेला मी सर्टिफिकेट देण्याची काही आवश्यकता नाही.*



**– नितीन गडकरी** (केंद्रीय मंत्री, भारत सरकार)

*खूप चांगला चित्रपट आहे. माझ्याकडे शब्द नाहीत बोलायला. तुम्ही भारतीय मुला-मुलींना जे इमोशन पकडले आहे आणि मुलांनी जे काम केले ना खूपच चांगली मुव्ही बनवली आहे. विलक्षण, आश्चर्यकारक, निराळा चित्रपअ आहे. जेवढं वीस-तीस वर्षांमध्ये शिकलोय त्याचं नागराजनी फुटबॉल केलाय.*



**– आमीर खान** (मिस्टर परफेक्टनिस्ट, बॉलीवूड)

*मला कळत नाही की काय बोलू? छान चित्रपट आहे. या चित्रपटातील संदेश हा सर्वांनी ऐकला पाहिजे. मी या चित्रपटातील हजारपेक्षा जास्त चांगल्या टेक्निकल गोष्टी सांगू शकतो. चित्रपट पाहण्याचा अनुभव प्रत्येकाने घ्यावा. चित्रपट मास्टरपीस आहे. चित्रपट अनेकांचे लक्ष वेधणारा आहे. चित्रपट पाहिल्यानंतर मला आनंद झाला. या चित्रपटात काम केलेल्या मुलांनी माझं मनं जिंकलयं. अमिताभ बच्चन तुम्ही खूपच छान काम केलं. पूर्ण टीमनं चांगलं काम केलंय. नागराजचे मी आभार मानतो. त्याने चांगला चित्रपट तयार केला. मी सर्व टीमला शुभेच्छा देतो.*



**– धनुष** (दाक्षिणात्य प्रसिद्ध अभिनेता)

*झुंड हा न लपवलेला जखमेचा चेहरा आहे. नागराज हा जो जगलाय, उपभोगलाय तोच सिनेमातून मांडतो. नागराज तु झुंडसारखा सिनेता बनवल्याबद्दल एक मित्र म्हणून, समाजात राहणारा नागरिक म्हणून आणि जो काही मी आहे सगळ्यात बऱ्या-वाईट समाजासहित, माझं जे काही अस्तित्व आहे, जी काही माझी समज आहे, त्या सगळ्यांना सोबत घेऊन मी मनापासून तुझे आभार व्यक्त करतो. अशा पद्धतीचा सिनेमा काढून तू माझ्यावर, माझ्या पोरीवर, माझ्या आसपासच्या माणसांवर उपकार करतोयस. मला माहीत आहे, की तुला फार कौतुक आवडत नाही, पण ते करू दे आम्हाला. आपण बच्चन साहेबांना महानायक म्हणतो आणि तू महामानव आणि महानायक यांना एका फ्रेममध्ये आणलंस, हे फक्त तूच करू शकतो.*



**– जितेंद्र जोशी** (मराठी अभिनेता)

*स्वतःवर एक उपकार करून झुंड मोठ्या पडद्यावर पहा. नागराज मंजुळे देशातील सध्याचा सर्वोत्तम दिग्दर्शक आहे. जो तुम्हाला एकाच वेळी दुःख, वेदना, आनंद आणि वास्तवाची जाणीव करून देतो आणि दोन भारतीयांचे संरक्षण भिंतीने केलेले विभाजन दाखवून गंभीरपणे विचार करायला भाग पाडतो.*



**– रितेश देखमुख** (चित्रपट अभिनेता)

*नागराज तुझ्या आयुष्यातील एक महत्त्वाचा टप्पा उद्या तू बघतोयेस. आमच्या पिढीचा तू एक महत्त्वाचा दिग्दर्शक आहेस आणि तुझ्या प्रत्येक चित्रपटाची उत्सुकता नेमहीच असते. ४ मार्च रोजी प्रदर्शित झालेल्या झुंड या तुझ्या पहिल्या हिंदी चित्रपटासाठी तुला मनःपूर्वक शुभेच्छा.*



**– सुबोध भावे** (चित्रपट अभिनेता)

# विषमतेची चौकट मोडणारा 'झुंड'

**प्रतीक माधुरी**

नागराज मंजुळे यांनी सन २००९ मध्ये 'पिस्तुल्या'मधून सिनेजगतात प्रवेश केला. त्यानंतर त्यांनी 'फँड्री', 'सैराट' या चित्रपटांतून चित्रपटांचा आयाम बदलला. 'सैराट'नंतर त्यांचा बहुचर्चित 'झुंड' हिंदीमध्ये नुकताच प्रदर्शित झाला आहे. नागराज यांनी सिनेमाच्या माध्यमातून आतापर्यंत सामाजिक संदेश दिलेले आहेत. 'झुंड'च्या माध्यमातून त्यांनी सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक विषमतेची चौकट मोडलेली आहे. थोडक्यात सांगायचे झाले, तर त्यांनी त्यांची पावले बॉलिवूडमध्ये घट्ट रोवली आहेत. प्रत्येकाने आवर्जून पाहायला हवा, असा हा चित्रपट आहे.

अभिनय उच्चवर्णीयांची मालकी नाही

सिनेमा इंडस्ट्रीमध्ये कुठलीही पार्श्वभूमी नसलेल्यांना नागराज यांनी आतापर्यंत संधी दिलेली आहे. सिनेमामध्ये यायचे असेल तर मुलींची 'फिगर' चांगली असावी व ती दिसायला सुंदर हवी, तर मुलांची धिप्पाड 'बॉडी' असायला हवी, असा ब्राह्मणी समज असतो. हा समज नागराज खोटा ठरवतात.

नागराज टॅलेंटला कायम न्याय देत आलेले आहेत. 'झुंड'मध्ये त्यांनी नवख्या कलाकारांना संधी देत आणि कलाकारांनीही मिळालेल्या संधीचे सोने करत कसदार अभिनय केला आहे. जात आणि आडनावाचे लेबल घेऊन फिल्म इंडस्ट्रीमध्ये मिरवणाऱ्या विशिष्ट वर्गाला नागराज यांनी फटकारले आहे. ज्याप्रमाणे मराठी साहित्यात शिरीष पै यांनी सन १९७५ मध्ये 'हायकू' हा जपानी अल्पाक्षरी काव्यप्रकार आणला आणि लोकप्रिय केला, त्याचप्रमाणे नागराज हे सिनेमाच्या विश्वाला वेगळे स्वरूप देऊन लोकप्रिय करीत आहेत.

नागराज यांनी 'झुंड'मध्ये झोपडपट्टीत राहणाऱ्या लोकांच्या व्यथा, वेदना, आरोग्याच्या समस्या, शैक्षणिक समस्या, महिलांच्या समस्या, व्यसनाधीनता आणि त्यातून निर्माण होणारे गँगवॉर, गुन्हेगारी हे प्रामुख्याने दाखवले आहे. नागराज यांनी 'झुंड'मधून या प्रश्नांवर सोल्यूशन दिले आहे.

● **डोळ्यांचे पारणे फेडणारा अभिनय :** 'झुंड' हा चित्रपट स्लम सॉकर विजय बारसे यांच्यावर आधारित आहे. निवृत्तीच्या जवळ आलेले फुटबॉल प्रशिक्षक विजय बारसे यांची भूमिका महानायक अमिताभ बच्चन यांनी साकारली आहे. चित्रपटाच्या सुरुवातीला अमिताभ एका छोट्या गल्लीतून चालताना दाखवले आहेत. झोपडपट्टीमधील बारा-तेरा दलित मुले यात दाखवली आहेत. झोपडपट्टीसमोर उभे असलेले फ्लॅट कल्चर आणि इकडे व्यसनाच्या आहारी गेलेली दिशाहीन मुले कोळसा चोरत आहेत, हाणामारी करीत आहेत. जगायचे म्हणून जगत आहेत. त्यांच्यातील आर्थिक विषमतेची, सामाजिक विषमतेची खोल दरी 'झुंड' दाखवतो. समोर दिसणारे फ्लॅट्स वास्तविक पाहता, खूप दूर आहेत. पावसाळ्यात ही मुले प्लास्टिकच्या ड्रमसोबत फुटबॉल खेळताना अमिताभ त्यांना पाहतात. त्यांना पुन्हा खेळण्यासाठी पाचशे रुपये देतात. रोज पाचशे रुपये देत ते त्या मुलांमध्ये फुटबॉलविषयी रुची निर्माण करतात. चित्रपटाची पहिली वीस-तीस मिनिटे मनाचा ताबा घेत नाहीत. यातून दिग्दर्शकाला काय दाखवायचे आहे, हेच कळत नाही. चित्रपट पकड घेत नाही आणि नंतर मात्र तीन तास लांबीचा हा चित्रपट वेळ जाणवू देत नाही. काही वेळानंतर एक व्यक्तिरेखा आकार घेऊ लागते. ती असते डॉन नावाच्या एका तरुणाची (अंकुश गेडाम).

विजय या मुलांमध्ये आणि त्यांच्या सहकाऱ्यांच्या खेळाडूंमध्ये एक मॅच घेण्याचा प्रस्ताव ठेवतात, तेव्हा चित्र काहीसे स्पष्ट होऊ लागते. एक मॅच- संघ विरुद्ध 'झुंड'. कॉलेजचे मैदान व झोपडपट्टीत केवळ एका भिंतीचे अंतर आहे; पण दोन्ही विश्वे वेगवेगळी आहेत. 'झुंड' भविष्य घडवते, ही या चित्रपटाची रूपरेषा.

हा चित्रपट बघत असताना अमिताभ आणि झोपडपट्टीतल्या मुलांची केमिस्ट्री छान दिसते. अमिताभ यांना या मुलांच्या वयाच्या तीनपट अनुभव आहे; पण वयाची ही दरी दिसून येत नाही. याला कारण आहे ते नागराज यांचे उत्कृष्ट दिग्दर्शन. विकासापासून कोसो दूर असलेल्या झोपडपट्टीत सुविधांच्या अभावात जगणारी मुले... त्यांच्यातील टॅलेंट विजय ओळखतात. ही मुले सामना जिंकतात. मंजुळे यात आशावादी विचार मांडतात. ही मुले भांडत असली, अमली पदार्थांची नशा करत असली तरी ती गुन्हेगार नाहीत; ती पीडित आहेत. मंजुळे यांच्या एकूण फिल्म करिअरमध्ये 'फँड्री' जगण्यातील उदासीनता व 'सैराट' जातिव्यवस्था दाखवतो, तर 'झुंड' हा आशावाद दाखवतो. दगड फेकणारी मुले क्रिकेटमध्ये चांगले गोलंदाज होऊ शकतात. रेल्वे ट्रॅकवर भांडण करून पळणारा ऑलिम्पिकमध्ये धावपटू होऊ शकतो. या भरकटलेल्या मुलांना या अपराधी व्यवस्थेने दिशा दाखवली, तर ही मुले स्वत:ला सिद्ध करू शकतात, हा विचार 'झुंड' मांडतो.

● **'स्लम सॉकर'चा अफलातून प्रयोग :** 'झुंड' जसजसा पुढे सरकतो, तसे त्याचे रूपांतर हळूहळू क्रीडानाट्यात होताना बघायला मिळते. चित्रपटाची कथा उपकथेकडे सरकते. झोपडपट्टीतील खेळाडूंमधील राष्ट्रव्यापी फुटबॉल स्पर्धा. यात जिंकणारे 'स्लम सॉकर' या आंतरराष्ट्रीय स्पर्धेत भाग घेऊ शकतील, असा अफलातून प्रयोग यात बघायला मिळतो.

● **डिजिटल इंडिया? भारत मतलब? :** 'झुंड' हा चित्रपट मोठ्या गोष्टी छोट्या स्वरूपात दाखवतो. निरागसता कुठे दाखवायची, याचे तारतम्य मंजुळे यांना आहे. एका ठिकाणी एक मुलगा विजय यांना विचारतो की, 'भारत मतलब?' जातिव्यवस्थेत आपण इतके पोखरत गेलो आहे, की आपण समाज समाजापासून दूर नेत आहोत. याचा हाही अर्थ येथे समजावून घ्यावा लागेल. 'स्लम सॉकर'साठी सज्ज झालेल्या खेळाडूंच्या माध्यमातून मंजुळे एक सूक्ष्म, नाजूक धागा पकडतात. त्यातील एक मुलगी (रिंकू राजगुरू) दूरच्या खेड्यात

राहते. पासपोर्ट मिळवण्यासाठी तिच्यापुढे मोठा संघर्ष असतो. असंख्य कागदपत्रे, असंख्य मंजुऱ्या... आणि एका क्षणाला तिला समोर पाटी दिसू लागते, त्यावर अक्षरे असतात- 'डिजिटल इंडिया'.

● **महामानवाच्या फ्रेममध्ये महानायक :** अमिताभ बच्चन हे बॉलिवूडमधील महानायक. ते सहज त्यांच्या अभिनय कौशल्यातून कथेतला संवाद वाढवू शकले असते; पण नागराज यांनी अमिताभ यांचा रोल 'जेवढा हवा तेवढा' ठेवला. परिणामी, स्लम सॉकर विजय बारसे यांच्यावरील रोल परफेक्ट झाला. बॉलिवूडमधील महानायकाने फिल्मी दुनियेत एकापेक्षा एक रोल केले. त्यांनी बहुतांश उच्चभ्रू व्यक्तिरेखा केलेल्या आहेत. यामध्ये 'गुलाबो सिताबो' आणि 'झुंड' अपवाद आहेत. 'गुलाबो सिताबो'मध्ये त्यांनी केलेली भूमिका कृत्रिम वाटते, तर 'झुंड'मध्ये ती ओरिजिनल वाटते.

बॉलिवूडमध्ये पहिल्यांदा भीम जयंतीची मिरवणूक दाखवली आहे, यात अमिताभ यांनी महामानव बाबासाहेबांना अभिवादन केले आणि महामानवाच्या फ्रेममध्ये महानायक दिसले.

● **महापुरुषांचा सन्मान :** झोपडपट्टीमधील मुले भीम जयंतीची वर्गणी गोळा करण्याकरिता एका किराणा दुकानात जातात. 'डॉ. बाबासाहेबांच्या नावाने नाचगाणी सोडून इतर काही करायचे असेल तर मी वर्गणी देतो', असे तो दुकानदार म्हणतो. त्याच्या दुकानात छत्रपती शिवराय, महात्मा फुले, राजर्षी शाहू महाराज, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे फोटो दिसतात. आणखी असे की, चित्रपटातील भीम जयंतीच्या मिरवणुकीत रुग्णवाहिका येते. नाचणारी मुले ताबडतोब तिला पुढे जाण्याकरिता जागा करून देतात. या छोट्या गोष्टी दाखवून नागराज यांनी सामाजिक ऐक्याचे दर्शन घडवले. नागराज या छोट्या छोट्या गोष्टी पडद्यावर दाखवतो; पण त्या 'रियल' दाखवतो. जे कोणी करू शकत नाही, ते नागराज करून दाखवतो.

● **'झुंड'वर कौतुकाचा वर्षाव :** बॉलिवूडमधील मिस्टर परफेक्शनिस्ट आमीर खान असे म्हणतो की, नागराज यांनी माझ्या तीस वर्षांच्या करिअरचा फुटबॉल केला. याबरोबरच दक्षिणात्य अभिनेते धनुष, मराठी अभिनेते जितेंद्र जोशी यांनी नागराज यांच्याबरोबर इन्स्टाग्रामवर लाइव्ह सेशन करून 'झुंड'च्या टीमला शुभेच्छा दिल्या. नागपूरमधील प्रीमियर शोमध्ये केंद्रीय मंत्री नितीन गडकरी असे म्हणतात की, 'नागराजच्या गुणवत्तेला माझ्या सर्टिफिकेटची गरज नाही.' याउलट समाजमाध्यमांवर काही जातीय लोंढे 'झुंड' विरुद्ध 'पावनखिंड' अशी लढाई लावताना दिसून येत आहेत.

'झुंड'मध्ये आंबेडकर जयंतीची सुरुवात छत्रपती शिवाजी महाराजांच्या घोषणेतून होते. यातून महाराष्ट्राची सांस्कृतिक ओळख कळते. 'झुंड'च्या संघामध्ये मुलींचासुद्धा सहभाग असतो. यातून स्त्री-पुरुष समानतेचे दर्शन 'झुंड' घडवून आणतो. 'झुंड' गुन्हेगारांच्या व्यथा मांडतो; पण समर्थन करत नाही. खेळाडूंना घेऊन विमान जेव्हा उड्डाण करते, त्या वेळी विमानतळ आणि झोपडपट्टीमध्ये असणाऱ्या भिंतीवरील सूचना स्पष्टपणे लिहिलेल्या आहेत की, "Strictly prohibited to cross this wall.' नागराज आपल्या फिल्मच्या माध्यमातून आर्थिक, सामाजिक, शैक्षणिक, सांस्कृतिक विषमतेच्या भिंती त्यांच्या सवयीप्रमाणे 'झुंड'मध्येदेखील तोडतात.

●●●

*" तुम्ही आमचं अस्तित्व नाकारू शकत नाहीत. नागराज मंजुळे भावा हा शब्द फक्त नावाला आहे. त्याचा खरा अर्थ समजून घ्यायचा असेल, तर झुंड पाहायलाच हवा. स्वप्नं प्रत्येकाची असतात, पण ती पूर्ण करण्याची धमक आहे व कायम राहणार हे तू पुन्हा एकदा सिद्ध केलं. अभिमान वाटतो तुझा... ङ्गआपुन की बस्ती गटर में हैं, पर तुम्हाने मन में गंद हैं...फ या ओळी मनातून जातच नाहीत.. अजय-अतुल दादा, आय लव्ह यू फॉरेव्हर!! कलाकारांच्या कामाबद्दल मी काय बोलणार? बच्चो से बच्चन तक सर्व क्लास.. जे जगणं आहे, ते नागराज यांनी मांडले. माणुसकीचा प्रवास नक्की बघा, पहायलाच हवा...*



**- सिद्धार्थ जाधव** *(चित्रपट अभिनेता)*

*" मी झुंड चित्रपट बघून पागल झालोय. आतापर्यंत बघितलेला चांगला चित्रपट आहे. मी खूप इन्स्पायर्ड झालोय. नागराज मंजुळे यांनी खूप चांगला चित्रपट बनवला आहे. मी परत जाऊन फिल्ममेकिंग शिकणार आहे. खूप चांगलं वाटतंय. जो कवी, दिग्दर्शक आहे. आपल्या लोकांसाठी चित्रपट बनवतो, उभा राहतो, न घाबरून लोकांना सांगतो. नागराज वेडा आहे, धैर्यवान आहे, प्रेरणादायी आहे. जे बोलायचं आहे, ते हक्काने मांडतो. एवढ्या संपूर्ण नॉन ॲक्टरला पहिल्या वेळेस चांगला अभिनय करताना पाहिलंय. त्यांच्या कास्टिंग डायरेक्टरला पुरस्कार मिळायला पाहिजे. खूप सुंदर चित्रपट आहे.*



**- अनुराग कश्यप** *(दिग्दर्शक, बॉलीवूड)*

*" एक माणूस म्हणून, एक भारतीय होण्याच्या नात्याने आपण ही फिल्म जरूर बघितली पाहिजे. सिनेमागृहात जाऊन आपण झुंड हा चित्रपट नक्की बघा..*



**- ओम राऊत** *(प्रोड्यूसर)*

*" मी याच्या प्रेमात पडलोय. माझ्या मते, ही उत्कृष्ट कलाकृती आहे. भारताकडून ऑस्करसाठी याला नामांकन मिळालं पाहिजे.*



**- लक्ष्मण उटेकर** *(दिग्दर्शक)*



# तुम्ही चुप राहा, बातम्या बोलतील

आपले पंतप्रधान फार उत्साही, ऊर्जावान, उत्सवी अन् उमदे आहेत. आपल्या घरच्या माणसांनाही ते लांबच्या विजयात सामील करवून घेतात. **म्हणून अहमदाबादेत ते ज्या दिवशी म्हणजे निकालाच्या दुसऱ्या दिवशी ११ मार्च रोजी आले तेव्हा त्यांच्या आगमनाची वार्ता होती, 'होली टू यूपी यस्टर्डे, दिवाली इन गुजरात' अशा सणासुदीच्या शब्दांनी सजली.**



जयदेव डोळे

आपल्या आईला वाकून नमस्कार करतानाचे कुणी फोटो काढून घेतो का? आईसोबत जेवतानाचे फोटो काढून घेतो का? नाही ना? मग मोठ्याने नाही म्हणा ना! गप्प काय बसता? दूर कुठे तरी एक पक्ष निवडणुका जिंकतो. त्याचा तो ना कुणी अध्यक्ष, ना कुणी सरचिटणीस. पण एक माणूस आपल्या राज्याच्या राजधानीत उघड्या जीवावर उभा राहून, काळा चष्मा अन् भगवी टोपी घालून, हात हलवीत, रस्त्यावरून फिरतो काय, काय म्हणता याबद्दल? त्या गावाला तो ना नवा, ना अज्ञात! तरीही लोकांकडून फुले उधळून घेत, लोकांकडे उगाच परिचयाचे हसू फेकीत हा जातोच आहे. एक दिवस ठीक झाले. लगेच दुसऱ्या दिवशी अशीच 'उत्स्फूर्त' मिरवणूकही हा माणूस काढतो. काही प्रतिक्रिया आपली अशा वागण्यावर? काय म्हणता, काही बोलायचे नाही यावर? अहो, असे नका गप्प राहू. तुम्ही असे चुप, रस्त्याच्या कडेला उभे राहून बघत बसता अन् खोळंबा होतो सारा. तो रस्ता कित्येक तास इतरांसाठी बंद झालेला. त्या रस्त्यावरच्या लोकांवर पोलिसांच्या नजरा रोखलेल्या. कुणाकुणाची झडती घेऊन झालेली. दुकाने बंद, रहदारी रोखून ठेवलेली, सारे व्यवहार स्तब्ध, मार्च महिन्याची उन्हाची प्रखरता वाढलेली, घामाच्या धारा ओघळू लागलेल्या, कोरोनाचे मास्क तोंडावर ठेवण्याचे आदेश अजून मागे न घेतलेले...?

आपले पंतप्रधान फार उत्साही, ऊर्जावान, उत्सवी अन् उमदे आहेत. आपल्या घरच्या माणसांनाही ते लांबच्या विजयात सामील करवून घेतात. म्हणून अहमदाबादेत ते ज्या दिवशी म्हणजे निकालाच्या दुसऱ्या दिवशी ११ मार्च रोजी आले तेव्हा त्यांच्या आगमनाची वार्ता होती, 'होली टू यूपी यस्टर्डे, दिवाली इन गुजरात' अशा सणासुदीच्या शब्दांनी सजली. गुजरातमधल्या विधानसभेची निवडणूक डिसेंबरात होईल. अजून नऊ महिने दूर

आहे. पण त्यांचा हा दौरा भाजपचे ४५० जिल्हाप्रमुख, एक लाख सरपंच व पंच यांच्याशी संपर्क साधायला होता. शिवाय एका विद्यापीठाचा पदवीप्रदान सोहळा अन् खेल महाकुंभसारखा एक कार्यक्रमही या दौऱ्यात होता. पंतप्रधानांना बघे, श्रोते फार आवडतात! आपल्याला लोकांनी बघत राहावे, ऐकत राहावे अशी त्यांची तीव्र इच्छा असते, हे आपल्याला गेल्या आठ वर्षांत समजले आहेच. आकाशवाणी, दूरदर्शन या सरकारी वाहिन्या दिमतीला असूनही त्यांचे भागत नाही. साऱ्यांनी दर्शन घेत राहावे अन् वाणीचे श्रवण करीत असावे, असे त्यांना वाटते. पण लक्षात घ्या, अशा माणसाला आपल्या आजूबाजूला गलका अजिबात आवडत नाही. आपण उभे असताना बाकीच्यांनी चुप राहावे, असे त्यांना फार वाटते. संसदेत त्यांचा तसा फार नाईलाज होतो म्हणून ते तिथे कमीच असतात. उरल्या जाहीर सभा. त्यावेळी आपला आवाज मोठा असावा याची खबरदारी ते घेत असतात.

आता मोदींना शांतता प्रिय असली तरी काही जणांना ते मुळीच आवडलेलं नाही. या देशात मरणशांतता पसरू नये, असा त्यांचा पण असतो. त्यामुळे आरडाओरड न करता शांततेत साऱ्या गोष्टी सांगायचे काम ते करीत असतात. याचेच उदाहरण बघा. या आधी इंग्रजीत जे शीर्षक बघितले त्या दैनिकाचं नाव 'अहमदाबाद मिरर'. मोदी ज्या दिवशी या शहरात आले त्या दिवशी या आरशाने मोदींना म्हणा, आपल्याला म्हणा गुजरातेतलं वास्तव दाखवले. दिवाळी हे विशेषण त्यानेच दिले आहे. मात्र या दिवाळीच्या आड कशाकशाचा अंधार पसरलेला आहे, ते सांगायला हे दैनिक कचरत नाही. पान क्रमांक दोनवर हे वृत्तपत्र काय सांगते पाहाः

'गेल्या दोन वर्षांपासून गुजरातेत दररोज दोन खून आणि २० आत्महत्या' असा भला मोठा मथळा त्या राज्यातले एक भयंकर वास्तव आपल्याला किंचाळून सांगतोय. खरे तर या बातमीचा नूर अन् नक्शा पहिल्या पानावरच महत्त्वाच्या बातमीसारखा आहे. पण काय करता! पंतप्रधानांच्या आगमनापुढे तिचे काय महत्त्व? गुजरातचे गृहराज्य मंत्री हर्ष संघवी यांनी विधानसभेत ही माहिती देत सांगितले, की गेल्या दोन वर्षांत १५ हजार १४६ आत्महत्या झाल्या तर १ हजार ८९३ खून पडले. अपहरण झालेल्यांचा आकडाही ३ हजार ९११ एवढा आहे.

आणि बलात्कार! महिला, मुली, बालिका यांचा कैवार घेणाऱ्या पंतप्रधानांच्या राज्यात काय परिस्थिती आहे? गृहराज्य मंत्री म्हणाले, की या दोन वर्षांत रोज पाच बलात्कार झाले, ६१ सामूहिक होते. तब्बल ३ हजार ७९६ स्त्रियांवर गेल्या दोन वर्षांत बलात्कार झाले. बलात्काराचा आरोप असलेले २०० पुरूष अजून सापडलेले नाहीत. एकट्या अहमदाबाद शहरात सर्वाधिक बलात्कार झाले आहेत. जिथे पंतप्रधान मोदी यांनी एका पाठोपाठ तीन मिरवणुका विनाकारण काढल्या आणि हजारो लोकांना दुतर्फा बघ्या व्हायला लावले, त्या अहमदाबाद शहरात १६ सामूहिक बलात्कार झाले. ७२९ 'नेहमीचे' बलात्कार झाले. त्यातले २५ आरोपी फरार आहेत. गुजरातेत गृह खातं मुख्यमंत्रीच सांभाळतात. त्यांनी या अत्याचारांची आकडेवारी सादर केली. यावर काँग्रेसचे नेते सुखराम रठवा म्हणाले, की गुजरातेत प्रत्यक्षात रोज पाचाहून अधिक बलात्कार घडतात. पण भाजप आपल्या राज्यात महिला सुरक्षित असल्याचा दावा करतो.

आत्महत्यांचा आकडा दिलेल्या संख्येपेक्षा जास्त आहे. कारण गुजरातचे हे सरकार आत्महत्यांचा समावेश अनेकदा अपघाती मृत्यूंत करते, असा आरोप काँग्रेस पक्ष करतो. हे आकडे फार काळजी वाढवणारे असून सरकारची बेफिकिरी आणि दिरंगाई त्यामागे आहे. सरकारने गुन्हेगारांना आळा घालावा, असे काँग्रेस पक्षाचे आवाहन आहे.

याच अहमदाबादेत ८ मार्च रोजी म्हणजे महिला दिनी एका तरूणाने भररस्त्यात त्याच्या प्रेयसीला भोसकून ठार केल्याचीही बातमी या वृत्तपत्रात आहे. भाजी घ्यायला आलेल्या त्या महिलेला त्या तरूणाने सर्वांदेखत अनेक वार करून मारून टाकले. ही सर्व घटना सीसीटीव्हीत आल्याचाही उल्लेख या बातमीत आहे. म्हणजे बघा, लोक काही करेनात म्हणून सीसीटीव्ही लावले. हे टीव्हीचे कॅमेरे म्हणजे एक प्रकारचे बघे. टेहळे म्हणू वाटल्यास; परंतु बघे काही पुढाकार घेईनात तसे ते करीनात. ते बिचारे टक्क डोळे उघडे ठेऊन बघत राहतात, जे टिपले ते जमा करीत राहतात आणि पुरावे म्हणून ज्यांना हवे ते चित्रण देऊन टाकतात. साक्षात सदैव जागृत, सतत तत्पर, सेवाव्रती, स्त्रीरक्षक अन् राष्ट्रभक्त, मातृभक्त नेत्याच्या गावात ही घटना घडली. बघ्या भारतीयांनी आपला धर्म पाळला. कशातही हस्तक्षेप करायचा नाही ही त्यांना गेल्या आठ वर्षांत दिली गेलेली शपथ त्यांनी कसोशीने पाळली.

आता या भष्ट्राचार निर्दालक, लाचलुचपत संहारक आणि सोळातास सेवारत नेत्याच्या गावची आणखी एक बातमी अहमदाबादच्या त्या आरशाने काय दिली ते पाहू : १० मार्चच्या अंकात ती आहे. मराठीत भाषांतर केल्यास ते असे असेल, 'नागरी रुग्णालयात भ्रष्टाचाराची भरारी! भ्रष्टाचाराचा तपास करणाऱ्या पथकातील एका सदस्याचीच चौकशी चालू!!' विपुल राजपूत या वार्ताहराच्या नावाने प्रथम पृष्ठावर प्रसिद्ध झालेल्या वृत्तात म्हटले आहे, की दोन वर्षांच्या कोविड काळात नागरी रुग्णालयात खरेदी करण्यात आलेल्या साहित्यात भ्रष्टाचार झाल्याच्या संशयावरून नेमण्यात आलेल्या त्रिसदस्य चौकशी समितीचा एक सदस्यच एका प्रकरणात संशयित असून त्याचीही चौकशी चालू आहे! त्याचे नाव डॉ. जगदीश सोळंकी आहे.

आहे का नाही गंमत! याच पेपरात दुसरी बातमी 'खेलेगा गुजरात, जितेगा भारत' अशी मोदींच्या तोंडीची आहे. समजा हीच घोषणा आपण बदलली अन् 'बोलेगा गुजरात, सुनेगा भारत' अशी केली तर अगदी अचूक होईल ना? हळूहळू ती 'लडेगा भाजप, जितेगा भारत' अशी व्हायला वेळ लागणार नाही. या प्रकारच्या वर्णनपद्धतीला 'रिडक्शनिष्ट' म्हणतात. म्हणजे घडणाऱ्या घटना एका शब्दात, तत्त्वात वा पदार्थात घटवायच्या. प्रत्येक घडामोडीचा संकोच करून ती एका म्हणजे आपल्याला हव्या त्या सिद्धांतात बंद करून टाकयची. स्प्रिंगवाला जोकर दाबून एका डब्यात बसवतात तशी. झाकण उघडले, की तो जोकर एकदम उसळून वर येणार; परंतु मोदी किंवा त्यांचा पक्ष

आणि त्या पक्षाचा जनक संघ यांना अशी उसळी आवडत नाही. एकदा का घोटवून घटवून टाकले, की तसेच राहायचे. पूर्वस्थितीत परतायचे नाही कुणी.

यांना असे सारे काही यांच्या मनाप्रमाणे कुठेही कोंबायचा अधिकार दिला कुणी? पंतप्रधान आहात म्हणून तुम्ही स्वतः ला आख्खा पक्ष, अवघा देश अन् संपूर्ण सरकार समजणार! हे गृहस्थ काही वर्षांपूर्वी स्वतःच मोदी सरकार असा शब्दप्रयोग प्रत्येक भाषणात करीत. बोलायचे स्वातंत्र्य आहे म्हणून आपण वाटेल ते बोलायचे अन् दुसरा कुणी बोलू लागला, की त्याची मुस्कटदाबी कशी होईल ते पाहायचे. यात कसले आले शौर्य? सरकार तुमचे, नोकरभरती तुमची, माध्यमेही तुमची; पोलिस-न्याययंत्रणा-तपासयंत्रणा-निवडणूक आयोग-धर्म-जात सारे तुमचे, अन् मग कशाची कुस्ती कुण्या पैलवानाविरूद्ध जिंकली हो? वर मिरवणुका अशा काढता जणू शत्रूला चारी मुंड्या चित केले! विरोधी पक्ष असा वैऱ्यासारखा, परक्यासारखा ठरवण्याची ही वृत्ती हुकूमशाहाची... आव असा होता जणू परमुलखात जाऊन विजयाचा झेंडा गाडून आलाय गडी! देशाचा पंतप्रधान आपल्याच देशातल्या विरोधी पक्षांविरोधात इतका चेव येऊन प्रचार करतो, जणू ते कुणी दुष्ट, दुराचारी अन् दुर्जन!! पंतप्रधानपदावर बसलेला हा एक प्रचारक आहे, की प्रचारकाच्या वृत्तीचा एक पंतप्रधान? प्रचारक दुसऱ्या कुणाचे ऐकणार नाही, हे समजलो. प्रचारकाला आपल्या पक्षाची बाजू रेटायची असते आणि आपलाच पक्ष सत्य असल्याचे ठसवायचे असते, हेही माहित आहे. पण तुम्ही पंतप्रधानपदाचा फायदा घेऊन सायकल हे समाजवादी पार्टीचे चिन्ह दहशतवादाशी जोडून दिले! ही निवडणूक परिवारवादी विरूद्ध राष्ट्रवादी अशी असल्याचेही पंतप्रधान म्हणाले! राष्ट्रवादी कोण हे ठरवायचा अधिकारही एका व्यक्तीकडे असेल काय? मग सरकारी मालकीच्या कित्येक मालमत्ता आणि संस्था खाजगीकरणाद्वारे बहुराष्ट्रीय कंपन्यांच्याही घशात घालायच्या निर्णयाचे वर्णन कसे करायचे? तसे करण्यासाठी लोकांनी निवडून दिले होते का यांना?

एखादी व्यक्ती बेफाम बोलू लागते कारण तिला तिच्यासमोर खडसावणारे, अडवणारे कुणी नसते. खरे तर असते. लोकच असतात, मतदार असतात, नागरिक असतात. पण सारे जण चुप बसतात. प्रचाराच्या घोड्यावर पाठवून दिलेले सत्याचे प्रेत बघून चिडीचुप झालेले हे गावकरी रहिमचाचा नावाची चिवट उत्सुकता स्वतःहून चालत येते तेव्हाही ते गप्पच राहतात. चाचांच्या पायांना प्रेताचा स्पर्श होतो तेव्हा त्यांना सत्य कळून चुकते. जणू लोक सुचवू पाहतात, भोगा आपल्याच कर्माची फळे! काय गंमत आहे पाहा, तेव्हापासून जणू निरपराध मुसलमानांची अशा प्रकारे अल्लासदनास पाठवणी चालू आहे. गेल्या आठ वर्षांत झुंडीकडून ठार झालेल्या मुसलमानांची संख्या शंभरच्या आसपास असल्याचे कुजबुजत सांगितले गेले. गप बसा अन्यथा अशीच रवानगी होत राहील, असा संदेश देणाऱ्यांना कधी पंतप्रधानांनी दरडावले...?

उत्तर प्रदेशात खुद्द अयोध्येत भाजपवर लोक फार चिडले होते. पाच वर्षांच्या कारकिर्दीत मुख्यमंत्री आदित्यनाथ ४० वेळा या गावी आले. प्रत्येकवेळी गावात कडेकोट बंदोबस्त. हिंडणेफिरणे दुरापस्त. रस्ते अडवलेले. विरोधक अडकवून ठेवलेले. पत्रकारांशी लोक बोललेही; परंतु अखेर 'जाने दो, छोडो' हे औदार्य प्रकटले आणि भाजपचा जिंकायचा मार्ग मोकळा झाला. अहमदाबादेत तर खुद्द देश का नेता! तिथे काय असेल अवस्था? पण अखेर लोकशक्ती, जनता का आशीर्वाद, देश का सिपाही, विश्वगुरूने जिंदगी खपा दी, असे शब्द वापरले की लोक पाघळतात. मोठ्या मनाने क्षमा करून टाकतात. ऐनवेळी शस्त्र खाली करतात. गप्प बसतात, दुःख गिळतात.

एकूण काय, तोंडाची वाफ दडवली खरी पण तिने कशाला काही हादरा दिला नाही. वाफेत केवढी शक्ती असते! किती तरी वर्षे वाफेची इंजिने रेल्वेगाड्यांमधून लोक वाहून नेत. आता वाफ बाहेर पडल्यावर तेच तोंड इकडेतिकडे पाहू लागले. आपले काही चुकले तर नाही ना, असे स्वतःलाच विचारू लागले. त्याने आपल्याला अपराधी ठरवावे असेच वातावरण त्याच्या भोवती तयार केले जाते. त्याला काय सांगितले जाते? बघा ही सत्तेतली माणसे. आहे यांचा काही डामडौल अन् चमचमाट? बिचारी किती साधी आहेत ती. ना त्यांनी संसार उभारला, ना घर केले! शक्य असूनही हे सत्ताधारी कसे निर्धन अन् निष्कांचन असतात. झाला एक तरी आरोप त्यांच्यावर गेल्या साताठ वर्षांत? नातीगोती, भाईबंद सारे काही आहे त्यांना. पण कधी त्या पाशात अडकले नाहीत ते. कशामुळे? जनतेला सारा वेळ देता यावा म्हणून. जनतेला गरज असते अशा निःस्वार्थ सेवकांची. जनतेला या सेवकांची नंतर नंतर इतकी भुरळ पडते, की जनतेच्या या सेवकांची जनताच आपली धनी म्हणून, मालक म्हणून नेमणूक करते आणि आणखी स्वस्थ होऊन जाते. आपली सेवा किती उत्तम होतेय या आनंदात जनता गाफीलही होऊन जाते.

उत्तर प्रदेशाच्या विधानसभा निवडणुकांच्या निकालांचा सारांश काय? योगी असूनही उपयोगी असल्याची तारीफ करण्यात आली. अगदी योग्य असे वर्णन झाले ते. फक्त एक अक्षर चुकले. उपयोगीच्या ऐवजी उपभोगी म्हणायला हवे होते. ज्याचे नाव सर्वसंग परित्यागाचे निदर्शक अन् काम मात्र सत्ता उपभोगण्याचे असा भास मोठा विसंवाद आणि विनोद तो! पण धर्मश्रद्धेच्या नावाखाली सारे चालले. नव्हे, चालवून घ्या असे खडसावले जाते. मानवी जीवनातल्या सर्व गोष्टी राजकारणात ओढायच्या आणि तुम्ही आमच्या बाजूचे की पलीकडच्या, असा बनावट पेच पैदा करायचा याचा अर्थ काय?

अर्थ एकच. समाजात दुफळी घडवायची. ध्रुवीकरण करून टाकयचे. ते आणि आम्ही, आपले आणि परके, भगवे आणि हिरवे, धार्मिक आणि निधर्मी, पुरोगामी आणि प्रतिगामी.... या भेदांचा एवढा गलका करायचा, की बेसावध, भोळ्या बहुजनांना संभ्रमच पडावा. कोण बरोबर अन् कोणाचे योग्य असा संशय प्रत्येकाला यावा. मानवी जीवन असे दुभंगलेलेच कसे असू शकते? त्याला दुरंगीच कसे ठरवता येईल? पण असे द्वंद्वात्मक आयुष्य फार पूर्वी समाजवादी आणि साम्यवादी ठसवू लागले, की तमाम श्रीमंत, उद्योगपती, व्यापारी म्हणत की छे! असे




कष्ट करणारे आणि कष्टाचे शोषण करून त्यावर जगणारे एवढे दोनच वर्ग दुनियेत नसतात. दुनिया कशी रंगीत असते. सप्तरंगी असते इत्यादी. उद्योगपतींच्या वर्तमानपत्रांना व टीव्हीला मग फर्मान सुटे, की ही दुनिया जितकी विविधरंगी अन् चित्रविचित्र दाखवाल तितकी दाखवत चला. आपल्याला ही कष्टकरी विरूद्ध भांडवलदार अशी लढाई मोडून टाकायचीय. तमाम जनता प्रेक्षक होऊन, वाचक होऊन या रंगीत वर्षावात भिजून गेली. बघता बघता प्रेक्षक असण्याचा मान नाहिसा झाला. सारे बघे बनले. वाचक असण्याचाही त्यांचा दिमाख ढळला. अवघे जग घोकंपट्टी करू लागले. वाचक म्हणून निवडीचे स्वातंत्र्य गायब झाले. प्रेक्षक या नात्याने नाविण्यपूर्ण काही बघायला मिळण्याचा हक्क अदृश्य झाला. आधी त्रागा करून पाहिला अनेकांनी. मग आदळआपट. काही जण बोंबलू लागले. थोड्यांनी निषेध करून पाहिला.

कलांतराने हे हक्कांची भाषा करणारेच पेपर आणि टीव्ही यांमधून बेपत्ता झाले. चर्चा, परिसंवाद, भाष्ये, प्रतिक्रिया, मतमतांतरे, मुलाखती अशा सर्व प्रकारांतून ते लुप्त होऊन गेले. गप्प बसा असा इशारा या वजावटीमधून दिला गेला. निखिल वागळे, उदय निरगुडकर, प्रसन्न जोशी, संजय आवटे, आशीष जाधव हे न्यूज अँकर्स अर्थात सूत्रसंचालक पडद्यावरून हरवले तसे कामावरूनही. कुमार सप्तर्षी, रत्नाकर महाजन, कॉ. अजित अभ्यंकर, कॉ. रेड्डी, निळू दामले, भालचंद्र कांगो यांसारखे अभ्यासू नेते नकोसे झाले. कधी चर्चांच्या वेळेतच बदल कर तर कधी ऐनवेळी विषयच बदल. कधी हा विषय नको दुसरा घ्या, असा हुकूम सुटे तर कधी अमुकतमुकांना बोलावू नका, असा दबाव येई. फडणवीसांच्या काळात टीकांवरच्या चर्चा एकाएकी घटल्या. शेवटी बंद झाल्या. त्यांच्याच काळात 'यांना' हटवा आणि 'त्यांना' बसवा अशी दडपणे संपादकांवर येत चालल्याचे ऐकू येऊ लागले. लोकांना आता उत्सुकता नाही. तेच तेच मुद्दे कंटाळवाणे ठरतात; चर्चांचे दिवस संपले, अशी हवा तयार करून टीव्हीसारखे माध्यमही फक्त बघे करून टाकले म्हणजे आता क्लोज सर्किट टीव्ही आणि वृत्तवाहिनी यांच्यात काही फरक नाही. सीसीटीव्ही मान खाली घालून निमूटपणे सारं काही बघत राहतो, टिपतो, साठवतो अन् मालकाला सादर करतो. अगदी तशीच हालत बातम्या देणाऱ्या वाहिन्यांची झाली आहे. आधी देवेंद्र फडणवीस, मग प्रवीण दरेकर, त्यानंतर किरीट सोमय्या आणि अखेरीस अतुल भातखळकर यांच्या पुढ्यात माईकचा बूम द्यायचा; त्यांचे प्रत्यारोप नाही तर प्रतिवाद टिपायचा आणि पाठवून द्यायचा. लगेच महाराष्ट्राला ताजीताजी विरोधी पक्षांची प्रतिक्रिया ऐकू येई.

चर्चा कंटाळवाण्या आणि त्याच त्या मुद्यांवर फिरतात म्हणणाऱ्यांना यांचेही तेच तेच चेहरे, तसलेच प्रतिवाद आणि ठराविक प्रतिक्रिया कशा काय आवडतात बुवा?

माध्यमे आपले मालक असणारे भांडवलदार आणि व्यावसायिक यांचे म्हणणे ऐकतात, हे माहित होते. पण या मालकांचेही मालक असतात, हे नवीनच ऐकले. सत्तेत बसणारेच जनतेचे प्रतिनिधी असतात, असा समज माध्यमांनी अवघ्या देशाचा करून ठेवला आहे. ज्यांच्यापाशी सत्ता नाही त्यांनी तोंड उघडू नये, असा नवा कायदा देशात लागू झाला आहे. निवडणुका आल्या की लोकांपुढे कॅमेरा जाणार, माईक जाणार... एकदा का शपथविधी झाला, की पाठ फिरवणार आणि केवळ सत्ताधाऱ्यांचा स्पीकर व्हायचे काम करणार.

लोकांना हे समजले आहे. आपल्यापाशी सत्ता नाही तेव्हा चुप बसणे इष्ट, असा धडा त्यांनी स्वतःच स्वतःला दिलेला आहे. बघू पाच वर्षांनी असा विचार करीत ते मुके होऊन जातात. पाच वर्षे फक्त बघत राहतात. सन्नाटा गाढ होत जातो.

**(लेखक ज्येष्ठ माध्यमतज्ज्ञ आहेत)** ●●●

# सर्वच विचारसरणींनी मूलगामी होणे गरजेचे

कथित 'सत्योत्तर' वादामुळे हे पुन्हा एकदा स्पष्ट झाले आहे, की आता केवळ पृष्ठभागीय पातळीवर वावरणाऱ्या वा केवळ आंशिक अंगाने भिडणाऱ्या विचारसरणी **वास्तवाचा वा सत्याचा खऱ्या अर्थी वेध घेऊ शकणार नाहीत. त्यासाठी सर्वच विचारसरणींना अधिक मूलगामी आणि समग्र होणे गरजेचे आहे!**



**दत्ता देसाई**

**(उत्तरार्ध)**

मुळात हे कथित 'सत्योत्तरी' जग 'आधुनिकोत्तर'च्या आणि 'उत्तर'-प्रणालींच्या पाठोपाठ का येते? आधुनिकोत्तरवादाने वस्तुनिष्ठता, सत्य, सामाजिक वास्तव आणि त्यांचे अर्थ लावण्याच्या व्यापक चौकटी 'महाकथने' याविषयीच्या तोवरच्या यांत्रिक, सरधोपट अणि अमूर्त सार्वत्रिक कल्पनांबद्दल काही रास्त प्रश्न नक्कीच उभे केले. मात्र पुढे जाऊन या मूलभूत कल्पनाच नाकारणारे वैचारिक वातावरणही 'उत्तर'-कल्पना प्रणालींनी निर्माण केले. परिणामी वास्तव, वस्तुनिष्ठता, सत्य अशा कल्पना जणू नामशेष झाल्या असे भासवणारे 'सत्योत्तर' जग नावाचे प्रकरण पुढे येणे सोपे झाले.

हे प्रकरण या व्यवस्थेच्या अशा टप्प्यावर, अशा काळातच पुढे का येते, की जिथे अनिर्बंध आणि अफाट गतिमान जुगारी-सट्टेबाज वित्त-भांडवलाचे वर्चस्व प्रस्थापित होते? भांडवलाचे अधिक प्रभावी झालेले कोणते गतिशास्त्र यामागे आहे? त्यातून सामाजिक-सांस्कृतिक जीवनात आणि मानवी जाणिवांमध्ये नेमके कोणते बदल घडताहेत? आजच्या युगात एका बाजूने भांडवलाने मानवी जीवनात, सामाजिक संबंधांत आणि जाणिवेत परात्मता, परवशता अणि शतखंडितपणा आणला आहे. आज भ्रामक गरजा मानुष गरजांवर कुरघोडी करत आहेत आणि त्या बाजार-गतिशास्त्र मोकाट सोडत आहेत. एकीकडे अफाट विपुलता आणि उधळमाधळ, तर दुसरीकडे अमानुष वंचितता आणि टंचाई हे ध्रुवीकरण वाढते आहे. हे केवळ भौतिकच नव्हे, तर सांस्कृतिक-आत्मिक जीवनाबाबतही सत्य आहे.

**भांडवलाचा सट्टेबाजपणा बनवतोय मानवी जीवन क्षणभंगूर**

मानवसमूहांच्या स्वत:च्या निर्मिती या त्यांना स्वत:लाच परक्या बनून स्वत:च्याच उरावर नाचणाऱ्या शक्ती म्हणून माणसांना तोंड द्यावे लागते आहे. पैसा-वस्तू-भांडवल-बाजार-राज्यसंस्था या मनुष्यनिर्मित वस्तूंच्या तालावर माणसांना नाचावे लागते आहे. माणसे स्वत:पासून आणि इतरांपासून दुरावत आहेत. मानवी नात्यांचे वस्तूकरण होते आहे आणि वस्तूंना अद्‌भूत गुण प्रदान करणारे विभूतीकरण होते आहे. क्रयवस्तू विभूतीकरण हे सर्व क्षेत्रात आणि क्षणोक्षणी सामोरे येत आहे. तो भांडवली कल्पनाप्रणालींचा, गतिनियमांचा व सिध्दांतांचा आधार आहे. त्याने मानवी संस्कृतीचा व जाणिवेचा ताबा घेतलेला आहे. मार्क्सने उघड केलेली ही वैशिष्ट्ये आता जागतिक-सार्वत्रिक झाली आहेत. त्याचवेळी भांडवलाचा जुगारी-सट्टेबाजपणा आता 'न भूतो...' असा जगव्यापी गतिमान झालेला आहे. तो संपूर्ण मानवी जीवनाला, समाजवास्तवाला आणि व्यक्तीच्या जाणिवांना विखंडित, अस्थिर आणि त्याचवेळी क्षणभंगूर बनवून टाकतो आहे. मार्क्स म्हणतो तसे भांडवल व्यवस्थेत ''जे जे स्थिर, निश्चित, घट्ट गोठलेले असते ते झटकून दूर लोटले जाते. जे नव्याने आकार घेते आहे ते प्रस्थापित होण्याआधीच कालबाह्य बनून जाते. जे जे सघन, भरीव आहे ते ते हवेत वितळून जाते. जे जे पवित्र आहे ते ते कलंकित केले जाते''! श्रमाची निर्मिती म्हणून अस्तित्वात येणारे भांडवल, क्रयवस्तू, मूल्य, जमीन इत्यादी सारे, हे केवळ 'वस्तू', गोठलेले सामाजिक संबंध आणि परात्मशक्ती तर बनतातच, पण पुढे जाऊन त्यांना एक गूढ सामाजिक रूप प्राप्त होते हे मार्क्सने लक्षात आणून दिले.

हे आता जागतिक आणि सार्वत्रिक झाले आहे. मार्क्स म्हणतो तसे माणसाचे, त्याच्या सर्जनशीलतेचे, त्याच्या श्रमाचे गुण हे जणू भांडवलाच्या आणि जमिनीच्या मालकाचे गुण बनून गेले आहेत. एवढेच नव्हे तर, त्याने दाखवल्याप्रमाणे खुद्द निसर्गाचेही गुण आता भांडवलाच्या व जमिनीच्या मालकाचे गुण बनून गेले आहेत. हेच जणू खरे वास्तव आहे, हेच 'नैसर्गिक' आहे या समजेने आता सार्वत्रिक पकड घेतली आहे. परिणामी मार्क्स म्हणतो तसे या साऱ्याचे निर्माते आणि प्रत्यक्ष मानवी संस्कृती अस्तित्वात आणणारे श्रम हे केवळ पिशाच बनून राहतात. 'या मोहमयी, विपर्यस्त, विकृत आणि उफराट्या जगात श्रीमान भांडवल आणि श्रीमती भूमी हे निव्वळ वस्तू म्हणून आणि त्याचवेळी सामाजिक व्यक्तिमत्वाच्या रूपात भुताप्रमाणे वा पिशाचाप्रमाणे सर्वत्र वावरू लागतात.' ही वैशिष्ट्ये आजच्या जागतिक समाजात मानवी जाणिवा, ज्ञानशाखा, कल्पनाप्रणाली व सामाजिक सिद्धांत व



रेखाटने : महादेव खुडे

'विज्ञाने' यांचा पायाभूत आधार आहेत, ही खरी समस्या आहे.

अशा गूढ, मोहमयी, विपर्यस्त, विकृत, उफराट्या आणि शतखंडित जाणिवांना व ज्ञानशाखांना आजच्या व्यामिश्र, अंतर्विरोधी व गतिमान वास्तवाचा आणि सत्याचा वेध घेणे कसे जमणार? आणि प्रचलित व्यवस्थेला ते परवडणार तरी का? वास्तवाला विपर्यस्त रूपात पाहणे आणि सत्याला झाकोळून टाकणे ही आजच्या व्यवस्थेच्या अस्तित्वाची गरज बनली आहे. त्याचवेळी हेही वास्तव आहे, की माणसे वैयक्तिक आणि सार्वजनिक जीवनात तसेच जाणिवांच्या-विचारांच्या पातळीवरहे भ्रम, या भ्रांतिका आणि ही 'भुते' याविरुध्द सतत झगडत आहेत. पण हे वर्चस्व झुगारून देता येईल अशा निकराच्या अवस्थेला हा संघर्ष अजून पोचताना दिसत नाही. वास्तव वैज्ञानिक पध्दतीने 'जाणता' येते आणि ते बदलता येते, याविषयीचा विश्वास आणि आत्मविश्वास यांना आधुनिकोत्तर आणि 'सत्योत्तर' बदलांनी व चर्चाविश्वांनी वैचारिक-अकादमिक क्षेत्रात आणि समाजात जाणिवांच्या पातळीवर जवळजवळ बहिष्कृत केले आहे काय? गतिमान जगातही नेमकेपणा आणि निष्ठा, निर्णायक व ठाम भूमिका घेणे हे शक्य आणि आवश्यक आहे, हे झाकोळले गेले आहे का? त्या जागी तद्दन व्यवहारवाद, किंकर्तव्यमूढता व प्रवाहपतितता हे प्रभावी झाले आहेत की काय? असे प्रश्न उभे झाले आहेत.

## 'वळणां'मध्ये अडकले 'वास्तव'?

आधुनिक भांडवल व्यवस्थेचा काही शतकांचा वर्धिष्णु टप्पा संपल्यावर आणि अफाट विस्तार साधल्यानंतर या विकासासोबत चालणाऱ्या तिच्या विनाशाच्या अंगाने आता भीषण स्वरूप धारण केले आहे. दुसऱ्या महायुध्दानंतरचा भांडवलशाहीचा 'सुवर्णकाळ' संपल्यानंतर, विशेषत: गेल्या काही दशकांमध्ये भांडवल व्यवस्थेचा ऱ्हासकाल गतिमान होऊ लागला. तिच्या विसंगती आणि तिचे विरोधाभास आपल्याला कडेलोटाकडे नेऊ लागले. समाजजीवनाच्या लोकशाहीकरणाची प्रक्रिया थंडावू लागली आणि विविध क्षेत्रात मानवी मूल्यांची व विकासाची प्रगतिशीलता पुढे जाण्याचे प्रमाण उत्तरोत्तर घटू लागले. या काळात वैचारिक क्षेत्रातही काही महत्त्वपूर्ण बदल घडू लागले. या कालखंडात 'भाषिक वळण' (Linguistic Turn), 'सांस्कृतिक वळण' (Cultural Turn),'आधुनिकोत्तर वळण' (Post-Modern Turn) आदी 'वळणे' आली. समाजवास्तव आणि विज्ञानदेखील भाषा, संस्कृती वा विचारसापेक्ष असते अशा स्वरूपाच्या मांडण्या यातून प्रभावी झाल्या. यांत्रिक 'विज्ञानवादा'सह (Scienticism) विविध विचारसरणींच्या चाकोरीबध्द आणि प्रस्थापित आवृत्त्या या नव्या 'वळणां'च्या हल्ल्यांपुढे हतबल बनल्या. हे खरे, की वास्तव घडण्यामध्ये भाषा, व्यक्तिनिष्ठ घटक व जाणीव तसेच संस्कृती या घटकांचे असलेले महत्त्व या 'वळणां'नी रास्तपणे समोर आणले. पण या घटकांबाहेर वस्तुनिष्ठ सत्य असे जणू काही नसते, हा त्यांचा दावा मात्र नक्कीच एकांगी, 'अ-वास्तव' आणि अशास्त्रीय आहे.

वास्तवाचे छोटे पैलू वा विशिष्ट आयाम घेऊन अकादमिक तसेच राजकीय काम करणे हे विशिष्ट कारणांनी आवश्यक असते हे खरे. पण हे विशेषीकरण आणि अमूर्तीकरण यावरील भर अधिक वाढला आणि समग्राचे भान सुटले. या साऱ्यात वास्तवाचे काही विशिष्ट पैलू वा आंतरसंबंध कळत-नकळत वगळण्याची पध्दत प्रस्थापित झाली. उदा. इतिहासविषयक भौतिकवादी, जडवस्तूवादी संकल्पना, समाजशास्त्र-राज्यशास्त्र यांचे वर्गीय आकलन, अर्थशास्त्र व राजकीय अर्थव्यवस्था यांची आमूलाग्र समीक्षा हे आणि विचार व सिध्दांत, मूल्ये आणि मनोराज्ये यांच्याशी असलेले त्यांचे व्यामिश्र परस्परप्रभावी संबंध हे बाजूला सारले गेले. ज्ञान-विज्ञान शाखांची आणि विचारसरणींची गृहीतके आणि त्यावर आधारित सिध्दांत हे सारे 'जसे आहे तसेच ते असते' अशा रितीने मान्य होत गेले. ही गृहीतके आणि हे सिध्दांत जणू त्रिकालाबाधित असतात वा ते संप्राप्त (given) आहेत किंवा ते स्वाभाविक-नैसर्गिक आहेत, असे मानूनच सारे व्यवहारही सुखेनैव केले जाऊ लागले आहेत. त्यामुळे तरंगती वा व्यक्तिनिष्ठ वैचारिकता आणि सांस्कृतिक सापेक्षवाद हे अधिक बोलके झाले. विविध समाज-अंगांना आंतर-वा पार-विद्याशाखीय पध्दतीने एकत्र आणणे सुरू झाले. पण ते वास्तवापासून तुटलेल्या वा एकांगी तुकड्यांना एकत्र आणणे ठरू लागले. यातून एकीकडे नवे 'अकादमिक/पंडिती' वातावरण व 'तज्ज्ञवादी' प्रभुत्व तयार झाले, तर दुसरीकडे यातून उपस्थित केल्या गेलेल्या प्रश्नांना पुरेसे न भिडता, त्यांना टाळून पुढे जाण्याचे प्रयत्न परिवर्तनवादी प्रवाहांकडून होत राहिल्याने वर्तमान वैचारिक-राजकीय कोंडी फुटणे अशक्य बनले. परिणामी वैचारिक पातळीवर 'उत्तरी' आणि

कथित 'सत्योत्तरी' चर्चाविश्वाला वाव मिळाला आणि त्याचवेळी प्रत्यक्षात मात्र शुध्द व्यवहारवादाला मोकाट मैदान मिळणे शक्य झाले. यातूनच एक प्रकारचे प्रवाहपतीतपणदेखील येत राहिले आहे. यामुळे काही मोजके सन्माननीय अपवाद वगळता राजकीय-सामाजिक तसेच अकादमिक अशा दोन्ही वैचारिक जगांकडून परिवर्तन विचार व व्यवहाराला मूलभूत स्वरूपाचे भरीव काही मिळणे हे आता दुरापास्त झाले आहे.

या न-निर्णायकी, अनिश्चित 'संधीकाला' (interregnum) आणि कथित 'सत्योत्तरी' जगात विविध परिवर्तनवादी विचारसरणींची भूमिका काय हा मुद्दा अधिकच गंभीर बनला आहे. म. गांधींच्या 'सत्याचे प्रयोग' पासून कार्ल मार्क्सच्या 'प्रॅक्सिस'पर्यंतच्या ('सिध्दांत-व्यवहाराचे द्वंद्वात्मक गतिशास्त्र') साऱ्या मूलगामी नैतिक-राजकीय पद्धतींचे आजच्या संदर्भात करायचे काय, असे प्रश्न उभे झाले आहेत.

## दुसरे प्रबोधन आणि 'वस्तुनिष्ठ'सत्य!

गेली काही दशके आपल्या इथे 'दुसऱ्या प्रबोधन चळवळी'च्या गरजेची चर्चा आहे आणि ती रास्त आहे. या 'दुसऱ्या प्रबोधना'त आशय आणि तंत्रे व माध्यमे हे दोन्ही वेगळे आणि नवे हवे हे खरे, पण तेवढेच पुरणार नाही. या दोन्हींचा पाया काय आणि पध्दती कोणती हाही मुद्दा आता अधिक निर्णायक ठरतो आहे. अर्थात, हे केवळ 'प्रबोधना'च्या नव्हे, तर एकंदर परिवर्तनवादी राजकारणाच्या दृष्टीने महत्त्वाचा आहे. इथून पुढच्या प्रबोधनाचे आणि राजकारणाचे स्वरूप आणि उद्दिष्ट निश्चित करण्याच्या दृष्टीने आणि वर्तमान कोंडी फोडण्याच्या दृष्टीनेही तो महत्त्वाचा आहे.


युरोपीय प्रबोधन चळवळीच्या आणि आधुनिक विज्ञान-विकासाच्या पार्श्वभूमीवर, १९ व्या शतकाच्या पूर्वार्धात युरोपमध्ये 'वास्तव वा सत्य' काय याबाबतची चर्चा पुन्हा एकदा जोरात वर आली होती. विविध तत्त्वज्ञानात्मक दृष्टिकोनांमधून त्याबद्दल बरेच काही मांडले जात होते. विचार स्वयंभू मानून त्यांच्या जोरावर सत्य निश्चित करणारा प्रवाह यामध्ये खूपच प्रभावी होता. तत्कालीन औपचारिक विवेकवादी व यांत्रिक जडवस्तूवादी दृष्टिकोन त्याचा समर्थपणे प्रतिवाद करू शकत नव्हते. अशावेळी या साऱ्या चर्चाविश्वाला कलाटणी देणारा जो एक संपूर्ण नवा क्रांतिकारी दृष्टिकोन मार्क्सने मांडला, त्यात याबाबत त्याने एक महत्त्वपूर्ण विधान केले होते : ''वस्तुनिष्ठ सत्य हा मानवी विचाराचा गुणविशेष मानता येईल, की नाही हा प्रश्न सैध्दांतिक नाही, तर प्रत्यक्ष व्यवहाराचा प्रश्न आहे. सत्य म्हणजे वास्तवता आणि सामर्थ्य. माणसाच्या विचाराची ऐहिकता हे त्याला प्रत्यक्ष व्यवहारात सिद्ध करता आले पाहिजे. प्रत्यक्ष व्यवहारापासून तुटलेल्या विचाराच्या सत्यतेविषयीचा वा असत्यतेविषयीचा वाद हा शुद्ध पंडिती प्रश्न आहे.''

वास्तव वा सत्य काय याचे निर्णय केवळ विचार, कल्पनाप्रणाली, सिध्दांत, प्रचार, भाषा, जाणीव यांनी करता येत नाहीत. मानवी हस्तक्षेप नसलेले नैसर्गिक घटक वगळता सर्व घटक हे मानवी-सामाजिक वास्तवाचा भाग असतात. ते वास्तवावर परिणामही करतात; परंतु ते संपूर्णवास्तव वा सत्य निश्चित करत नसतात. त्यामुळेच मार्क्सच्या मते, हा प्रश्न या अर्थाने व्यवहारनिष्ठ आहे, की विशिष्ट स्वरूपाच्या सामाजिक व्यवहारांनी आणि मानवी कृतींनी म्हणजे वैज्ञानिक व्यवहार व कृतींच्या आधारे त्या वस्तुनिष्ठ सत्याप्रत पोहचणे शक्य आहे. दुसरे, वस्तुनिष्ठ सत्य हे केवळ बाह्य जगाची नक्कल, प्रतिबिंब वा प्रतिमा निर्माण करणे एवढ्यापुरतेच मर्यादित नाही, तर 'सत्य' हे माणसांनी जग व परिस्थिती आकळून, समजून घेऊन ते बदलण्याशी, त्या बदलण्यात 'सत्य' गवसण्याशी, एवढेच नव्हे तर ते 'निर्माण' करण्याशी आणि त्याचे ज्ञान होण्याशी ते जोडलेले आहे. सत्य ही गतिमानव बहुस्तरीय बाब असते. त्यासाठी वास्तवातील विसंगतींचा व अंतर्विरोधांचा शोध घेणे आवश्यक असते. 'वास्तव' हे त्यात दडलेल्या नव्या संभाव्यतांसह समजून घ्यावे लागते. त्यामुळे अंतःस्थ वास्तवाचा वेध घेणे, त्या आधारे समोर उभ्या ठाकलेल्या समस्या सोडवणे आणि कोंडी फोडणे या अनुभवनिष्ठ व्यवहाराशी सत्याचा शोध अपरिहार्यपणे जोडलेला असतो. सामाजिक वास्तव व सत्य हे व्यापक सामाजिक व्यवहारांमधून, 'वाटाघाटीं'मधून आणि वर्गसंघर्षातून कसे रचले जाते व घडते हे उघड करावे लागते. त्यामुळे कथित 'सत्योत्तरी' प्रकरण का व कसे उद्‌भवते आणि ते कोणती सामाजिक-वैचारिक भूमिका बजावते याचेही ठोस व अनुभवनिष्ठ विश्लेषण महत्त्वाचे ठरते. कथित 'सत्योत्तर' वादामुळे हे पुन्हा एकदा स्पष्ट झाले आहे, की आता केवळ पृष्ठभागीय पातळीवर वावरणाऱ्या वा केवळ आंशिक अंगाने भिडणाऱ्या विचारसरणी वास्तवाचा वा सत्याचा खऱ्या अर्थी वेध घेऊ शकणार नाहीत. त्यासाठी सर्वच विचारसरणींना अधिक मूलगामी आणि समग्र होणे गरजेचे आहे!

## फारकत आणि एकजूट : फेरमांडणीची गरज

आता पुन्हा एकदा जगड्व्याळ आणि गुंतागुंतीच्या भांडवल व्यवस्थेच्या बदलत्या आणि बहुस्तरीय, विखंडित आणि बहुअंगी, अनेकविध अंतर्विरोधांसह असलेल्या वास्तवाचा व सत्याचा वेध अधिक प्रगत वैज्ञानिक पध्दतीने घेण्याचा मुद्दा ऐरणीवर आला आहे. त्यासाठी वर उल्लेखिलेल्या सर्व 'वळणां'शी संवाद आणि संघर्ष करत इथल्या परिवर्तनवादी विचारप्रणालींनी आपापली फेरमांडणी करणे आवश्यक झाले आहे. इथे 'फेरमांडणी' हा शब्द महत्त्वाचा आहे. कारण आज फुले-गांधी-आंबेडकर-मार्क्स या विचारांना मानणाऱ्या सगळ्यांनी एकत्र आले पाहिजे, असे पुन:पुन्हा मांडले जाते आहे. त्यात तथ्य नक्कीच आहे. पण केवळ 'एकत्र' येणे एवढेच यात अभिप्रेत असले पाहिजे का? की त्यात आता अधिक खोलात आणि एका अर्थी 'पुढे' जाण्याची गरज आहे?

महाराष्ट्रात उदा. दि.के. बेडेकर, गं.बा. सरदार, बाबूराव बागूल, नलिनी पंडित, रावसाहेब कसबे, शरद पाटील यांनी आणि अशा अनेकांनी केवळ 'एकत्र येणे' याहीपेक्षा पुढचे मांडण्याचे मौलिक प्रयत्न केले आहेत. त्यामुळे आजच्या गुणात्मक नव्या परिस्थितीत अर्थातच एकीकडे म. फुल्यांपासून




रेखाटने : महादेव खुडे

गांधी-आंबेडकर-लोहियांपर्यंत आणि दुसरीकडे जगातील व भारतातील मार्क्सवादापर्यंत सर्व विचार-व्यवहार पध्दतींचा पुन्हा एकदा विचार होणे आज आत्यंतिक निकडीचे बनले आहे. यातील काही (उदा. फुले, मार्क्स विचार) गेली दीड-पावणेदोन शतकांहून अधिक काळ विकसित होत आली आहेत. त्यांचा जो बरा-वाईट व्यवहार झाला आहे, त्यांचे 'पुनर्वाचन'व पुनर्मूल्यांकन महत्त्वाचे ठरते आहे. त्यामुळे उदा. मार्क्सविचाराची पुनर्मांडणी ही खुद्द मार्क्सवादी प्रवाहासाठी तर आवश्यक आहेच, पण जागतिक भांडवलशाहीचा वेध घेऊ इच्छिणाऱ्या सर्व परिवर्तनवादी प्रवाहांसाठीही ते आवश्यक व सहाय्यभूत ठरणारे आहे.

परिवर्तनाचे विविध विचार आणि त्यांचे राजकीय-सामाजिक व्यवहार यात एकमेकांत काहीएक फरक असणार हे खरे. पण प्रत्यक्ष ऐतिहासिक वाटचालीतून उमलून वर आलेले आदर्श आणि सिध्दांत, विचार आणि वास्तव यांची आज जी फारकत झाली आहे, त्यावर मात करून त्यांची नवी जुळणी कशी घडवणार हा सर्वांच्याच दृष्टीने कळीचा प्रश्न आहे. यातूनच वास्तव म्हणजे 'काय आहे' आणि आदर्श म्हणजे 'काय असायला हवे' यातील फारकत मिटवण्याचा प्रश्न उजव्यांना फारसा भेडसावत नाही. कारण त्यांची नीती दुहेरी आहे. एकीकडे 'बोले तैसा चाले' रितीने त्यांची भूमिका व त्यांचे आचरण हे संकुचित-परद्वेष्टे-दहशती-हिंसक आहे. दुसरीकडे, त्यांचे 'आदर्श' हे आधुनिक जीवनाशी विसंगत वा गुंगवणारा प्रचार वा केवळ बोलघेवडेपणाचा आधार म्हणून उच्चारले जातात. दुटप्पी नैतिकता आणि आधुनिक मानवी व संवैधानिक मूल्ये यांच्याबाबत उफराटा व्यवहार हा त्यांचा स्थायीभाव असल्याने विचार-व्यवहारातील फारकत ही त्यांच्या लेखी अजिबात 'समस्या' नाही. त्यांच्या लेखी हे असेच असणे उचित, न्याय्य वगैरे असते! तर मध्यममार्गी-काँग्रेसी प्रवाह हे तद्दन व्यवहारवाद, सामाजिक अभियांत्रिकी (धर्म-जात समीकरणे!), हितसंबंध-लॉब्या-निवडणुका यांचे व्यवस्थापन आणि सर्व प्रकारचे संधीसाधू अनुनय यात अडकले आहेत. त्यांनाही वास्तव आणि आदर्श यातील फारकतीची समस्या भेडसावण्याचे काही कारण नाही. उदा. सर्व 'काँग्रेसी' पक्ष आणि नेहरूविचार यांची फारकत जाणवण्याइतकी आहे आणि गांधी विचारांशी तर त्यांचा आता तीळमात्र संबंध उरलेला नाही!

परिवर्तनवाद्यांच्या दृष्टीने मात्र हा प्रश्न अत्यंत कळीचा आहे. त्यांच्यामध्ये आजच्या काळाशी सुसंगत अशी व्यापक वैचारिक-राजकीय भूमिका, भविष्यवेधी दृष्टीस्वप्न आणि सुस्पष्ट रणनीती यांचा अभाव जाणवतो आहे. त्यामुळेही त्यांच्यावर व्यवहारवादाचा प्रभाव पडतो आहे आणि तत्त्व/सिध्दांत व व्यवहार यात फारकत राहाते आहे. या प्रवाहांकडून आपापल्या तत्त्वांचा, मूल्यांचा, विचारसरणींचा उच्चार केला जात नाही असे नाही. तो होत असतो आणि खरोखरी प्रामाणिकपणे होत असतो. पण त्यातील भरीव आशय आणि प्रभावी जिवंतपणा याची वानवा/ अनुपस्थिती अगदी जाणवण्यासारखी आहे. त्यामुळे वैचारिक तुंबलेपण व एकारलेपण, त्यातून येणारा काही प्रवाहांचा अन्य बंधु-भगिनी प्रवाहांबद्दल संकुचितपणा वा आक्रमकपणा, तर दुसरीकडे घायकुतीला येऊन केलेल्या तात्कालिक आघाड्या असे चित्र आहे. त्यामुळे सिध्दांत आणि व्यवहार या दोन्ही पातळ्यांवरील आणि त्या दोहोच्या संबंधांमधील पेचातून मार्ग काढण्यासाठी त्या त्या प्रवाहांतर्गत जसे नवे प्रयत्न व्हायला हवेत, तसेच त्यासाठी सर्व प्रगतिशील प्रवाहांनी एकत्र येण्याचीही नितांत गरज आहे. यात परस्पर-संवादाबरोबर अर्थपूर्ण वाद तसेच ताण-मतभेदाबरोबर सहकार्य हे नक्कीच आवश्यक आहेत. यातूनच नव्या सर्जनशील शक्यता वर येतील. आज ठिकठिकाणी विविध जनविभागांच्या कृती व संघर्ष आहेत. बहुतेक परिवर्तनवादी प्रवाहांमध्ये मंथन, पुनर्वाचन व नवे काही मांडण्याचे प्रयत्न होत आहेत. पण ते अधिकतर विखुरलेले आहेत. हे सारे वैचारिक-मूल्यात्मक पायासह आणि छोट्या-छोट्या सुधारणांसह व्यूहात्मक रणनीतीपर्यंत एकत्र येणे कधी नव्हे एवढे गरजेचे बनलेले आहे. त्यामुळे परिवर्तनवादी प्रवाहांनी आपापल्या विचारसरणींची फेरमांडणी आणि परिवर्तनवादी राजकारणाची फेरआखणी तत्काळ हाती घेण्याला आता पर्याय उरलेला नाही. केवळ एका विचारसरणीने दुसऱ्या विचारसरणीकडे बोट दाखवणे थांबवून अंतर्मुख होण्याची, स्वत:ला बदलण्याची आणि आपापली फेरमांडणी करण्याची गरज आहे. या अर्थी या सर्व परिवर्तनवादी विचारसरणींनी अधिक मूलगामी ('रॅडिकलाईज') व्हायला हवे आहे.

## भूमीदृष्टी आणि मूलगामी राजकारण

अधिक मूलगामी व्हायचे तर त्यासाठी आपली भूमीदृष्टी कोणती, हा मुद्दा पुन्हा कळीचा बनला आहे. भूमीदृष्टीचा इथे अर्थ केवळ स्वत:पुरते वा पायापुरते पाहणारी संकुचित दृष्टी असा अजिबात नाही. तर विशिष्ट विभाग, तत्त्व वा 'हित' यांच्या पायावर व त्यांच्या बाजूने उभी राहणारी भूमीदृष्टी (standpoint) अवलंबत असतानाच ती 'आकाशा'ला गवसणी घालणारी कशी असेल हा प्रश्न त्यात गुंतलेला आहे. म्हणजेच अशी विशिष्ट भूमिका, की ज्यात त्या विभागाबरोबरच सार्वत्रिक कल्याण व वैश्विक मुक्तीचे सत्य सामावलेले असेल.

स्वातंत्र्यानंतर काही दशके वर्ग की वर्ग-जाती या स्वरूपाचे अत्यंत गांभीर्याने लढवले गेलेले वाद गेली काही दशके निस्तेजले आहेत. आता केवळ आठवण देण्यापुरता, तोंडी लावण्यापुरता वा केवळ नैतिक वा औपचारिक बांधिलकीचा मुद्दा म्हणून नव्हे, तर आपल्या विश्लेषणाची, विचारसरणीची व राजकारणाची मांडणी आणि व्यवहार करताना आपली भूमीदृष्टी कोणती हा प्रश्न केंद्रीय बनला आहे. सर्व प्राथमिक उत्पादक-कष्टकरी वर्ग आणि सर्जनशील श्रम ही भूमीदृष्टी असणार की नाही, हा प्रश्न आहे. मग गांधीवादात तो 'शेवटचा माणूस' असेल, आंबेडकरवादात दलित-कष्टकरी वा सामाजिक सर्वहारा असेल, मार्क्सवादात या सर्वांना कवेत घेणारा सार्वत्रिक सर्वहारा असेल-आणि पुन्हा या साऱ्यांत स्त्री केंद्रस्थानी असेल-तरच हे अर्थपूर्ण होईल. तसे पाहता सर्व परिवर्तनवादी प्रवाह हे तत्त्वत: मान्यच करतात. त्यांच्या अधिकृत भूमिकांमध्ये व जागोजागच्या जनकार्यातही ते नक्कीच दिसून येते. पण तरीही कुठेतरी एक मोठी दरी, एक भेग पडली आहे. ती काय आहे याचा शोध आपापल्या व्यवहारातून घेणे आवश्यक झाले आहे.

हे सर्व प्रवाह-म्हणजे अगदी स्त्रीवादी, पर्यावरणवादी यांच्यासह गांधीवादी, लोहियावादी, आंबेडकरवादी, मार्क्सवादी वा यांच्या संयुक्त जुळण्या, असे सारे प्रवाह -एक कोंडी अनुभवताहेत. कळत-नकळत ते आजच्या प्रस्थापित सामाजिक वास्तवाच्या एका वळणावर येऊन अडकले आहेत का? त्यांचे हे अडकणे, त्यांची ही कोंडी ही, मूलत: मध्यमवर्ग म्हणजे शहरी-ग्रामीण मध्यमवर्ग, दलित मध्यमवर्ग, संघटित कामगार-कर्मचारी, अल्पसंख्य जमातींमधील वरचे (क्रिमी?) स्तर यांच्या भोवतालचे अर्थकारण-समाजकारण व त्याचे राजकारण करण्यात अडकले आहेत यातून उद्‌भवली आहे का? इथे मुद्दा परिवर्तनवाद्यांनी या विविध मध्यम वर्गांसाठी व ऊर्ध्वगामी स्तरांसाठी राजकारण करावे की करू नये, असा अजिबात नाही. ते केलेच पाहिजे. पण प्रश्न हा आहे, की स्वप्ने व आकांक्षा, जगाकडे बघण्याची दृष्टी व उपायांची दिशा, जनतेत कार्य करण्याची संस्कृती व कार्यपध्दती, संघटनपध्दती व नेतृत्वसंस्कृती, विषयपत्रिका आणि राजकीय भाषा या साऱ्यांबाबत परिवर्तनवादी राजकारण हे कळत-नकळत मध्यम-संघटित वर्गांच्या व त्यांच्या दृष्टिकोनांच्या प्रभावात अडकलेले आहे का?

## मुळापर्यंत भिडणारे राजकारण आणि नेतृत्व हवे

इथे मुद्दा हा आहे, की मध्यम-संघटित वर्ग-जातींचे राजकारण, आम जनतेचे तसेच एकंदर देशाचे समाजकारण हे कोणती भूमीदृष्टी ठेवून व कोणत्या व्यापक राजकारणाचा भाग म्हणून करावे? विशाल श्रमिक-प्राथमिक उत्पादक वर्ग-जाती-स्त्रियांचे हितसंबंध, तशा सामाजिक जुळण्या, तशी लोकशाही संस्कृती, त्यांच्यातून येणारे नेतृत्व आणि त्यांना मुळापर्यंत भिडणारे राजकारण घडवणे ही आजची गरज आहे. यावर पुरेसा व ठोस जोर नसल्याने परिवर्तनवाद्यांचे विचार आणि दृष्टिकोन, राजकारण हे कळत-नकळत व्यवहारवादात, उदारमतवादी मर्यादेत आणि प्रचलित चौकटीत अडकत चालले आहे का, याचा विचार होणे आवश्यक आहे. परिवर्तनवादी राजकीय प्रवाह तसेच आपले वैचारिक क्षेत्र हे यामुळे एक प्रकारचे नैराश्य अनुभवत आहे का, असाही प्रश्न आहे. हे नैराश्य अशा मध्यम-संघटित वर्गांमध्ये आहे का, की कालवर ज्यांनी मोठी स्वप्ने पाहिली आणि आज ती विरून जाताहेत? या वर्गांनी आजवर ज्या कल्याणकारी/सामाजिक उदारमतवादावर वा नोकरशाही समाजवादावर श्रध्दा ठेवली आणि ज्याचे काही न्याय्य व चांगले लाभही या विभागांना झाले - तोच कोसळत आहे, हे पाहावे लागण्यामुळे हे नैराश्य आले आहे का? नवी, अधिक विशाल स्वप्ने न पाहू शकणाऱ्या आणि क्रांतिकारी परिवर्तनाबद्दल आस्था नसलेल्या वर्गांचे हे नैराश्य आहे का? बहुतांश परिवर्तनवादी प्रवाहांचे बहुजन कष्टकरी जनसमुदायांशी काहीएक आर्थिक-विकासात्मक नाते असूनही वैचारिक-सांस्कृतिक-राजकीयदृष्ट्या त्यांच्यापासून हे जनविभाग दुरावलेले आहेत काय, हे चिंतेचे विषय आहेत.

परिवर्तनवादी विचारसरणींनी मूलगामी (रॅडिकलाईज) होणे, म्हणजे अनेकदा समाजमाध्यमांवर दिसते तसे कंठाळी वा एकांगी-जहाल होणे नव्हे. उलट व्यापक व वैश्विक होणे. तसेच लोकांपासून तुटणे नव्हे, तर आजच्या सामाजिक वास्तवाशी आणि लोकांशी जैवपणे सांस्कृतिक-राजकीय अंगांनी जोडून घेणे. व्यापक होण्याचा अर्थ, आज काहीवेळा अधलामधला मार्ग काढणे वा तात्कालिक तडजोडी करणे असा लावला जातो. त्यातून परिवर्तनवादी हे जैसे-थेवाद्यांजवळ उभे आहेत, अशी लोकांची भावना झाली आहे. यातून एकीकडे तत्त्वनिष्ठ व प्रगतिशील राजकारणावरचा लोकांचा विश्वास उडतो आहे, तर दुसरीकडे, दैनंदिन राजकारणासाठी प्रस्थापित पक्ष हे त्यांना अधिक कामाचे आणि परिणामकारक वाटू लागले आहेत. डावपेच आणि परिस्थितीची गरज म्हणून मध्यममार्गी वा तद्दन व्यवहारवादी पक्षांशी आघाड्या वगैरे करत असतानादेखील त्या आपण आपल्या भूमीवरून, परिवर्तनवादी चौकटीच्या आधारे आणि ती पुढे नेण्यासाठी कशा करणार, हा मुद्दा पुन्हा कळीचा बनला आहे.

इथे तात्कालिक आणि दूर पल्ल्याचे उपाय, सुधारणा आणि आमूलाग्र परिवर्तन यांच्यात द्वैत उभे करण्याचा प्रयत्न नाही, तर उलट त्यातील नवे नाते काय स्वरूपाचे असावे हा प्रश्न आहे.

गेल्या काही दशकांमध्ये सुधारणांना असलेल्या मर्यादा उघड होत आहेत. (मुळात नवउदारमतवादी जागतिकीकरणाच्या टप्प्यात सुधारणा या शब्दाचा अर्थच उलटा केला गेला आहे! पण तो अर्थ आणि ती चर्चा आत्ता बाजूला ठेवू.) राज्यसंस्थेसह समाजातील विविध सत्ता या ताठर, प्रतिसाद न देणाऱ्या जनतेप्रती संवेदनहीन बनल्या आहेत. अशावेळी जनकेंद्री सुधारणांचे महत्त्व आणखीनच वाढते आहे हे खरे. मात्र त्याचवेळी गेल्या किमान दोन शतकांचा अनुभव हा आहे, की व्यापक-सर्वस्पर्शी क्रांतिकारी वा मूलगामी-जहाल (रॅडिकल) राजकारणाचा रेटा असल्याशिवाय सुधारणांच्या रूपात सत्ताधाऱ्यांकडून जनतेच्या पदरात काहीही पडत नाही. त्यामुळेच इथून पुढे आमूलाग्र परिवर्तनासाठी आणि सुधारणांसाठीही क्रांतिकारी वा मूलगामी-जहाल राजकीय शक्ती कृतिशील व्हाव्या लागतील.

याची रणभूमी वा याचा आखाडा आजही राष्ट्र आणि राष्ट्र-राज्य असेल हे वास्तव आहे. लोकांची जनसामुदायिक जाणीव आणि सामूहिक कृतीही या पातळीवर संघटित होणे आवश्यक आहे. मात्र याचे स्वरूप गुणात्मकरित्या वेगळे कसे राहील? स्थानिक आणि प्रादेशिक, राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय यांच्यात द्वैत उभे न करता विकास, संस्कृती आणि लोकशाही याबाबतच्या नव्या जुळण्या कशा उभ्या होतील हा कळीचा प्रश्न आहे. उजव्या संकुचित अस्मितावादाला आणि सांस्कृतिक राष्ट्रवादाला त्याशिवाय पर्याय कसा देणार हा प्रश्न अन्यथा अनुत्तरित राहील.

## प्रबोधन-राजकारणातील बदल

जीवनाच्या सर्व क्षेत्रांत म्हणजे ज्ञान आणि विज्ञान, औपचारिक शिक्षण आणि लोकशिक्षण, प्रबोधन आणि राजकारण या साऱ्यांमध्ये एक मूलभूत बदल आवश्यक आहे. ज्ञानाची तसेच राजकीय उतरंड आणि शिक्षण व राजकीयीकरण ही एकतर्फी प्रक्रिया असल्याच्या समजेमधून बाहेर पडण्याची गरज आहे. शिक्षक, प्रबोधक वा लोकांचे राजकीयीकरण करणाऱ्या व्यक्ती, संघटना, पक्ष आदींनी पारंपरिक 'शिक्षका'च्या भूमिकेतून तसेच लोकांना अनुयायी वा केवळ जनाधार मानण्याच्या कल्पनेतून पूर्ण बाहेर पडण्याची गरज आहे.

युरोपीय प्रबोधन युगापासून चालत आलेली परिस्थिती बदलण्यातून आणि संस्कार-संगोपनातून माणसे बदलतातही. मुख्य प्रवाही समज आजही मोठ्या प्रमाणावर प्रस्थापित आहे. मूलत: ही समज चुकीची नाही, पण ती अर्धसत्य आहे. १९ व्या शतकात तर ही समजच प्रभावी होती. तिची समीक्षा करताना मार्क्सने याकडे लक्ष वेधले होते, की ''... परिस्थिती माणसे बदलत असतात आणि शिक्षकाचे स्वतःचे शिक्षण होणे आवश्यक असते. ...परिस्थिती बदलणे आणि मानवी कृतीव्यवहार किंवा स्वतःतील बदल हे दोन्ही एकाच वेळी घडण्याची कल्पना करणे आणि ते विवेकशीलपणे जाणून घेणे हे फक्त एक क्रांतिकारक व्यवहार म्हणूनच होऊ शकते.''

भांडवली व्यवस्थेत 'शिक्षकाचे स्वतःचे शिक्षण' हे उतरंडीवर आधारित व्यवस्थेत पुन्हा उतरंडीची पुनर्निर्मिती करण्यासाठी होते. यातून खास आणि आम, नेते/पक्ष आणि अनुयायी/जनता ही विषम विभागणी आजही कायम आहे. ही प्रक्रिया आजच्या चौकटीतील उतरंड व उदारमतवादातील अभिजनवाद घट्ट करते आहे. एकेकाळी परिवर्तनवाद्यांनी याबाबत नवी दृष्टी ठेवून सुरुवात केली. पण मध्यंतरीच्या काळात यात चाकोरीबध्दता अधिक प्रभावी झाली आहे. खरे तर, शिक्षक, प्रबोधक वा परिवर्तनवादी संघटना/पक्ष हे लोकांसोबत शिकणे-शिकवणे करत ही उतरंड आणि विभागणी मोडण्याचा व्यवहार करतात की नाही, यातूनच त्यांचे वेगळेपण उठून दिसते. त्यातूनच समाजात व राजकारणात खरी परिवर्तन प्रक्रिया मूळ धरत असते. परिस्थिती बदलणे आणि स्वतःतील बदल हे दोन्ही एकाच वेळी, तसेच एक क्रांतिकारक व्यवहार म्हणूनच होऊ शकत असल्याने, शिक्षक-प्रबोधक-परिवर्तनवादी राजकीय पक्ष यांनी अधिकतर सुकर (facilitator) बनणे आवश्यक आहे. शिक्षणातील आणि लोक-चळवळींमध्ये अनेक प्रयोगांमधून आणि प्रतिमानांमधून हे केले गेले आहे. मात्र आता ते सार्वत्रिक बनवणे, आपल्या व्यवहाराची सवय, पध्दती आणि संस्कृती बनवणे गरजेचे आहे.

याचाच पुढचा भाग 'नेतृत्वा'चा आहे. काही परिवर्तनवादी पक्ष व प्रवाह यांमध्ये (उदा. डावे, लोकशाही समाजवादी) उच्चवर्णिय-उच्चजातीय नेतृत्व असल्याने ते प्रस्थापित बनले आहेत, अशी टीका केली जाते. याबाबतची वस्तुस्थिती जाणून घेणे आणि त्याची चिकित्सा करणे आवश्यकच आहे यात शंका नाही. इथे काही नव्या मूलभूत प्रक्रिया घडणे गरजेचे आहे, यातही शंका नाही. पण त्याचवेळी आपण आणखी एका मूलभूत प्रश्नापासून पळून जाऊ शकत नाही. तो म्हणजे आज मग अन्य उदा. दलित, ओबीसी, मराठा, आदिवासी, इत्यादी पक्ष व प्रवाह यांच्यामध्ये 'त्यांच्या' जाती-जमातीतील नेतृत्व असताना त्यांची दुरवस्था का आहे? तिथे सामाजिक न्यायाचा आग्रह धरणाऱ्या विभागाबरोबरच संकुचित अस्मितावादी व जात-जमातवादी विभाग व नेतृत्व का आहे? या प्रवाहांमध्ये घराणेशाही, व्यक्तिकेंद्री व अनेकदा एककल्ली नेतृत्व वर्चस्व का टिकवून आहे? या प्रवाहांमध्ये तळातून वरपर्यंत सामूहिक नेतृत्व व खरीखुरी लोकशाही प्रक्रिया किती आहे? यातील अनेक पक्ष व प्रवाह हे संधीसाधू राजकारणात का रूतलेले आहेत? हे पक्ष व प्रवाह व्यापक सामाजिक परिवर्तन प्रक्रियेचे नेतृत्व करण्यात आघाडीवर का येऊ शकलेले नाहीत? नव्या तत्त्वनिष्ठ, नितीमान व व्यवहारनिष्ठ आणि परिवर्तनवादी राजकारणाचे व समाजकारणाचे उदाहरण ते का घालून देऊ शकलेले नाहीत?

## ...तर गुणात्मक बदल घडू शकेल

मुद्दा हा आहे, की आजचा आणि इथून पुढचा इतिहास घडवणारे पायाभूत वर्ग-जाती, समाजविभाग व स्त्रिया यांच्यामधूनच नेतृत्व पुढे येईल याचे जाणीवपूर्वक व नियोजनबध्द प्रयत्न आता हवे आहेत. विकासकारण, संस्कृतीकारण आणि खरेखुरे लोकशाहीकरण या तिन्ही अंगांनी व सर्व पातळ्यांवर हे

घडवण्यावर भर हवा आहे. आत्ता याबाबत जी उत्स्फूर्त आणि तातडीची गरज म्हणून मध्यम विभागांची उपस्थिती अधिक दिसते, त्यांचा सहभाग तर हवा; परंतु नेतृत्व आणि संघटन-रचना ही खरोखरी कष्टकरी विभागांना केंद्रस्थानी ठेवणारी, सामूहिक व लोकशाहीवादी कशी बनेल, हा कळीचा प्रश्न आहे. यावर शक्ती व दृष्टी केंद्रित केल्यास परिस्थितीत गुणात्मक बदल घडण्याच्या व वर्तमान कोंडी फुटण्याच्या शक्यता वाढत जातील. या संदर्भात अनेक मुद्दे ऐरणीवर येणे गरजेचे आहे. मात्र काही सामाईक व ठळक मुद्यांचा उदाहरणादाखल उल्लेख महत्त्वाचा ठरेल.

आज जगात नवी डावपेचात्मक अण्वस्त्रे वापरण्याची आणि नव्या शीतयुध्दाची भाषा पुढे येत आहे. भारत आता त्यात अलिप्ततावादी नव्हे, तर साम्राज्यवादधार्जिणी भूमिका घेतो आहे, हे चिंताजनक आहे. युध्दकारण, प्रचलित विकास, पर्यावरणअरिष्ट आणि सर्वंकष अरिष्ट यांचा संबंध लक्षात घेता जागतिक शांतता व विकास याबाबत विविध प्रवाहांनी कोणती भूमिका घेणे व राजकारण करणे आवश्यक आहे? मार्क्सवाद्यांची साम्राज्यशाहीविरोधी व जागतिक शांततेची भूमिका, शांततावाद्यांची (पॅसिफिस्ट) चळवळ, अमेरिका-युरोपसह आशिया-आफ्रिका-लॅटिन अमेरिका येथील आम युद्धविरोध, आपल्या येथे गांधीवादी प्रवाहाचा अहिंसावाद, आंबेडकरवादातील बौध्द तत्त्वज्ञानाची अहिंसा व शांततावादी बैठक, स्त्रीवादी-पर्यावरणवादी शांततावाद या साऱ्यांनी कसे एकत्र आले पाहिजे? उदा. अमेरिकेचे जगभरात ८० हून अधिक देशांमध्ये ७५० हून अधिक लष्करी तळ हवेत कशाला आणि कुणाला? हे जागतिक शांततेला धोकादायक तळ अमेरिकेने तिथून हटवावेत, अशी सामाईक भूमिका घेणे आज गरजेचे नाही का?

दुसरा मुद्दा. पोकळ केल्या जाणाऱ्या लोकशाहीचा केवळ 'बचाव' करण्याची किंवा केवळ संस्थात्मक ढाचे व प्रक्रिया टिकवण्याची भूमिका इथून पुढे प्रभावी ठरेल का, असा प्रश्न आहे, की या साऱ्यात नवा लोककेंद्री आशय भरणे अनिवार्य झाले आहे? आम जनतेला आपले अधिकार प्रत्यक्षात साकार करता येतील, अशी लोकशाही कशी विकसित करायची हा प्रश्न ऐरणीवर कसा आणायचा? यासाठी दीर्घ पल्ल्यांमध्ये राज्यसंस्था व नागरी समाज यांच्यातील द्वैत विलयाला जाईल अशा सर्वंकष लोकशाहीवादी राज्यसंस्थेची रचना करण्याची दिशा कशी ठेवायची? आजच्या उदारमतवादी लोकशाहीतील सकारात्मक बाबी आणि लोकांचे राज्यसंथेवर नियंत्रण असावे हे तिचे तत्त्व पुढे कसे न्यायचे? ते नेताना तिच्या मर्यादा आणि त्रुटी, विशेषत: तिच्यातील अभिजनवाद हद्दपार करणाऱ्या नव्या, अस्सल लोकशाहीची पायाभरणी कशी करायची? सुधारणा, राजकारण आणि संघटन व पक्षरचना वगैरेंचा विचार-व्यवहार त्या दिशेने कसा करायचा? उदा. आपल्या येथे बुध्द, विवेकानंद, टागोर, गांधी यांना अभिप्रेत असलेल्या 'अराज्यवादा'तील प्रगतिशील आशय, डॉ. आंबेडकरांना अभिप्रेत असणारी समग्र लोकशाही,'प्रतिसरकारे' पध्दतीच्या जनतेच्या स्वत:च्या राज्यसंस्थांचे अनुभव आणि जिचा पुढे 'विलय' होईल अशी मार्क्सवादातील क्रांतिकारी राज्यसंस्था या साऱ्यांची सांगड इथे कशी घालणार?

तिसरा मुद्दा. उजवे राजकारण हे मूलत: सामाजिक वर्चस्वाचे सांस्कृतिक राजकारण आहे. नव्या परिवर्तनवादी सांस्कृतिक चळवळीचे स्वरूप काय असावे लागेल? इथल्या सर्व शोषित-दडपलेल्या ('निम्नजन')वर्ग-जाती-स्त्रियांचे सांस्कृतिक राजकारण काय असले पाहिजे? तशा परंपरा आणि त्यांची वर्चस्ववादी-कथित मुख्य प्रवाही संस्कृतीशी असलेल्या नात्याची फेरमांडणी कशी कल्पिली पाहिजे? ती विभागीय-संकुचित न ठरता सार्वत्रिक मुक्तिदायी कशी होईल? यात सांस्कृतिक बंडखोरी, प्रतिरोध संस्कृती, बहुसांस्कृतिकता इत्यादीसाठींच्या चळवळी कशा गतिमान करता येतील? या साऱ्यांची सांगड आधुनिक मुक्तीदायी मूल्यांशी आणि समाजवादाकडे जाणाऱ्या विशाल मानवी संस्कृतीशी कशी घालता येईल?

चौथा मुद्दा. गेल्या काही दशकांमध्ये, विशेषत: नवफासिवादी वातावरण जसे वाढत गेले, तसे पुरोगामी-परिवर्तनवादी प्रवाहांच्या मांडणीमध्ये व राजकारणामध्ये एक प्रकारचा रूक्षपणा वाढत गेला असे दिसते. या काळात भावनात्मक राजकारण हे उजव्यांनी काबीज केल्यामुळे, त्याला प्रतिक्रिया म्हणून तो आला आहे का? विवेकाची बाजू उचलून धरताना त्यावर औपचारिक-यांत्रिक अंगाने भर दिला गेला आहे का? अशा बाबींचा विचार करून परिवर्तनवादी प्रवाहांनी स्वातंत्र्यलढ्यात आणि नंतरही काही दशकांमध्ये, जे प्रभावी होते ते पुन्हा अंगिकारले पाहिजे. तेव्हा जसे स्वप्ने आणि आकांक्षा, आदर्श आणि मूल्ये, ध्येये आणि नैतिकता हे सारे भावावेग, चैतन्य, रसरशीतपणा, जिवंत संवादीपणा आणि आत्मविश्वास या प्रवाहांमधून प्रतीत होत होते, तसे आता ते पुन्हा व नव्या स्वरूपात कसे होईल?

शेवटचा, पाचवा मुद्दा. परिवर्तनवादी चळवळी आणि विचारप्रणाली यांचा युवा पिढीशी संवाद (वाद हा त्याचाच एक भाग) कसा वाढेल? इथे फक्त युवा कार्यकर्ते वा शिक्षित युवा अभिप्रेत नाही, तर त्यासह सर्व वर्गांतील, जाती-जमातींमधील आणि विभागातील कष्टकऱ्यांसह युवा व युवती अभिप्रेत आहेत. कारण आपले ज्येष्ठ व मध्यमवयीन विभागांचे वर्तमान हे एका अर्थी 'कालचे' आहे. आजच्या युवावर्गाच्या जगण्या-बघण्यात जे वास्तव आहे, त्यात खऱ्या अर्थी 'वर्तमान' आहे आणि त्यातच उद्याची बीजे -भविष्य-आहे. हेच आजचे वस्तुनिष्ठ सत्य आहे. ठोस अनुभव वा माहिती त्यांच्याकडे आहे वा ते मिळवू शकतात. गरज आहे ती संवादातून दृष्टी, चौकट, पध्दती आणि विचारसरणी-देण्याची नव्हे-विकसित करण्याची. त्यांच्याजवळ आकांक्षा आहेत, स्वप्ने आहेत-छोटी वा मोठी. या साऱ्याला एकत्र आणणारी, गुंफणारी आणि नवे गतिमान 'सूक्ष्मलक्ष्यी वैश्विक' किंवा 'ग्लोबल महाकथनं' (जागतिक अधिक स्थानिक) उभी होण्याची आज गरज आहे. **(समाप्त)...** ●●●

***('यशवंतराव दाते स्मृती संस्था-वर्धा' आणि 'डॉ. भा. ल. भोळे - डॉ. यशवंत सुमंत स्मृती पुरस्कार समिती' यांनी प्रदान केलेला 'डॉ यशवंत सुमंत स्मृती जीवनगौरव पुरस्कार-२०२१' स्वीकारताना योजलेल्या मनोगतावर आधारित - सुधारित रूप)***

**(लेखक समकालिन विषयाचे अभ्यासक आहेत)**

# इहवादी सौंदर्य मीमांसक
# डॉ.यशवंत मनोहर

डॉ. अशोक नामदेव पळवेकर



डॉ. यशवंत मनोहर हे मराठी साहित्यातील एक प्रख्यात कवी, समीक्षक व विचारवंत असून ते या साहित्यपरंपरेतील जडवादी तत्त्वज्ञानाचा आशय समृद्ध करणाऱ्या साहित्यविचारांची मांडणी करणारे एक प्रमुख इहवादी सौंदर्यमीमांसकही आहेत. त्यांच्या व्यक्तिमत्वाची मूस ज्या जीवनमूल्यांनी आणि वाङ्मयीन मूल्यांनी घडलेली आहे, ती जीवनमूल्ये व वाङ्मयीन मूल्ये भारतीय तत्त्वज्ञानातील वैचारिक, सामाजिक आणि सांस्कृतिक संघर्षाच्या इतिहासात मानवी जीवनासंबंधी, साहित्यादि कलाव्यापारासंबंधी आणि सभोवतालच्या सृष्टीव्यवहारासंबंधी एक विशिष्ट भूमिका घेऊन जन्मास आलेली विज्ञाननिष्ठ जाणिवांची मूल्ये आहेत. यावरून डॉ. मनोहरांच्या वाङ्मयीन व्यक्तित्वाची आणि त्यांच्या जीवनदृष्टीची बाजू स्पष्टपणे आपल्या नजरेसमोर यावी.

**ज्येष्ठ साहित्यिक, विचारवंत डॉ. यशवंत मनोहर यांचा २६ मार्च २०२२ रोजी ८० वा वाढदिवस आहे. त्यानिमित्ताने त्यांच्या साहित्यकलाकृतीवरचा विशेष लेख.**

डॉ. मनोहरांनी मराठी समीक्षाव्यवहारात त्यांचा इहवादी सौंदर्यविचार मांडण्यासाठी अनेक समीक्षाग्रंथांचे लेखन केले आहे. त्यापैकी 'नवे साहित्यशास्त्र', 'साहित्याचे इहवादी सौंदर्यशास्त्र' आणि 'सत्याचे सौंदर्य आणि सौंदर्याचे सत्य' हे ग्रंथ या अलीकडच्या काळात इहवादी सौंदर्यशास्त्राची प्रगल्भ मांडणी करणारे ग्रंथ आहेत. या ग्रंथांमधून डॉ. मनोहरांनी इहवादी सौंदर्यशास्त्राचे अंतर्विरोधविहीन परिभाषित सिद्ध केले आहे. हे परिभाषित मानवी समाजजीवनातील चैतन्यवादाला आणि मराठी समीक्षेतील अलौकिकतावादाला नकार देणारे व इतर लौकिकवाद्यांच्या अंतर्विरोधजन्य मर्यादांचे उल्लंघन करून मराठी सौंदर्यमीमांसेला नवा आयाम देणारे आहे.

भारतीय समाज जीवनात आपल्याला ज्या दोन तत्त्वज्ञान-परंपरांचा/प्रवाहांचा आढळ दिसून येतो, त्यांचा उल्लेख आपल्याला ठळकपणे 'चैतन्यवाद' आणि 'जडवाद' असा करता येईल. यातील पहिला प्रवाह 'चैतन्यवाद किंवा कल्पनावाद किंवा कैवल्यवाद' या नावांनी ओळखला जातो. तर दुसरा प्रवाह 'जडवाद किंवा भौतिकवाद किंवा इहवाद' या नावांनी ओळखला जातो. ही दोनही तत्त्वज्ञाने परस्परविरोधी आहेत. त्यांची व्यूहरचना परस्परभेदक आहे. एक जगाला/सृष्टीला केवळ आभास मानतो, माया मानतो. त्याच्या मते, इंद्रियगोचर वास्तवतेचा उद्भव हा कैवल्यातून झालेला असतो. जड वास्तवतेला तो मूलभूत मानत नाही. दुसरा जक्षाला/सृष्टीला प्राथमिक, अनादी व अनंत मानतो. त्याच्या मते, इंद्रियगोचर वास्तवतेचा उद्भव हा जडाच्या विकासप्रक्रियेत एका विशिष्ट अवस्थेत झालेला असतो. जड वास्तविकता ही मूलभूत असून गती व परिवर्तन हा त्या वास्तवतेचा मूलभूत गुणधर्म असतो. यावरून ही दोनही तत्त्वज्ञाने मूलतः परस्परविरोधी आहेत, असे आपल्या लक्षात येईल.

या ठिकाणी या दोनही तत्त्वज्ञानांची ही साररूप चर्चा करण्याचे कारण असे, की आपल्याकडील (प्रारंभापासून तर आतापर्यंतचा) संपूर्ण साहित्य आणि समीक्षेचा व्यवहार याच तत्त्वज्ञानांच्या पायाभूततेवर उभा आहे. त्या व्यवहारांची ही एकूण पायाभूतताच लक्षात घेतली गेली नाही, तर साहित्य आणि समीक्षेच्या व्यवहाराची तसेच सौंदर्यमीमांसेची प्रयोजनेही आपल्याला आकलून घेता येत नाहीत.

आपल्याकडील कला-साहित्य व्यवहाराने ज्या आशयस्वरूपी मांडणी करीत कला-साहित्य निर्मिती केली आणि समीक्षाविचाराने ज्या आशयाभिव्यक्तीच्या कलात्मक रूपाची सैद्धांतिक चर्चा केली, त्या सर्व व्यवहाराच्या चर्चेत चैतन्यवादी तत्त्वज्ञानाचा अगदी प्रारंभापासूनच प्रभाव आहे. त्या तत्त्वज्ञानाच्या प्रभावातच प्राचीन, मध्ययुगीन आणि अर्वाचीन तसेच आधुनिक व उतर आधुनिक काळातील साहित्य निर्मिती व त्या निर्मिती व्यवहाराची बाजू मांडणारी सिद्धांत निर्मितीही मोठ्या प्रमाणात होत आली आहे. या कला, साहित्य समीक्षानिर्मितीच्या प्रभावाने भारतीय जनमानस नियंत्रित झाले आहे. किंबहुना, या जनमानसाच्या नियंत्रणासाठीच हा साहित्यव्यवहार सिद्ध केला गेला आहे. जसे चैतन्यवादी तत्त्वज्ञानाने 'हे जग केवळ आभास किंवा माया आहे' या विचारव्यूहाची मांडणी केली. त्या मांडणीच्या संस्कारातूनच

दैववादी प्रवृत्ती, गूढवादी प्रवृत्ती, रंजनवादी प्रवृत्ती, लैंगिक प्रवृत्ती इत्यादी संबंधीची साहित्यनिर्मिती होत राहिली आणि या साहित्यनिर्मिती व्यवहाराने भारतीय समाजमनाला सतत आपल्या कह्यात ठेवले. त्यातून त्या मनाची मुक्तता होऊ नये म्हणून येणाऱ्या प्रत्येक पिढीच्या लेखकवर्गाने अशाच प्रवृत्तींच्या साहित्यनिर्मितीचा पाढा क्रमशः सुरू ठेवला. यातूनच 'चैतन्यवाद : ईश्वरवाद : धर्म' यासंबंधीची परस्परपूरक संगती भारतीय जनमानसात जिवंत राहिली.

हे जनमानस बदलायचे असेल आणि नव्या प्रकृती व प्रवृत्तीचे जनमानस घडवायचे असेल तर चैतन्यवादी तत्त्वज्ञानाच्या विरोधी संस्कार आपल्याला आपल्या व्यक्तित्वात मुरवून घ्यावा लागेल आणि त्यातून साकार होणाऱ्या जीवनसृष्टीच्या कलाने आपली साहित्यनिर्मिती व समीक्षा सिद्धांत आकाराला आणावे लागतील. या विवेकशील जाणिवेने डॉ. मनोहरांनी पाश्चात्य जगतातील अगदी सॉक्रेटिस, प्लेटोच्या 'अनुकृती' विचारापासून ॲरिस्टॉटलने 'अनुकृती' सिद्धांताच्या वेगळ्या पद्धतीने केलेल्या अत्यंत मूलभूत मांडणीपर्यंत आणि आधुनिक काळात मांडल्या गेलेल्या सर्व सौंदर्यविचाराच्या पार्श्वभूमीवर सौंदर्यविचार/साहित्यविचार आणि मराठीतील साहित्य-समीक्षा-सिद्धांत यांचे अत्यंत डोळस दृष्टीने अवलोकन केले आहे, विवेकशील वृत्तीने त्याची चर्चा केली आहे आणि तर्कशुद्ध पद्धतीने त्याची चिकित्साही मांडली आहे. सूक्ष्म निरीक्षण आणि स्पष्ट दृष्टिकोन ही त्यांच्या चर्चेची व चिकित्सेची पूर्व अट असल्याने त्यातून त्यांच्या स्वतंत्र प्रज्ञेचा सतत प्रत्यय येतो.


आधुनिक काळात मराठी साहित्यविचारात चैतन्यवादी विचारपरंपरेची एक बाजू केळकर, तांबे, मर्ढेकर, रेंगे, गाडगीळ, द.भि. कुलकर्णी यांनी मांडून ठेवली आहे. तशीच जडवादी विचारपरंपरेची दुसरी बाजू वा.म.जोशी, खांडेकर, बेडेकर, कुसुमावती देशपांडे, मुक्तिबोध, गोडसे, शरद पाटील, कुरूंदकर, पाटणकर, सरदेशमुख, म.सु. पाटील, रा.ग. जाधव, कसबे, नेमाडे यांनीही तितक्याच समर्थपणे मांडलेली आहे; परंतु दुसऱ्या बाजूच्या या परंपरेत जीवनवादाच्या अंगाने झालेल्या जडवादी साहित्यविचारांच्या मांडणीत काही मीमांसकांच्या बाबतीत अनेक अंतर्विरोध आहेत. ते सर्व अंतर्विरोध डॉ. यशवंत मनोहर यांनी त्यांच्या इहवादी सौंदर्यविचाराच्या मांडणीतून अत्यंत तर्कशुद्धरितीने अधोरेखित करत त्यांना परखडपणे व समर्थपणाने खोडून काढलेले आहे.

अलीकडच्या काळात जीवनवादी सौंदर्यविचार मांडणारे द.म. गोडसे, प्रा. मुक्तिबोध आणि कलावादी सौंदर्यविचार मांडणारे बा.सी. मर्ढेकर यांच्या सौंदर्यसिद्धांताची बरीच चर्चा झालेली आहे. त्या सिद्धांताची बाजू अनेक अभ्यासकांनी प्रभावीपणे लावूनही धरलेली आहे; परंतु डॉ. मनोहरांनी मात्र त्यातील उणिवांवर आणि अंतर्विरोधांवर नेमकेपणाने बोट ठेवले आहे. गोडसे यांच्या 'पोत' सिद्धांतातील उणीव सांगताना डॉ. मनोहरांनी स्पष्टच सांगितले, की गोडसे यांनी त्यांच्या संपूर्ण सिद्धांतात ''समाज हा एकजिनसी असतो असे गृहीत धरलेले आहे; परंतु त्यांची ही धारणा फारशी समुचित नाही. कारण गोडसे समजतात तसा समाज हा कधीच एकजिनसी वा एकसंध नसतो. थिसीस आणि ॲन्टिथिसीसचा झगडा सतत सुरू असतो. कोणत्याही काळातील समाजात हे द्वंद्व असतेच आणि एकाच समाजवास्तवात नव्या क्रांतिकारी जाणीवा व स्थितीतील जाणीवा या आमनेसामने उभ्या ठाकलेल्याच असतात.'' ही डॉ. मनोहरांची भूमिका आहे. प्रा. मुक्तिबोधांनाही गोडसेंची भूमिका मान्य नाही. गोडसे यांची 'पोत'मधील 'एकजिनसी' समाजाची भूमिका अमान्य करणारे मुक्तिबोध त्यांच्या 'मानुषता' या सिद्धांतात 'त्या त्या काळातील मूल्ये' आणि 'शाश्वत मूल्ये' या संकल्पना मांडताना 'व्यक्ति कालिक मूल्यांकडून शाश्वत मूल्यांकडे जाते' अशी जी भूमिका घेतात, ती भूमिका आणि समीक्षकाला सर्वसमावेशक सुसंगत तत्त्वज्ञान हवे असे सांगताना बुद्ध आणि संत यांना आणि मार्क्सचा जडवाद व भारतीय अध्यात्म यांना एकत्र आणतात, हे डॉ. मनोहरांना पटत नाही. म्हणूनच मुक्तिबोधांची ही भूमिका अंतर्विरोधी आहे आणि अशाप्रकारे मूलभूत अंतर्विरोधावर उभा असलेला विचार हा तर्कप्रमादीत असतो, हे डॉ. मनोहर स्पष्ट करतात. याच शिस्तीत प्रकृतीत आकृतिवादी असलेल्या मर्ढेकरांचाही 'लय सिद्धांत' त्यातील अंतर्विरोधग्रस्ततेमुळे डॉ. मनोहरांनी नाकारलेला आहे. कारण मर्ढेकरांचा सौंदर्यविचार साहित्यकृतीच्या बाह्यरूपाचा व तिच्या आशयनिरपेक्ष रचनागुणांचा विचार असून अंतिमतः तो तंत्रनिष्ठ असा गणितमानी विचार आहे, ही डॉ. मनोहरांची भूमिका आहे. याच पार्श्वभूमीवर चिपळूणकर-केळकर वगैरे मंडळींचा स्वायत्ततावादी समीक्षेतील विचार आणि त्यातील अंतर्विरोध डॉ. मनोहरांनी बाद ठरवले आहेत. जीवन आणि साहित्य यांचा संबंध स्वायत्ततावादी समीक्षेला मान्य आहे. जीवनातील तपशील हे साहित्यसामग्री म्हणून उपयोगी आहेत, असे ही समीक्षा मानते; परंतु या सामग्रीचा मूल्यदृष्ट्या अर्थ लावणे, त्यांच्या हितसंबंधांचे स्वरूप तपासणे आणि त्या तपासणीतून जो आशय हाती येतो त्याला साहित्यकृतीचे 'प्राणतत्त्व' म्हणून प्रस्थापित करणे हे स्वायत्ततावादी समीक्षेला मान्य नाही. म्हणूनच या समीक्षेचे पुरस्कर्ते कलामूल्ये व सौंदर्यमूल्ये यांचा जीवनमूल्यांशी संबंध नाकारत त्यांना स्वायत्त मानतात. ही भूमिका 'सौंदर्य हे जीवनमूल्यच आहे' असे मानणाऱ्या डॉ. मनोहरांना कदापिही मान्य असूच शकत नाही. त्याचे कारण डॉ. मनोहरांच्या साहित्य विचाराच्या मांडणीचा मुख्य आधार बुद्ध-आंबेडकर आणि मार्क्स यांच्या विचारांची चौकट आहे. या विचारचौकटीने सभोवतालच्या सृष्टीकडे/जगाकडे/व्यवस्थेकडे पाहण्याचा एक निश्चित दृष्टिकोन सिद्ध केला आहे. हा दृष्टिकोन चैतन्यवादी विचारपरंपरेला, तत्त्वज्ञानाला नाकारून बुद्ध-आंबेडकर-मार्क्स या विचारांच्या चौकटीत मानवाच्या भौतिक जीवनाला चिंतनाचे केंद्र मानणारा आहे.

म्हणूनच डॉ. मनोहरांच्या समीक्षाव्यवहाराने ही चर्चा आणि चिकित्सा करताना बुद्धवाद-आंबेडकरवाद-मार्क्सवाद यांच्या तत्त्वज्ञानातील जडवादी संगत त्यांनी आपल्या साहित्य आणि समीक्षाव्यवहारासाठी प्रमाण मानली आहे. केवळ क्रांतीचा उद्घोष करून किंवा तसे साहित्य निर्माण करून समाजमनाची मूस बदलत नाही, तर त्यासाठी अस्तित्वात असलेल्या क्रांतिविरोधी

साहित्य आणि समीक्षेच्या तत्त्वज्ञान-चौकटीची चिकित्सा मांडत त्या चौकटीच्या विरोधातील तत्त्वज्ञानाचे आशयद्रव्य आपल्या साहित्यनिर्मितीसाठी उपयोगात आणावे लागते आणि त्यातून जनमानसातील पूर्व आणि रुढ प्रवृत्तींना छेद देत गती आणि परिवर्तनाच्या मूलभूत गुणांचा स्वीकार करणाऱ्या प्रवृत्तींचा उद्‌घोष आपल्या साहित्यव्यवहारातून करावा लागतो, ही जाणीव डॉ. मनोहरांच्या साहित्यविषयक सौंदर्यमांडणीतून प्रामुख्याने मुखर झाली आहे. 'अब्राह्मणी साहित्याचे सौंदर्यशास्त्र' मांडणाऱ्या शरद पाटलांनंतर सर्वप्रकारचे अंतर्विरोध भेदून नव्याने इहवादी सौंदर्यशास्त्राच्या अंतर्विरोधविहीन मांडणीचे श्रेय डॉ. यशवंत मनोहर यांचेच आहे. या मांडणीतून डॉ. मनोहर यांच्या स्वतंत्र प्रज्ञेचे दर्शन तर घडतेच, सोबतच त्यांची जीवनविषयक भूमिकाही स्पष्ट होते. कारण 'इहवादी सौंदर्य' या संकल्पनेबाबत त्यांनी विस्ताराने जी मांडणी केली आहे ती फार महत्त्वाची आहे. ते म्हणतात, ''इहवाद हे पूर्णतः Rational तत्त्वज्ञान आहे. ते प्राकृतीतःच विज्ञानशील या अर्थाने पुनर्रचनाशील आहे. विज्ञानात या पुनर्रचनाशीलतेशीच निगडीत नीतिसूत्रे आहेत. संपूर्ण जैवसृष्टीच अणूंना आलेला फुलोरा आहे आणि विज्ञान असेही मानते, की माणूस हा मूलतःच विवेकशील आहे. म्हणजे निर्मितीचे बीज आणि विवेकशीलता या दोन धारणांवरतीच सर्व मानवी जीवनाच्या कल्याणकारी नीतीचा मांडव उभा करता येतो. इहवादी जीवनदृष्टीच्या पोटात या संपूर्ण नीतीचा अंतर्भाव आहेच. लौकिक जीवन म्हणजे इहजीवनच. म्हणून लौकिकवादाला मी इहवाद मानतो. याचे कारण इहवादाला भारतीय तत्त्वज्ञानाचा संदर्भ आहे. सिंधू संस्कृती, आदिसांख्य, लोकायत, बुद्ध, फुले, बाबासाहेब आंबेडकर आणि भारतीय संविधान ही भारतीय परंपरा इहवादीच आहे. तिने वैदिक, परलोकनिष्ठ अध्यात्म, कर्मविपाक, मोक्ष या सर्वच गोष्टीसोबच सतत संघर्ष केला आहे. म्हणून इहवाद आणि अध्यात्मनिष्ठ परलोकवाद असा थेट संघर्ष उभा करणे मला आवश्यक वाटते.'' यादृष्टीने डॉ. मनोहरांचा 'मानवी न्यायाचा इहवादी सौंदर्यसिद्धांत' लक्षात घेण्याजोगा आहे. या सिद्धातांत 'न्याय' या संकल्पनेला त्यांनी वैश्विक मानले आहे. या संकल्पनेला देश-काल-परिस्थिती यांच्या कोणत्याही मर्यादा नाहीत. कारण 'न्याय' या संकल्पनेतच सौहार्द आणि सद्‌भावनेचा विचार अनुस्यूत आहे. याच अंगाने जीवनाच्या सौंदर्याची मूल्ये हीच जीवनाचा अनुभव देणाऱ्या साहित्यकृतीच्याही सौंदर्याची मूल्ये आहेत. या सौंदर्यविधानातील सत्यता डॉ. मनोहरांनी अधोरेखित केली आहे.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी मूळ बुद्धविचाराची पुनर्मांडणी करताना भारतीय विचारपरंपरेच्या संदर्भात लोकायत दर्शनातील भौतिकवादी विचार आणि जागतिक विचारपरंपरेच्या संदर्भात मार्क्सवादी दर्शनातील भौतिकवादी विचार यांना बुद्धविचारांच्या चौकटीत समाविष्ट केले. या समन्वयातून मानवी दुःखाचे मूळ कारण असलेल्या आर्थिक-सामाजिक परिस्थितीकडे पाहण्याच्या नव्या दृष्टिकोनाला अधिकचे बळ मिळाले आणि दुःखनिरोधाचा मार्ग म्हणून व्यवस्थापरिवर्तनाचा विचार करण्याचे नवे भान आले. त्यातून तत्त्वज्ञान, समाजजीवन आणि साहित्यविचार यासंबंधीची व्यवस्थापरिवर्तनाच्या संदर्भात एक निश्चित भूमिका डॉ. मनोहरांच्या वैचारिक व समीक्षालेखनाने अदा केली आहे. याच भूमिकेतून डॉ. यशवंत मनोहरांच्या 'नवे साहित्यशास्त्र', 'साहित्याचे इहवादी सौंदर्यशास्त्र' तसेच 'सत्याचे सौंदर्य आणि सौंदर्याचे सत्य' या ग्रंथांमधून इहवादी साहित्यसौंदर्याचे अंतर्विरोधविहीन परिभाषित सिद्ध झाले आहे.त्या साहित्यविचाराच्या/साहित्य-सौंदर्यमीमांसेच्या मांडणीचे/विचारव्यूहाचे स्वरूप पुढीलप्रमाणे सांगता येईल.




या मांडणीत 'स्वातंत्र्या'साठी धडपडणाऱ्या 'माणसाचा इतिहास हा मुक्तीचा इतिहास आहे' असे हे सूत्र सांगते. या सूत्रानुसार 'पक्ष-ब' हा 'पक्ष-अ' विरोधी भूमिका नेहमीच घेत असतो. त्यातूनच परस्परविरोधी संघर्ष उभा ठाकतो. या पार्श्वभूमीवर चैतन्यवादी विचारव्यूहाच्या चौकटीला पर्याय देणारे बुद्ध तत्त्वज्ञानाच्या चौकटीतील 'प्रतित्यसमुत्पाद सिद्धांत', 'अनित्यतेचा सिद्धांत', 'नामरूपाचा सिद्धांत' इत्यादी सिद्धांत मानवी समाजजीवनातील विलगीकरणाच्या भावनेला नाकारून मुक्तता अर्थात 'स्वातंत्र्य' या जीवतत्त्वाच्या जाणिवांशी एकरूपत्वाची अनुभूती साधण्याच्या प्रक्रियेला गतिमानता प्रदान करणारे आहे. म्हणूनच 'स्वातंत्र्य' या भावनेचा संकोच म्हणजे समता, बंधुता, न्याय या मूल्यांचा बळी होय, अशी मांडणी डॉ. मनोहर करतात आणि ही मूल्ये शाबूत ठेवण्यासाठी विषमतावादी सांस्कृतिक पर्यावरणाची चिकित्सा मांडत समतावादी पर्यावरण उभे करणे त्यांना गरजेचे वाटते. त्यासाठी तसे विचारव्यूह आपल्या साहित्यनिर्मिती व साहित्यविचारातून प्रस्थापित करीत कला, साहित्य, समीक्षेचा साहित्यविचार त्यांनी सिद्ध केला आहे.

'सामाजिक संबंधातून सामाजिक एकरूपत्व' आणि 'एकरूपत्वाची अनुभूती हीच सौंदर्यानुभूती' ही तत्त्वे किंवा ही सूत्रे डॉ. मनोहरांच्या साहित्यविचारांची स्पृहणीयता सिद्ध करतात. म्हणूनच साहित्यात वास्तव मांडत असताना केवळ चित्रण नव्हे, तर त्यातील वास्तवाची गतिमानता मांडली जावी, असे त्यांना मनोमन वाटते. डॉ. मनोहरांचा हा साहित्यविचार मराठी साहित्यसमीक्षेत इहवादी चिंतनपरंपरेला पुढे नेणारा व विकसित करणारा आहे.

●●●

# राजकारणात काहीही घडू शकतं भगवंता...



पंजाबमध्ये अगदी दहा-वीस वर्षांपूर्वी असं कोणी भाकित केलं असतं, की एक कॉमेडियन, एक अल्पशिक्षित, मदिरेच्या आहारी गेलेला, एक चंचल, एक गायक राज्याचा मुख्यमंत्री होईल, तर त्याला सर्वांनी वेड्यात काढलं असतं. वाहे गुरू असं कसं होईल, असा प्रश्नही विचारला असता. पण पंजाब असं एक राज्य आहे, की जिथं अघटित वाटावं असं घडू शकतं. अशा अनेक गोष्टींबाबत पंजाब प्रसिद्ध आहे. अगदी चार दिवसांपूर्वीच बघा ना. ९८ वर्षाचा एक उमेदवार निवडणूक आखाड्यात उभा होता. पंजाब समृद्धीबाबत आघाडीवर आणि उडता पंजाब दाखवण्याच्या बाबतीतही आघाडीवर आहे. आपल्याला बऱ्याच गोष्टी विनोदासारख्या वाटतात. पण पंजाबमध्ये बऱ्याच वेळेला हे वास्तव असतं. जसं की भगवंत मान यांच्या बाबतीत घडलंय. हा मजकूर आपल्या हाती पडेपर्यंत पंजाबमध्ये शहीद भगतसिंग यांच्या जन्मगावी मुख्यमंत्री म्हणून त्यांचा शपथविधीही झालेला असणार. देशाला वाटेल, की हे कसं घडलं. पण पंजाबचे लोक म्हणतील, बल्ले बल्ले ये होना ही था.. सब गुरू की कृपा है.

भगवंत मान यांना राजकारणाची कोणतीही परंपरा नाही. त्यांच्या सात पिढ्यांत कोणी निवडून आलेलं नसावं. एक गरीब, मध्यमवर्गीय शिक्षकाच्या पोटी त्यांचा जन्म झाला. आपला मुलगा शिकावा, त्यानही शिक्षक व्हावं असं भगवंत यांच्या वडिलांना स्वाभाविकच वाटलं असावं. मुलगा शाळेतही जाऊ लागला. शेतातही जाऊ लागला. त्याच वेळी कॉमेडी करण्याचा, भाषण करण्याचा नाद त्याला लागला. सामान्य मुलगा भाषण कसं करणार आणि कोण त्याचं ऐकणार? पण भाषणाचा नाद इतका जबरदस्त होता, की शेतात गेल्यावर एखादी झाडाची फांदी तोडून किंवा घरी आल्यावर एखाद्या लाकडाचं दांडकं घेऊन तो त्याचा माईक बनवायचा. भाषण सुरू करायचा आणि एकटाच ते ऐकायचा. सत् श्री अकाल म्हणत कॉमेडी सुरू करायचा. कॉमेडीचा नाद इतका जडला, की १९९२ मध्येच 'गोबी दी ए कच्चिए व्यापारने' ही त्याची कॅसेट आली आणि ती इतकी लोकप्रिय ठरली, की २०१५ पर्यंत नव्या पंचवीस कॅसेटची भर त्यात पडली. जाहिरातीतही त्यानं काम केलं. गाण्याच्या कॅसेट निघाल्या. सारं काही बल्ले बल्ले..

कॉमेडी कलाकार भगवंत आपल्या कलेमध्ये अनेकदा पंजाबचं राजकारण, समाजकारण यांचा उल्लेख करायचा. अशा उल्लेखांना दादही खूप मिळायची. देशभर त्याचे कार्यक्रम होऊ लागले. एक कलाकार म्हणून त्याचा चेहरा तयार झाला. सार्वजनिक ठिकाणीही राजकारणावर तो भाष्य करू लागला. डाव्या विचारांचा म्हणजेच शहीद भगतसिंग यांच्या विचारांचा त्याच्यावर थोडाफार परिणाम झाला होता. अकाली दल आणि काँग्रेस यांनी आलटून पालटून पंजाबचे खूप नुकसान केले आहे. तिसऱ्या पर्यायाची गरज आहे, असं त्याला सातत्यानं वाटत राहायचं. बलवंत सिंह रामुवालिया यांनी स्थापन केलेल्या लोकभलाई म्हणजे जनप्रगती या पक्षाला त्यानं पाठिंबा दिला. पण प्रत्यक्ष मात्र तो कोणत्याच पक्षात जात नव्हता. पण पुढे २०११ मध्ये मनप्रीत बादल यांनी पंजाब पीपल्स पार्टीची स्थापना केली आणि भगवंत या पक्षाचा एक संस्थापक सदस्य ठरला. २०१९ मध्ये याच पक्षाची उमेदवारी घेऊन तो विधानसभेच्या रिंगणात उतरला पण रजिंदर कौर भट्टल या महिलेकडून तो पराभूत झाला. भट्टल या साध्यासुध्या नव्हत्या तर मुख्यमंत्र्याच्या पत्नी होत्या. भगवंत यांच्या पक्षाला भोपळाही फोडता आला नाही. मनप्रीत काँग्रेसप्रवेशाच्या तयारीला लागले. पण भगवंत आम आदमी पार्टीकडे म्हणजे आपकडे वळले. या पक्षाचे स्टार प्रचारक झाले. संगरूर लोकसभा मतदारसंघात त्यांनी निवडणूक जिंकली आणि अकाली दलाचे ग्रेट हॉर्स मानल्या जाणाऱ्या सुखदेव सिंग ढिंढसा यांचा पराभव केला. २०१७ मध्ये ते जलालबादमध्ये पराभूत झाले, पण २०१९ च्या निवडणुकीत लोकसभा निवडणूक जिंकली. राजकारणात स्थिरावलेल्या आपचे प्रदेशाध्यक्ष झालेल्या भगवंत मान यांच्यावर कधीच कसले आरोप झाले नाहीत. एक आरोप मात्र झाला आणि या आरोपाने त्यांची पाठ कधीच सोडली नाही आणि हा आरोप म्हणजे ते मद्यपी, दारूडे किंवा तळीराम असल्याचा. असे आरोप करणाऱ्यांमध्ये सामान्य माणसंपण होती. त्याशिवाय मान यांच्याच पक्षाचे एक नेते योगेंद्र यादव, कॅप्टन अमरिंदरसिंग, लोकसभेतील काही खासदार हेही होते. कुठंही जा मान यांच्या मद्यसेवनाच्या चर्चा उघडपणे रंगत. त्याबाबतचे काही व्हिडिओही व्हायरल झाले. मान सभागृहात, कार्यक्रमात, पक्षाच्या बैठकीत, अंत्यसंस्कारालाही मद्यपान करून जातात, अशा त्या चर्चा असत. मान म्हणजे एक दारूडे नेते अशी प्रतिमा त्यांचे विरोधक तयार करत होते. राजकारणात आणि इतरत्रही मद्यपान करणारे लोक आता अपवादामध्ये मोडतात. पण बहुतेकांविषयी अशी उघड चर्चा होत नाही. अनेक थोर नेतेही मद्यपान करत पण सभ्यता, शिस्त पाळूनच. दारूबंदी खात्याच्या मंत्र्याने दारू दुकानाचे उद्घाटन केल्याचेही उदाहरण आपल्याकडे आहे. मान यांच्याबाबत मात्र जणू काही वेगळा न्याय होता.

त्यांच्यावर कसलेच आरोप करता येत नाहीत म्हणून विरोधक त्यांना बाटलीत गोवण्याचा प्रयत्न करू लागले. मी मद्यपान करत नाही असं कधी मान म्हणाले नाहीत. उलट, या सर्व प्रचाराला उत्तर देण्यासाठी २०१९ मध्ये झालेल्या एका जाहीर कार्यक्रमात आपल्या आईच्या उपस्थित त्यांनी दारू न पिण्याची शपथ घेतली. विशेष म्हणजे, ती पाळली. मुख्यमंत्रीपदावर बसतानाही ही शपथ त्यांच्या सोबत असावी.

आपण मुख्यमंत्री होताच किंवा होणार आहोत हे ठरताच त्यांनी सर्वप्रथम अभिवादन केलं ते भगतसिंग आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना. पंजाबमध्ये मुख्यमंत्र्याऐवजी या दोन महान नेत्यांचे फोटो असतील हे सांगणारे ते पहिले मुख्यमंत्री ठरले. नेते ठरले. अकाली दल आणि काँग्रेस यांच्या मुठीतून पंजाबला बाहेर काढणारे ते पहिले नेते ठरले. आप पहिला पक्ष ठरला. बाबासाहेबांचं नाव घेऊन त्यांनी यशस्वी राजकारण केलं. बाबासाहेब केवळ दलितांचे, केवळ महाराष्ट्र-यूपीचे नसून संपूर्ण देशाचे नेते आहेत, राष्ट्रनेते आहेत हेही त्यांनी पंजाबच्या निवडणुकीत सिद्ध केलं. म्हणूनच पंजाबमध्ये आणि एकूणच राजकारणात काहीही घडू शकतं असं म्हणतात. ज्याचं भाकीत कोणी करू शकत नाही, असं घडू शकतं. भगवंत मान यांचं उदाहरण त्यापैकी एक. 'भगवंत के घर मे देर है अंधेर नही' असंही पुन्हा कुणीतरी म्हटल्याशिवाय राहणार नाही.

## शिवसेनेची डरकाळी बाहेरच्या राज्यात घुमेना

शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांचं मुंबईत आणि दिल्लीवर भगवा फडकवण्याचं एक भव्यदिव्य स्वप्न होतं. महाराष्ट्रात ते भाजपशी आणि आता दोन काँग्रेसशी युती करून पूर्ण झालं. कसं का असंना पण शिवसेना मुख्यमंत्री असलेल्या आघाडीचं तीन पायाचं सरकार टिकून आहे. हे सरकार आज पडणार, उद्या पडणार अशी भाजपची सातत्यानं शापवाणी, भविष्यवाणी चालू असतानाही सरकार श्वास आत घेते आहे आणि बाहेरही सोडते आहे. शरद पवार यांनी प्राणवायूचं सिलिंडर गच्च पकडून ठेवलं आहे. बाळासाहेबांचं महाराष्ट्रात भगवा फडकवण्याचं स्वप्न तसं एका अर्थानं पूर्ण झालं आहे. पण देशात काय करायचं हा प्रश्न घेऊन शिवसेना जगत आणि लढत आली आहे. महाराष्ट्राबाहेर पाय पसरवण्यासाठी गोवा, दमण, यूपी, गुजरात, दिल्ली आदी अनेक ठिकाणी शिवसेनेने प्रयत्न केले. मोठा गाजावाजा केला. गोव्यात तर जणू काही सूत्रे आपल्याच हाती आली आहेत अशा वल्गना केल्या. राष्ट्रवादीबरोबर युती करून एक डझनहून अधिक म्हणजे या दोघांचे २३ उमेदवार उभे होते. प्रचंड प्रचार झाला. अनेक नेत्यांनी गोव्यात तळ ठोकला. पण दोघेही भोपळा फोडू शकले नाहीत. महाराष्ट्राच्या सीमेवर, मराठी भाषकांनी भरलेलं आणि महाराष्ट्राचा जैविक भाग वाटावा अशा गोव्यात शिवसेनेच्या हाती भोपळा लागला. दिल्लीतून आलेल्या आपने दोन जागा मिळवल्या. पण गल्लीतून गेलेले काहीच करून शकले



नाहीत. काँग्रेसने अकरा जागा मिळवल्या असल्या तरी त्यांची सत्ता येऊ शकत नाही. महाराष्ट्रात तीन चाकांच्या खुर्चीचा खेळ खेळणारे आणि तो टिकवणारे दोन काँग्रेस आणि शिवसेना यांनी गोव्यात असाच खेळ खेळला असता तर? अर्थात, या प्रश्नाला काही अर्थ नाही.

उत्तर प्रदेशातही शिवसेनेने थोडथोडक्या नव्हे, तर ४१ जागा लढवल्या. पण तेथेही अनामत गमवावी लागली. या ठिकाणी शिवसेनेला हिंदुत्वाचं कडवं कार्ड वापरायचं होतं, पण भाजपच त्याबाबत सरस ठरली. भाजपने अवघी निवडणुकच हिंदुत्वावर उभी केली होती. पण शिवसेना तेथे टिकाव धरू शकली नाही. उत्तर प्रदेशात भाजपनं हिंदुत्वाचं कार्ड चालवलं पण शिवसेनेचं का चाललं नाही, असा प्रश्न तयार होतो. अर्थात, शिवसेना त्याचं उत्तर देईल. आपल्याकडं जे हिंदूत्व सांगितलं जातं ते खरोखरच हिंदू धर्माशी जोडलं गेलं आहे, की राजकारणाशी असा प्रश्न तयार होईल तेव्हा उत्तर ऐकताना अनेकांचा भ्रमनिरास होईल, यात शंका बाळगण्याचं काहीच कारण नाही. जिथे जिथे हिंदूत्व मांडता येईल किंवा त्याचं मत बनवता येईल, अशा ठिकाणी शिवसेनेनं घुसण्याचा प्रयत्न केला. राजस्थान असेल, जम्मू-काश्मीर असेल किंवा आणखी कोणतं तरी पिल्लू राज्य असेल पण त्या ठिकाणी कडवं हिंदूत्व जे शिवसेनेच्या राजनीतीचा भाग आहे, ते चाललेलं नाही. आता पुन्हा प्रश्न पडतोय, की खरंच शिवसेना कडवे हिंदूत्व चालवणारी आहे का? कोणीही शहाणा उत्तर देईल, की तसे काहीच नाही. प्रत्यक्षात राजकारणातील ते एक मृगजळ आहे. शिवसेनेने बाहेर कितीही रुजायचा प्रयत्न केला तर तिची लढत भाजपशीच होत राहते आणि भाजप काही तिला रुजू देण्याची शक्यता नाही. मोठे पक्ष छोट्यांना जवळ करत असतात ते त्यांना गिळण्यासाठीच. अगोदर मैत्री-युती करायची आणि मग त्यांना अस्तित्वहीन करायचं, अशीच कोणत्याही मोठ्या पक्षाची राजकीय युती असते. दक्षिणेकडचे प्रादेशिक पक्ष अपवाद वगळता अशा राजकीय चालींना बळी पडत नाहीत. बाबत राष्ट्रीय पक्ष विस्तारायला दक्षिणेत उशीर लागतो. प्रादेशिक पक्षांना हे कळत असतं नाही असं नाही. तेही मोठ्या पक्षाचा एखादा तुकडा पाडण्यासाठीच युती करतात. म्हणजेच दोघांनाही प्रेमाने बोलून परस्परांचे ओरखडेच काढायचे असते. शिवसेनेलाही हे सारं एव्हाना कळलंच असणार यात शंका नाही.

# बीएसपीचा पराभव एक राजकीय शोकांतिका



कांशीराम यांनी रक्ताचं पाणी करून आपलं सारं बौद्धीक, राजकीय, सामाजिक कौशल्य पणाला लावून स्थापन केलेल्या बहुजन समाज पक्षाचा दारूण पराभव पक्षाच्या शत्रूंनाच नव्हे तर मित्रांनाही क्लेशदायक वाटावा असा आहे. राजकारणात घडत असतं असं म्हणून या प्रश्नाकडे बघून चालणार नाही. कारण त्या पलिकडचा हा पक्ष आहे. बहुजन समाज पक्षाचा म्हणजे बीएसपीचा जन्म म्हणजे भारतातील शेठजी-भटजींवर आधारलेल्या राजकारणाला नवं वळणं मिळण्याचा क्षण आहे. जे संसदेची, विधानसभेची पायरी कधीच चढू शकणार नाहीत असे लोक सत्ताधारी झाले. ज्या जातींची नावेही ठाऊक नव्हती अशा जाती बीएसपीचा सोपान घेऊन राजकारणात गेल्या. राजकारणात तत्त्वज्ञानाबरोबर चातूर्यही कसे लागते हे बीएसपीने भारतीय राजकारणाला शिकवले. ज्या जाती शूद्रांची सावलीही मान्य करत नव्हत्या त्या अनेक वरिष्ठ जाती मायावतींच्या उच्च सिंहासनाखाली लोळण घेऊ लागल्या. ज्या तत्त्वज्ञानाचे, महापुरूषांचे नाव घ्यायला उत्तर प्रदेशात बंदी होती तेथे या महापुरूषांचे भव्य पुतळे, स्मारके उभी राहिली. बीएसपीने हे सारे बदल घडवण्यासाठी वापरलेले सारेच मार्ग योग्य होते, असे कोणीही म्हणू शकणार नाही. पण बदलत्या, परिवर्तनाच्या विचारानं झपाटलेल्या बीएसपीने मार्गाचा विचार न करता बदल घडवण्यात जे जे उपयोगी ते ते त्यांनी वापरायला सुरुवात केली. कोणी त्याला सामाजिक अभियांत्रिकी म्हणेल तर कोणी आणखी काही.. तुम्ही राज्यकर्ती जमात व्हा हा बाबासाहेबांचा मंत्र काही करून वास्तवात आणण्याच्या हालचाली करणारा पक्ष म्हणजे बीएसपी. मायावती प्रचंड बहुमताने विजयी झाल्या. एक दोन वेळा नव्हे तर तीन वेळा. 'चमार की बच्ची सीएम बनेगी' हे कोणी भारतात स्वप्नामध्येही मान्य केलं नसतं. पण वास्तवात तसं घडलं. पंतप्रधानपदाकडे वाटचाल करणारी आयर्न लेडी असंही त्यांचं वर्णन झालं. पण या स्वप्नांना फार लवकर ओहोटी लागली. ज्या पक्षाला मोठ्या प्रमाणात बुद्धीजीवी वर्ग लाभला होता, शासनातले उच्च अधिकारी लाभले होते, तळहातावर प्राण घेऊन लढणारे कार्यकर्ते लाभले होते, जात व्यवस्थेत आणि राजकारणातही प्रंचड घुसळण झाली होती तो बीएसपी गेल्या काही वर्षांत कुपोषित बनत होता. इतका कुपोषित, की गेल्या वेळी जिंकलेल्या मोजक्या जागा आणि मतांची टक्केवारी यंदा त्याला टिकवता आली नाही. केवळ एक जागा जिंकणारा बीएसपी अशी एक शोकांतिका तयार झाली.

यंदाच्या निवडणुकीत अगदी प्रारंभापासूनच बीएसपीच्या हाताखालची-पायांखालची वाळू घसरतेय असं चित्र तयार झालं होतं. ब्राह्मण आपल्या बाजूनं उभा राहील या पूर्वीच्या भावनेनं त्यांनं सारी सूत्रे त्यांच्या हातात दिली. एक दोन नव्हे, तर शंभर ब्राह्मण उभे केले. भाजपकडचा ब्राह्मण निसटणार आणि तो आपल्याकडे येणार असं गणित होतं. अर्थात, त्या मागची भावना चांगलीही असेल. पण उत्तर प्रदेशी ब्राह्मण त्यांना कळला नाही, असाही एक अर्थ निघू शकतो. हिंदू राष्ट्र, मनुचं राज्य आणायला निघालेले लोक आपल्याशी प्रामाणिक कसे राहतील, हा प्रश्न त्यांना का पडू नये याचं आश्चर्य साऱ्यांनाच वाटतं. निवडणूक काळातील प्रचारात नेहमीप्रमाणे दिसणारा जोश मायवतींमध्ये नव्हता. रात्रंदिवस एक करून आकाश-पाताळ एक करून वाघीणीप्रमाणे गरजणाऱ्या, सापनाथ नागनाथ ठेचून काढू असं भरसभेत सांगणाऱ्या मायावती यावेळी आपल्या उग्र भूमिकेत कुठंही दिसल्या नाहीत. का घडलं असं, हा एक प्रश्न साऱ्यांच्याच समोर होता. ब्राह्मणांना अतिशय जवळ करण्याच्या प्रयत्नांत मुस्लिम दूर गेले. यादव येणार नव्हते. एकट्या दलितांच्या जोरावर रणशिंग वाजणार नव्हतं. याची खात्री दलितांनाही होत होती. यावर बहन जिंकणारच नाहीत तर मते दुसऱ्याला द्या, असा एक विचार दलितांमध्येही तयार झाला. याशिवाय बीएसपीचे रुपांतर भाजपच्या टीम बी मध्ये झालं आहे, असा प्रचार गैरप्रचार करणारा एक वर्ग तयार झाला. भाजपची टीम बी बनून राजकीय आत्महत्या करावी, असे बीएसपीला कधीच वाटणार नाही. एक एक कार्यकर्ता जमवून आणि घडवून हा पक्ष तयार झालाय. यात्रा जत्रातून कार्यकर्ते आले नव्हते, तर केडर कॅम्पमधून बहुतेक आले होते. भारतावर राज्य करण्याचं स्वप्न घेऊन आले होते. ते टीम बी कसे बनतील आणि महाराष्ट्रातील अनेक दलित नेत्याप्रमाणे विजयाऐवजी पराभवाचे राजकारण कसे करतील. पण टीम बीच्या अफवेनं राजकीय गणित बऱ्यापैकी विस्कटलं होतं. खरं तर टीम बी म्हणजे ओवैसी. अनेकदा ते उमेदवार उभे करतात पण ते निवडून कधीच येत नाहीत. यावेळीही शंभर उमेदवार उभे होते पण एकही विजयी झाला नाही. भारतीय राजकारणात पराभवातच धन्यता मानणारे आणि टीम बी होणारे काही कमी नाहीत. पण बीएसपी कसा होईल, कारण तो अपघातानं जन्माला आलेला नाही. एका थोर नेत्याने केलेल्या त्यागातून आणि संघर्षातून जन्माला आला आहे. हे असं का घडतं यावर येथून पुढे बराच काळ चर्चा होत राहील. लोकांना उद्योग नसतो. शेवटी एकच प्रश्न शिल्लक राहतो आणि तो म्हणजे मायावती स्वतः या अफवांवर, नक्राश्रूवर काय भूमिका घेतात आणि पत्रकार परिषदांमधून नव्हे, तर मैदानातून कोणते व कसे उत्तर देतात, हेच महत्त्वाचे ठरणार आहे. ●●●

**– पंक्चरवाला**


# माणूस असण्याच्या विषण्ण करणाऱ्या नोंदी



सुदीप गुजराथी

माणूस असणे ही गोष्ट माणसासाठी तशी सुखावून टाकणारी. माणूस त्याच्या कर्तृत्वामुळे सगळ्या सजीवांत श्रेष्ठ ठरला. पुनर्जन्म वगैरे भानगडी मानणारी माणसे तर ८४ लक्ष की कितीतरी योनींनंतर माणसाचा जन्म मिळतो यांसारख्या भाकडकथांवर विश्वास ठेवतात आणि माणसाला सर्वोच्च पातळीवर नेऊन बसवतात; पण माणूस आहे म्हणून सोसावी लागणारी दु:खे, भेदाभेदाचे चटके, त्यातून होणारी घुसमट, येणारी अस्वस्थता आणि पीडांमुळे माणूस असण्याचे रूपांतर असह्य वेदनांनी ठणकणाऱ्या भळभळत्या जखमांत होऊन जाते. विदर्भातील तरुण पत्रकार आणि मितभाषी पण प्रचंड ताकदीचे कवी मेघराज मेश्राम यांनी या जखमांची विदारक जाणीव 'माणूस असण्याच्या नोंदी' या आपल्या पहिल्याच काव्यसंग्रहातून करून दिली आहे, जी माणसाला अस्वस्थ, अंतर्मुख करते आणि त्याच्या माणूस असण्यावर प्रश्नचिन्हही उपस्थित करते.

लोकवाङ्मय गृहाने प्रकाशित केलेल्या या संग्रहातल्या कवितांतील पहिलेपण अजिबातच जाणवत नाही. मौज, युगवाणी, खेळ, अक्षरलिपी, परिवर्तनाचा वाटसरू, पुरुष उवाच, दलित अस्मिता, सत्याग्रही विचारधारा, अस्मितादर्श यांसारख्या दर्जेदार नियतकालिकांत प्रसिद्ध झालेल्या यातल्या प्रत्येक कवितेतला एकेक उद्गार कधी कवीची हतबलता, घुसमट, संताप, तर कधी आशावादही समर्थपणे व्यक्त करतो.




***'मी शोधतो***
***माझे मूळ–कूळ***
***तेव्हा ऐकू येते***
***वेदनेची झुळझुळ'***

या प्रारंभीच्या ओळी संग्रहात काय वाचायला मिळणार, याची जाणीव करून देतात. मेश्राम यांनी संग्रहात कवितांचे विभाग केलेले नाहीत; पण यातल्या कवितांचा बहुधा जाणीवपूर्वक लावलेला क्रम वाचकाच्या जाणिवेला अधिकाधिक व्यापक करत जातो. स्वत:विषयी, कवितेविषयी, माणसाच्या घुसमटीविषयी, त्याच्या जगण्यातील भयाणतेविषयी, समाजाच्या अप्पलपोटेपणाविषयी, पुराणकाळापासून ते आतापर्यंतच्या अन्यायग्रस्तांविषयी यातली कविता प्रखर भाष्य करते.

***'खूप खूप उदास झालोय***
***जीव रमत नाही***
***अस्वस्थ वर्तमानाच्या बेटावर***
***जखमी प्राणाचा दिवा***
***फुटून जावा***
***एखाद्या ताऱ्याला धडकून***
***अस्तित्वाची राखही***
***उरू नये मागे'***

– अशा शब्दांतून जगण्यात आलेली असहायता कवी मांडतो आणि अस्तित्वच संपले म्हणजे सारेच प्रश्न सुटतील, असे ध्वनित करतो.

***'काल***
***खडकाळ मातीत***
***मी शब्द पेरले***
***रक्त शिंपडून***
***आज***
***बघतो तर***
***कविता उगवली***
***वेदनांना बिलगून***
***रात्री***
***कुणाचे तरी अश्रू***
***ओघळले असावे'***

– या ओळींतून मेश्राम आपल्या कवितेचा उगम वेदनेतूनच होत असल्याचे सांगतात. अवघ्या एकवीस शब्दांतून वेदना आणि कवितेचे नाते उलगडणारी ही आणि संग्रहातील अशा अन्य अल्पाक्षरी कविता विलक्षण ताकदीच्या आहेत.

माणसाला माणूस म्हणून न ओळखले जाता रंग, जात, धर्म, प्रदेशावरून त्याचा दर्जा ठरवला जातो, याचे मेश्राम यांना विलक्षण दु:ख आहे. हे दु:ख ते अनेक कवितांतून बोलून दाखवतात.

***'रस्त्याच्या कडेला***
***बेवारस मृतदेह***
***कोणत्या रंगाचा***
***कोणत्या जातीचा***
***कोणत्या धर्माचा***

*कोणत्या प्रदेशाचा...*
*गर्दीत प्रश्नांचा मोहोळ*
*'तो माणूस आहे'*
*कुणीच कसे बोलत नाही'*

– हा प्रश्न कवीला सातत्याने सतावतो आहे. माणूस जन्मल्यापासून त्याच्यावर निरनिराळे शिक्के मारले जातात. कधी जातीवरून, रंगावरून, तर कधी लिंगावरून. आणि त्यावरून त्याला त्याच्या मर्यादित अवकाशाची जाणीव करून दिली जाते. तुझे वर्तुळ एवढेच आहे, त्याच्या परिघाबाहेर जायचे नाही, असे त्याला आयुष्यभर बजावले जाते. या काळोख्या पिंजऱ्यातून त्याची सुटका कधीच होत नाही. या उद्विग्नतेतून मेश्राम यांना प्रश्न पडतो की, शेकडो शिक्के मारणारा हा समाज त्याच्या माणूस असल्याची नोंद का घेत नाही.

मेश्राम समाजाच्या दांभिकपणावर बोट ठेवतात आणि प्रस्थापितांकडून उपेक्षितांवर होणाऱ्या अन्यायाला वाचा फोडतात. तुळसाबाई, इमलाबाई, शूर्पणखा, शंबूक, चेंदरू मडावी यांसारख्या व्यक्तिरेखांना साद घालत मेश्राम त्यांच्या-त्यांच्या वेदनांचे वळ आपल्या मनावर उमटवतात. शूर्पणखेच्या आरोपींवर व्यवस्थेने गुन्हा दाखल होऊ दिला नाही. म्हणून तिला ते 'तू न्यायाची भीक मागत कधीपर्यंत भटकशील', असा सवाल करीत 'तुझी लढाई आता तुलाच लढावी लागेल', याची जाणीव करून देतात.

कविसूर्य बाबूराव बागूल यांनी 'वेदांआधी तू होतास' लिहून ठेवले; पण पुराणातल्या पात्रांचे ओझे अजूनही कित्येकांना वाहावे लागते. या काल्पनिक पात्रांच्या प्रभावाखाली समकालीन माणसे दबून जातात. या पात्रांची ना कधी चिकित्सा होते ना कधी उलटतपासणी. तसा प्रयत्न जरी झाला, तरी तलवारी उपसल्या जातात. या सगळ्या भंपकपणापेक्षा माणसाचे दु:ख मोठे आहे, हे मेश्राम तळमळीने सांगतात. ते उंदराला म्हणतात,

*'खूप गर्व आहे तुला*
*गणपतीचा भार*
*पाठीवर पेलल्याचा*
*माझ्या डोक्यावरील दु:खाचा पेटारा*
*उचलून बघ एकदा*
*सारी अकड जिरून जाईल'*

समाजातली दिवसेंदिवस वाढत चाललेली असुरक्षितता मेश्राम यांना अस्वस्थ करते. 'हमी', 'आजकाल वातावरण ठीक नाही', 'काळ्या सावल्या' यांसारख्या कवितांतून ती व्यक्त होते. महानगरीय जीवनात आलेला यंत्रवत तोचतोचपणा आणि त्यातून आलेल्या बेचैनीलाही ते वाचा फोडतात. सारे जग डिजिटल झाले, पण भाकरी डाऊनलोड करता येत नाही, ही त्यांची वेदना आभासी जीवनाची आणि त्याच्या बरोबर विरुद्ध असलेल्या वास्तवाची जाणीव मन विषण्ण करते.

प्रस्थापित व्यवस्थेविरोधात कधी संताप, तर कधी

## कवितेशिवाय दुसरे काही नाही...

कवीने कवितेशी असलेले आपले नाते काही कवितांमधून उलगडून दाखवले आहे. अंधाऱ्या वाटेवर बिनदिक्कत चालण्यासाठीची ताकद कवितेतूनच मिळते. कवितेशिवाय माझ्याकडे दुसरे काय आहे, असा त्यांचा प्रश्न हेच एक उत्तर असते. 'कवींना नोटीस'सारख्या रचनेतून ते अभिव्यक्ती स्वातंत्र्यावर येत असलेल्या मर्यादांवर आवाज उठवतात. 'काळ्या पोराची कविता' तर वाचकाला अस्वस्थ करून जाते. गुरुजींनी मुलाला 'तुला जी येते ती कविता म्हण' सांगितल्यावर बाहेर पडलेल्या त्याच्या हुंदक्यातून आभाळभर झालेली कविता त्याच्या दु:खाची वाहिनी होते.

आक्रोश करणारे मेश्राम आई-बाप या नात्यांविषयी मात्र हळवे होतात. 'बापाला खांद्यावरून नेताना मी वर बघितलं, त्याचा समाधानी चेहरा आभाळभर झाला होता', असे सांगणाऱ्या कवीला आता आपल्या मुलामध्येच बाप दिसतो. आईबद्दल तर त्यांनी अतिशय हृद्य लिहिले आहे. 'माय, तू काय मेन्टेन करत होतीस'सारख्या कविता माय-लेकराच्या नात्याचे अनेक पदर हळुवारपणे उलगडतात.

कवी या संग्रहात वाचकाला निव्वळ वेदना, असहायता, अस्वस्थता आणि उद्वेगाच्याच अंधाऱ्या वाटेवरूनच नेत नाही, तर-

*'सारेच हंगाम बुडवणारे नसतात*
*रात्रीलाही दिवस जातातच*
*असा कच खाऊ नकोस भाऊ*
*ऊठ, काळोख नांगरून काढू*
*उजेडाची पेरणी करू!'*

– अशा शब्दांत ते आशेच्या सूर्याकडे बोट करतात. तीव्र घर्षणातूनच वणव्याचा जन्म होतो, असे सांगत उजेडाची पाऊलवाटही दाखवतात.

मेश्राम यांनी अतिशय प्रामाणिक व ताकदीची कविता अत्यंत संयत शब्दांत उभी केली आहे. या कवितेत उद्विग्नता आहे, पण आक्रस्ताळेपणा नाही. संताप आहे, पण हिंसेचा लवलेश नाही. संघर्ष आहे, पण सूडभावना नाही. विद्रोह आहे, पण विद्वेष नाही. असेल तर बुद्ध-गांधींचे प्रेम आणि कारुण्यच आहे. कारण त्यानेच तर आजवर जगाला तारले आहे.

●●●

*** माणूस असण्याच्या नोंदी**
*** कवी : मेघराज मेश्राम**
*** प्रकाशक : लोकवाङ्‌मय गृह**
*** पृष्ठे : ७२**
*** मूल्य : १५० रुपये**

POSTAL REGISTRATION NO. ABD/492/2020-22
RNI REG. NO. MAHMAR/2018/76460

With Best Compliments





Sos. Agrotech Pvt.Ltd

